CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २९ एप्रिल २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १७१ । पाने १२ । किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com epaper.
dainiktarunbharat.com

**आजचा सामना**




**दिल्ली कॅपिटल्स् वि. कोलकाता नाईट रायडर्स**

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली

CIN: U36911PN2017PLC173262




## विचारपुष्प



हि समाजासोबत एकतेची भूमिका पार पाडणे हे संघ प्रतिज्ञेचे उद्दिष्ट आहे. सर्वत्र निराशेचे वातावरण असतानासुद्धा आपल्याला समर्थ, संघटित आणि संपूर्ण विश्वाला मार्गदर्शन करण्यासाठी सक्षम हिंदू राष्ट्राचे पुनर्निर्माण करायचे आहे. कर्तव्यापासून दूर जाण्याच्या प्रसंगात आपल्याला सावरण्यासाठी प्रतिज्ञा हा आधार असतो. जर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य प्रयत्न केले गेले तर हिंदू राष्ट्राच्या भाग्याचा सूर्य लवकरच क्षितिजावर उदितमान होईल.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

## श्री परशुराम जन्मोत्सव आज



# पाकिस्तानी लष्करात बंडाचा झेंडा

## युद्धाच्या भीतीने अधिकारी गार; राजीनामा देण्यासाठी लष्करप्रमुखावर दबाव

**◆ इस्लामाबाद, २८ एप्रिल**

**येत्या काही दिवसांमध्ये भारताकडून लष्करी कारवाई होण्याच्या भीतीने पाकिस्तानी लष्करात खळबळ माजली आहे. युद्धाच्या कल्पनेने गर्भगळीत झालेले सैनिक आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून राजीनामा देण्याबाबतच्या नोटीस प्राप्त होत आहेत. तसेच नोकरीचा त्याग करण्याची मानसिकता निर्माण होत आहे. तसेच लष्करप्रमुखांनी राजीनामा द्यावा,यासाठी लष्करातील बड्या अधिकाऱ्यांकडून दबाव येत असल्याचे वृत्त आहे.**



इंटर सर्व्हिस पब्लिक रिलेशन महानिरीक्षक मेजर जनरल फैसल मलिक यांनी लष्करातील सर्व अधिकारी आणि जवानांना उद्देशून नोटीस जारी केली आहे. पहलगाम येथे मुजाहिदीन यांनी केलेल्या हल्ल्यात २६ नागरिक ठार तर १७ जखमी झाल्याने लष्करात असंतोष वाढत आहे. या घटनेमुळे युद्ध भडकण्याची भीती निर्माण झाल्याने मोठ्या प्रमाणात राजीनामे देण्यात येत असून नोकरीचा त्याग करणारी पत्रेही पत्र प्राप्त होत आहेत. जे सैनिक राजीनामा देतील किंवा नोकरी सोडून जातील त्यांच्याविरोधात १९५२ च्या लष्करी कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येईल, अशी धमकी फैसल मलिक यांनी दिली आहे. तसेच देशाच्या संरक्षणासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिज्ञापत्र अपलोड करा, भिती घालवा आणि ठामपणे उभे राहा, अशा शब्दात सैनिकांचे नैतिक धैर्य वाढविण्याचा प्रयत्नही करण्यात आला आहे. २६ एप्रिल रोजी पाकिस्तानी लष्करात पत्र वितरीत करण्यात आले आहे. राजकीय अस्थिरता आणि आर्थिक संकटाने त्रस्त



झालेल्या शरीफ सरकार लष्करातील घडामोडींमुळे अतिरिक्त ताण येत असल्याने परिस्थिती बिकट झाली आहे. ◀(वृत्तसंस्था)

**पाकिस्तानच्या १६ युट्यूब चॅनेल्सवर भारताकडून बंदी**

वृत्त पान ३

### कनिष्ठ अधिकाऱ्यांचा इशारा

लष्करप्रमुख मुनीर पदाचा आणि लष्कराचा गैरवापर करीत असून देश १९७१ च्या स्थितीवर येऊन पोहचला आहे. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्याविरोधातील कारवाई आणि २०२२ च्या निवडणुकीतील गैरप्रकार, पत्रकारांची मुस्कटदाबी यामुळे लष्कराची प्रतिमा मलीन झाली आहे. आम्ही हे होऊ देणार नाही. त्यामुळे मुनीर यांनी राजीनामा द्यावा अन्यथा परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवा, अशा इशारा लष्करातील कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिला आहे.

### लष्करी अधिकाऱ्यांमध्ये उभी फूट

गुप्त असलेले हे पत्र बाहेर आल्याने पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांमध्ये उभी फूट पडल्याचे मानले जात आहे. लष्करप्रमुख आसिम मुनीर विरुद्ध माजी लष्करप्रमुख कमर जावेद बाजवा आणि फैज हामीद यांचे समर्थक, असे गट निर्माण झाले आहेत.

# भारताशी पंगा घेऊ नका

## नवाज शरीफ यांचा शाहबाज यांना सल्ला



**लाहोर** : पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने घेतलेला आक्रमक पवित्रा पाहून माजी पंतप्रधान नवाजी शरीफ यांनी भारताशी पंगा घेऊ नका, सबुरीने वागा, असा सल्ला त्यांचे धाकटे बंधू शाहबाज शरीफ यांना दिला आहे.

नवाज शरीफ पंतप्रधान असताना कारगील युद्ध झाले होते आणि त्यावेळी जगभरात पाकिस्तानची नाचक्की झाली होती. सिंधू पाणी वाटप करार स्थगित केल्यानंतर शाहबाज यांनी सुरक्षाविषयक समितीची बैठक बोलावली होती. यासंदर्भातील माहिती शाहबाज यांनी लाहोर येथील निवासस्थानी नवाज शरीफ यांना दिली. भारतासोबत संवाद वाढवून असलेले मतभेद शांततेच्या मार्गाने सोडवावेत. तणाव वाढल्यास युद्ध भडकण्याचा धोका असल्याचा इशारा नवाज यांनी शाहबाज यांना दिला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर दोन्ही देशातील वाद विकोपाला गेले आहेत. पाकिस्तान अणुयुध्दाची धमकी देत असल्याने परिस्थिती आणखी चिझळण्याची चिन्हे असल्याची चिंता नवाज शरीफ यांनी व्यक्त केली आहे.

# फ्रान्सकडून नौदलाला मिळणार २६ राफेल

## ६३ हजार कोटींच्या करारावर स्वाक्षऱ्या



**◆ नवी दिल्ली, २८ एप्रिल**

पहलगाम येथे पाकसमर्थित अतिरेक्यांनी २६ निर्दोष पर्यटकांची गोळ्या घालून निर्घृण हत्या केल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधात तणाव निर्माण झाला असतांना भारताने आज फ्रान्सकडून २६ राफेल विमाने विकत घेण्याच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

संरक्षणसचिव राजेशकुमारसिंह तसेच नौदलउपप्रमुख व्हाईस ॲडमिरल के. स्वामीनाथन यांच्या उपस्थितीत आज या संदर्भातील करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. भारतीय नौदलासाठी ६३ हजार कोटी रुपयांत भारत फ्रान्सकडून २६ राफेल विमाने विकत घेणार आहे. यातील २२ राफेल विमाने एक आसनी तर ४ विमाने दोन आसनी राहणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीने राफेल विमानांच्या या खरेदीला नुकतीच मंजुरी दिली होती. जुलै २०२३ मध्ये संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण साहित्य खरेदी परिषदेच्या बैठक़ीत २६ राफेल विमाने विकत घेण्याच्या प्रस्तावाला हिरवी झेंडी दाखवण्यात आली होती.

ही राफेल विमाने आयएनएस विक्रांत आणि आयएनएस विक्रमादित्यवर तैनात केली जाणार आहेत. ◀(तभा वृत्तसेवा)

### खास आहे राफेल-एम

- राफेल मरीन राफेल लढाऊ विमानापेक्षाही अत्याधुनिक
- आण्विक प्रकल्पांवर हल्ले करण्यास सक्षम
- ५० हजार फूट उंचीपर्यंत उड्डान करण्याची क्षमता
- एका तासात १९१२ किलोमीटर अंतर कापू शकतो
- लांबी : १५.२७ मिटर, रूंदी: ५.३४
- कमीत कमी जागेत लँड करण्याची क्षमता
- आएएनएस विक्रांतवर स्की जंप करू शकते

## महत्त्वाचे

### निर्देशांकाचा हजारी उच्चांक

**मुंबई** : मागील आठवड्यात कमी-जास्त असणारा निर्देशांक सोमवारी १००५ अंकांची मोठी उसळी घेत ८०,२१८ वर बंद झाला. निफ्टीत २८९ अंकांनी वाढून २४,३२८ वर बंद झाला. दिवसभरातील कारभारात फार्मा आणि बँक शेअर्स सर्वाधिक तेजीत होते. गेल्या आठ दिवसांपासून परदेशी गुंतवणूकदारांनी केलेली खरेदी हे बाजाराच्या तेजीला कारणीभूत ठरल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. गुंतवणूकदारांचे धोरण मागील महिनाभरापासून सातत्याने बदलते राहिले. त्यात आता त्यांनी शेअर्स खरेदीचा सपाटा लावल्याने निर्देशांक, निफ्टी वधारले.



### आता वृद्धांना मिळणार १० लाखांचे मोफत उपचार

**नवी दिल्ली** : विकास पुरी येथील मोहन गार्डन येथील रहिवासी राम सिंग नेगी हे दिल्लीतील आयुष्मान वय वंदना कार्डचे पहिले लाभार्थी बनले. केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि इतर मंत्र्यांनी त्यांना कार्ड देऊन सन्मानित केले. यावेळी त्यांनी इतर अनेक वृद्धांना कार्ड वाटले. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत, ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या वृद्धांना आयुष्मान वय वंदना कार्डच्या मदतीने मोफत आरोग्य सेवा मिळेल. या ज्येष्ठ नागरिकांना एबी पीएमजेएवाय पॅनेल रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी दरवर्षी १० लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य कव्हर मिळेल. दिल्लीतील कोणताही नागरिक या योजनेचा लाभ घेऊ शकतो. जरी त्याच्याकडे इतर कोणत्याही योजना नसतील. दिल्लीत त्यांची संख्या सहा लाखांहून अधिक असल्याचा अंदाज आहे.

# भारताचे पहिले स्वदेशी एआय मॉडेल तयार होणार

### स्टार्टअप सर्वम घेणार जबाबदारी

**◆ बंगळुरू, २८ एप्रिल**

भारत सरकारने देशातील पहिले स्वदेशी एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) मॉडेल विकसित करण्यासाठी बंगळुरू स्थित स्टर्टअप आधारित सर्वमची निवड केली आहे. चीनचे स्वस्त मॉडेल डीपसीकची वाढती लोकप्रियता पाहता भारताने हे पाऊल उचलले आहे.



**स्वदेशी**

देशातील पहिले स्वदेशी तयार करण्यासाठी आलेल्या ६७ अर्जांमधून केंद्र सरकारने सर्वम ची निवड केली आहे. स्वदेशी चे मॉडेल बनवण्यासाठी सरकारकडून सर्वमला संगणकीय संसाधनांच्या स्वरूपात मदत मिळणार आहे. सर्वम ही भारताच्या महत्त्वाकांक्षी १० हजार ३७० कोटी रुपयांच्या इंडिया एआय मिशन अंतर्गत अधिकृतपणे मान्यता मिळालेली पहिली स्टार्टअप कंपनी आहे. सरकार सध्या इतर अन्य शेकडो प्रस्तावांचे देखील मूल्यांकन करत आहे. यावर सर्वमने त्यांचे एआय मॉडेल तार्किक क्षमतांनी सुसज्ज असेल. आवाज केंद्रीत असेल आणि भारतीय भाषांमध्ये प्रवीणता विकसित करेल. हे एआय मॉडेल लोकसंख्या-स्तरीय वापरासाठी विकसित केले जाईल, असेही म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### सरकारकडून कशी मदत मिळणार?

वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, सरकार सर्वम स्टर्टअपला सहा महिन्यांसाठी ४ हजार ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्स देईल जेणेकरून ते त्यांचे मॉडेल विकसित करू शकेल आणि त्यांना प्रशिक्षण देऊ शकेल. भारतात एआय डेटा सेंटर्स स्थापन करण्यासाठी निवडलेल्या कंपन्यांद्वारे ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्स उपलब्ध करून दिले जातील.

# मुदत संपली, पाकिस्तानी नागरिकांचे काय होणार?

**◆ नवी दिल्ली, २८ एप्रिल**

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात अनेक कडक पावले उचलली आहेत. त्यात भारतात व्हिसाधारक पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्याचा निर्णयही होता. त्यासाठी पाकिस्तानी नागरिकांना एका आठवड्याच्या अल्टिमेटमचा सोमवार हा शेवटचा दिवस होता. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांना तीन वर्षांची शिक्षा आणि तीन लाख रुपये दंड होऊ शकतो. गृह मंत्रालयाने राज्यांना यासंदर्भात कडक सूचना दिल्या आहेत. आतापर्यंत ५३७ पाकिस्तानी नागरिक भारत सोडून पाकिस्तानात परतले आहेत.



व्हिसाची मुदत संपल्यानंतर सोमवारी पाकिस्तानी नागरिक मायदेशी परतले

केंद्र सरकारने रविवारी संध्याकाळी इशारा दिला होता की, जे पाकिस्तानी नागरिक निर्धारित कालावधीत भारत सोडणार नाहीत त्यांना अटक केली जाऊ शकते. त्याला तीन वर्षांचा तुरुंगवास आणि ३ लाख रुपये दंड होऊ शकतो. सरकारने कडक शब्दांत सांगितले आहे की, व्हिसा अटींचे उल्लंघन करणाऱ्या किंवा निर्धारित कालावधीपेक्षा जास्त काळ देशात राहणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. सार्क व्हिसाखाली भारतात आलेल्यांना २६ एप्रिलपर्यंत देश सोडण्यास सांगण्यात आले होते. वैद्यकीय व्हिसाची शेवटची तारीख २९ एप्रिल आहे.

अल्पकालीन व्हिसाधारकांसाठीची अंतिम मुदत संपल्यानंतर ७२ तासांत अटारी सीमेवरून ५३७ पाकिस्तानी नागरिक परतले आहेत. तर या काळात ८५० भारतीय नागरिक भारतात परतले आहेत. रविवारी २३७ पाकिस्तानी परतले आणि ११६ भारतीय देशात आले.

**नियमानुसार ३ लाख दंड, ३ वर्षे शिक्षा**

वैद्यकीय व्हिसावर, रुग्णासोबत दोन सहायक देखील येऊ शकतात. वैद्यकीय व्हिसावर येणाऱ्या नागरिकांना कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागू नये म्हणून सर्व कागदपत्रांसह अटारी सीमेवर पोहोचण्यास सांगण्यात आले आहे. वैद्यकीय व्हिसाधारकांना त्यांचे उपचार कागदपत्रे तयार ठेवण्यास सांगण्यात आले आहे, जेणेकरून त्यांना तपासणी दरम्यान कोणतीही अडचण येऊ नये. भारताने नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील लष्करी सल्लागारांना ३० एप्रिलपर्यंत भारत सोडण्याचा इशारा दिला आहे. त्याचा कालावधीही २४ तासांत पूर्ण होत आहे.

पहलगाम हल्ल्याचे प्रत्युत्तर म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला होता. भारतीय नौदलाने समुद्रात युद्धसराव सुरू केला आहे. ◀(वृत्तसंस्था)

## राजधानीत उच्चस्तरीय बैठकांचे सत्र

**◆ नवी दिल्ली, २८ एप्रिल**

पहलगाम येथील निरपराध पर्यटकाच्या हत्याकांडानंतर देशभर प्रक्षोभ उफाळून आला असतांना गेल्या काही दिवसांपासून राजधानी दिल्लीत पाकिस्तानवर कठोर कारवाई करण्याच्या संदर्भात बैठकांचे सत्र सुरु आहे. आजही दिल्लीत दिवसभर उच्चस्तरीय बैठकी झाल्या. यावरुन लवकरच पाकिस्तानविरोधात सरकार कठोर कारवाई करणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

आज सकाळी संरक्षणमंत्री राजनाथसिंह साऊथ ब्लॉकमधील संरक्षण मंत्रालयात पोहोचले, याठिकाणी त्यांना लष्करप्रमुखांनी लष्कराच्या एकूणच तयारीबाबत माहिती दिली. त्यानंतर राजनाथसिंह ७ लोककल्याण मार्ग या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अधिकृत शासकीय निवासस्थानी पोहोचले. या बैठकीत राजनाथसिंह यांनी मोदी यांना पहलगाम घटनेनंतर खोऱ्यात सुरक्षा दल करत असलेल्या कारवाईची तसेच लष्कराच्या सुसज्जतेबाबत माहिती दिली. मोदी आणि राजनाथसिंह यांच्यात ४० मिनिटे चर्चा झाल्याचे समजते. ◀(तभा वृत्तसेवा)

# सोलापूरचे अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्यासह महाराष्ट्रातील ९ मान्यवर पद्म पुरस्काराने सन्मानित

**नवी दिल्ली, २८ एप्रिल**

देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असणाऱ्या 'पद्म पुरस्कारां'चे वितरण सोमवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाले. यामध्ये महाराष्ट्रातील ९ मान्यवरांना त्यांच्या क्षेत्रातील अतुलनीय योगदानासाठी 'पद्म पुरस्कार' प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती भवनातील समारंभात पद्म पुरस्कार राष्ट्रपती यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यामध्ये सोलापूरचे अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांना वन्यजीव अभ्यासक, साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील कामगिरीसाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक शेखर कपूर आणि गझल गायक पंकज उधास (मरणोत्तर) यांना 'पद्मभूषण पुरस्कार' तर अरुंधती भट्टाचार्य,



पवनकुमार गोयंका व्यापार व उद्योग क्षेत्रातील योगदानासाठी, जस्पिंदर नरुला, रानेंद्र भानू मजुमदार, वासुदेव कामत यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी व चैत्राम पवार यांना पर्यावरण आणि वनसंवर्धन, सामाजिक क्षेत्र यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात उपराष्ट्रपती जगदीप धनकड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, तसेच अन्य केंद्रीय मंत्रीगण उपस्थित होते.




# १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने झळकावले शतक

### शतक झळकावणारा आतापर्यंतचा सर्वाधिक तरुण खेळाडू

**जयपूर** : आयपीएलमध्ये सलग पाच पराभवांनंतर १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या शतकामुळे राजस्थान रॉयल्सला विजय मिळवून देण्यात मदत झाली. त्यांनी गुजरात टायटन्सचा ८ विकेट्सने पराभव केला. राजस्थानने जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गुजरातने ४ विकेट गमावून २०९ धावा केल्या. राजस्थानने १६व्या षटकात २ विकेट्स गमावून लक्ष्य गाठले. गुजरातकडून शुभमन गिलने ८४ आणि जोस बटलरने ५० धावा केल्या. राजस्थानकडून वैभवने १०१ आणि यशस्वी जैस्वालने ७० धावा केल्या. रियान पराग ३२ धावा करून नाबाद राहिला.

## महत्त्वाचे...



### हिराचंद नेमचंद महाविद्यालयात अकरावी विद्यार्थ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, महाविद्यालयात इयत्ता अकरावीचा निकाल जाहीर झाला. यामध्ये अकरावीच्या परीक्षेत इयत्तानिहाय गुणानुक्रमे प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या मध्ये पुजा सोमाणी, तनिष्का काटवे, राज मुंडदा, अंकिता कमलापुरे, रिया गांधी, अक्षरा इनानी, वैष्णवी म्हेत्रे, वंदाळ लावण्या, बाबर साक्षी, लड्डा निरज, बनकर पार्थ यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा होते. तसेच निकाल समन्वयक प्रा.डि.ए.गोरनाळे कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्राध्यापिका सारिका महेंद्रकर,गुणवंत विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका समिना रंगरेज यांनी केले. त्यानंतर उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शैक्षणिक साहित्य, वाचनासाठी उपयुक्त पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. सत्यजित शहा यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.प्रमोद वाडकर यांनी केले. प्राध्यापिका स्मिता मगदुम यांनी आभार मानले.



### सोलापूरच्या ७१ जणांनी दिली वीरशैव सिद्धांत परीक्षा

**सोलापूर, दि. २८ एप्रिल**

वीरशैव धर्म सर्व समाज बांधवांना कळण्यासाठी महत्वाचे आहे. 'धर्म' ची महानता, सर्व विधींचे महत्व, मूल पंचाचार्य, वीरशैव धर्म स्थूल इतिहास, पंचपीठे परंपरा आणि कार्य, आद्य जगद्गुरूंची परंपरा, अनेक संत, शरण, शरणींनी केलेले महान कार्य, धर्मातील विधी,नियम, मानवता, प्राचीनता आदि सर्व गोष्टींचे परिचय वीरशैव बांधवांना व्हावे, यासाठी वीरशैव सिध्दान्त प्रबोध, प्रवीण आणि पंडित परीक्षाचे आयोजन करण्यात आले होते. ही परीक्षा जगद्गुरु विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ जंगमवाडी मठ वाराणसी काशी महापीठ यांच्यामार्फत घेण्यात आली. या परीक्षेत महाराष्ट्र व मध्यप्रदेशातून ८०० परीक्षार्थी उपस्थित होते. सोलापूरात एसव्हीसीएस केंद्रातून ७१ परीक्षार्थींनी परीक्षा दिली. परीक्षार्थींना काशापीठाचे जगद्गुरु श्री. १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी परीक्षा केंद्राला भेट देऊन आशीर्वाद दिले. याप्रसंगी श्री बृहन्मठ होटगी संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी, केंद्रप्रमुख संदीप स्वामी, सहकेंद्रप्रमुख भुवनेश्वर म्हेत्रे, पर्यवेक्षक पंडित स्वामी, वाघेश शास्त्री, ओंकार मुंडे, परीक्षा विभागचे प्रमुख बलसुरे उपस्थित होते.

### मंत्री ॲड. आशिष शेलार आज जिल्हा दौऱ्यावर; अक्कलकोटला श्री स्वामी समर्थांचे घेणार दर्शन

**सोलापूर दि.२८ एप्रिल-**



माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार हे मंगळवार, दि.२९ एप्रिल २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थांचे ते दर्शन घेणार आहेत. यानंतर ते शिर्डीला रवाना होणार आहेत. दि.२९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ७.०० वाजता कलिना विमानतळ येथून खाजगी विमानाने सोलापूरकडे प्रयाण, सकाळी ८.०० वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन. यानंतर सकाळी ८.१५ वाजता सोलापूर विमानतळ येथून रस्तेमार्गे अक्कलकोटकडे प्रयाण, सकाळी ९.०० वाजता अक्कलकोट येथे आगमन व राखीव. यानंतर श्री स्वामी समर्थ दर्शन, सकाळी ११.०० वाजता अक्कलकोट येथून रस्तेमार्गे सोलापूर कडे प्रयाण, सकाळी ११.४५ वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन, दुपारी १२.०० वाजता सोलापूर विमानतळ येथून शिर्डी विमानतळाकडे प्रयाण करतील.

### पोलीस मुख्यालयासमोरील रस्त्यावर कार पलटी; दोड्डी येथील चौघे जखमी

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

ग्रामीण पोलीस मुख्यालयासमोर चालकाचा कारवरील ताबा सुटून कार पलटी झाल्याने चौघे जखमी झाले. हा अपघात रविवारी रात्री ९ च्या सुमारास घडला असून जखमींमध्ये दोड्डी येथील चौघांचा समावेश आहे. कुणाल लिंबाजी सुर्वे (वय २५), सिध्दू संगप्पा वाघे (वय ५०) व भाग्यश्री संगप्पा वाघे (वय ४५) व शिवाजी माने (सर्व रा. दोड्डी ता. द. सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. वरील सर्वजण हे रविवारी रात्री विको प्रोसेस येथून पोटफाडी चौकाच्या दिशेने कारमध्ये बसून जात होते. त्यांची कार ग्रामीण पोलीस मुख्यालयासमोर आली असता, अचानक कार चालवणा-याचा कारवरील ताबा सुटल्याने कार पलटी झाली. यात कुणालच्या चेहरा व डोक्याला जखम झाली. सिध्दच्या डोक्याला आणि चेह-याला तसेच हनुवटीजवळ जखम झाली तर भाग्यश्री यांच्या डोक्याला जखम झाली. त्याचबरोबर शिवाजी यांच्या उजव्या हाताला मार लागल्याने नातेवाईक गणेश काळे यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले.

### घाण पाण्याच्या नाल्यात सापडलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

लष्कर परिसरातील वसंतराव नाईक शाळेमागील घाण पाण्याच्या नाल्यात सापडलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. हा प्रकार सोमवारी सकाळी ९.३० च्या सुमारास उघडकीस आला.योगेश शावरप्पा तिपरातकर (वय ४७, रा. उत्तर सदर बझार, सोलापूर) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. लष्कर परिसरातून घाण पाण्याचा नाला वाहतो. या नाल्याच्या पाण्यात सोमवारी सकाळी ९.३० वाजता योगेश हा निपचित पडलेला आढळून आला. पोलीस हवालदार मनोहर यांनी त्यास लोकांच्या मदतीने पाण्यातून काढून सकाळी १०.२० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

# साडेपाच हजार पोलिस डीजी लोनपासून वंचित

## ऑगस्ट २०२३ पासून मिळाला नाही लाभ; अंमलदारांना लाभाची प्रतिक्षा

### मुख्यमंत्री तथा गृहमंत्री फडणवीस यांनी लक्ष घालण्याची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

पोलीस खात्यातील प्रत्येक अंमलदाराला त्याचे स्वतःचे घर मिळावे. या करीता शासनाकडून डीजी लोन (पोलीस गृहबांधणी अग्रीम) योजना राबविण्यात आली आहे. मात्र ऑगस्ट २०२३ पासून आतापर्यंत राज्यातील ५ हजार ४५९ पोलीस अंमलदारांनी या करीता अर्ज केले आहे. परंतु शासनाकडून एकही अर्ज मंजूर न झाल्याने राज्यातील पोलीस अंमलदार डीजी लोनमुळे स्वतःच्या हक्काच्या घरापासून वंचित राहिले आहे. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नामध्ये लक्ष घालून डीजी लोनचे पैसे वितरीत करावेत, अशी अपेक्षा पोलिस कर्मचाऱ्यांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्र पोलिस दलासाठी डीजी गृह कर्ज योजना अत्यंत महत्वाची आहे. याम ुळे अंमलदार यांना घर बांधण्यासाठी थेट पोलिस गृहविभागाकडून मूळ वेतनाच्या

**घरबांधणी अग्रीमसाठी १७६८.०८ कोटींची आवश्यकता...**

पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत १२९० कोटी आणि त्यानंतर १६४७ कोटी रुपयांचे कर्ज विविध बँका आणि वित्तीय संस्थामार्फत उभारण्याचा प्रस्ताव सादर झाला होता. मात्र हा प्रस्ताव गृहविभागाकडून शासनाच्या वित्त विभागाकडे सादर करण्यात आला आहे. पोलीस महासंचालक कार्यालय व पोलीस आयुक्त कार्यालय यांचे घरबांधणी अग्रिमसाठीची एकूण मागणी ही १७६८. ०८ कोटी इतकी आहे.

**राज्यातून ४ हजार ७११ तर मुंबईतून ७४८ अर्ज...**

डीजी लोन करीता शासनाकडे राज्यभरातून सुमारे ४ हजार ७११ आणि मुंबईतून ७४८ इतके अर्ज दाखल केले आहे. हे संपुर्ण अर्ज ऑनलाईन पद्धतीने शासनाकडे सादर करण्यात आले आहे. यामध्ये ४ हजार ७११ अर्जाकरीता १२५५ कोटी ८७ लाख रुपयांची तर बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयातंर्गत ७४८ प्रलंबित अर्जासाठी २१२ कोटी २० लाख रुपयांची आवश्यकता आहे.

**अर्ज केलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेचे खच्चीकरण...**

डीजी लोनसाठी अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांनी खासगीत पैसे ॲडजेस्ट करून जागा घेतल्या आहेत. या जागेवर सर्व कागदपत्रांची पुर्तता करून दुय्यम निबंधक कार्यालयातून या जागेचे शासनाला गहाणखत करून दिलेले आहेत. शासनाला गहाणखत करून देऊनदेखील डीजी लोनचे पैसे अद्यापपर्यंत न आल्याने या कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेवर मोठा परिणाम होऊ लागला असून तणावामुळे कर्मचाऱ्यांच्या कामावर मोठा परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. या तणावामुळे आगामी काळात एखादी दुर्दैवी घटना घडली तरच शासन डीजी लोनचे पैसे देणार का असा सवाल पोलिस कर्मचाऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे.

१२५ टक्क्या पर्यंतचे कर्ज मिळते. ज्या अधिकारी व अंमलदारांकडे स्वतःचे निवासस्थान नाही. अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे स्वतःचे हक्काचे घर मिळावे या करीता ही योजना राबविण्यात येते. ऑगस्ट २०२३ पासून ते आजतागायतपर्यंत राज्यातील सुम ारे पाच हजार ४५९ अंमलदारांनी डीजी लोन करीता अर्ज दाखल केले आ-हे. परंतू अद्यापर्यंत शासनाकडून योजनेतील एकाही अंमदाराचा अर्ज मंजूर झालेला नाही. शासनाकडे डीजीलोन या गृहकर्जाचे असंख्य अर्ज प्रलंबित असल्यामुळे पोलिस कर्मचाऱ्यांमध्ये गृहकर्जाच्या मदतीची तीव्र गरज असल्याचे दिसून येत आहे.

## उजनीतून सोडलेल्या पाण्यावर कर्नाटक वासियांचा डल्ला

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची खंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

यावर्षी उजनी धरणात मुबलक पाणीसाठा झाल्याने जिल्हातील शेतकरी बांधवांसाठी यंदा एक जास्तीचे पाण्याचे आवर्तन सोडण्यात असून, सोडलेल्या पाण्यावर कर्नाटकवासीय डल्ला मारीत असल्याची खंत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी प्रतिवर्षी उजनी धरणातून कमी-जास्त पाणी सोडण्यात येते. एखाद्यावर्षी दुष्काळी स्थिती निर्माण झाल्यास अनेक शेतकऱ्यांची पिके पाण्याअभावी जळून जातात; अशा वेळी आमचाही नाईलाज असतो. यंदा मात्र उजनी धरणात मुबलक पाणी असल्याने आणि शेतकरी बांधवांना उत्पादन मोठ्या प्रमाणात घेता यावे यासाठी एक आवर्तन वाढवून देणार आहे. पाणी वाया जात असल्याच्या तक्रारीही येत आहेत मात्र जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठीच हे पाणी सोडले जात आहे. यामुळे विद्युत पुरवठाही जास्त खंडित केला जात नाही.

या कालावधीत नदीकाठचे अनेक शेतकरी आपले विहिर, शेततळी मोठ्या प्रमाणात भरून घेत आहेत. या पाण्यातून जिल्ह्यातील उत्पादनाचा टक्का वाढणार आहे. जिल्ह्यातील केळी, दाळिंब, द्राक्षबागा, आंबा व इतर फळबागांना याचा मोठा फायदा झाला आहे आणि होत आहे. मे महिन्यातही शेवटचे आवर्तन असल्याने त्या काळातही पाणी सोडण्यात येणार आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा असा आमचा हेतू आहे मात्र कर्नाटकातील शेतकऱ्यांचाच जास्तीचा फायदा होत असल्याची खंत जिल्हाधिकाऱ्यांना वाटत आहे.

**जिल्ह्यातील नागरिकांना पाणीटंचाई भासू देणार नाही**

आगामी उन्हाळ्यात जिल्ह्यातील एकाही गावास किंवा वाडी-वस्तीस पाणी टंचाई भासू देणार नाही. यासाठी मागेल त्या गावकऱ्यांना पाणीटँकर देणार आहोत. याचे अधिकार प्रांत आणि तहसीलदारांना दिले आहेत. त्यांना पाणीटँकरबाबतचे काही निकष दिले आहेत; त्यानुसार त्यांचा अहवाल प्राप्त होताच पाणीटँकर देण्यात येणार आहेत. सध्या माळशिरस तालुक्यात ६ आणि मंगळवेढा तालुक्यात १ पाणीटँकर चालू आहे. दरम्यान, ज्या भागात पाणीटंचाई जाणवेल त्या गावकऱ्यांनी संबंधित तहसीलदार, प्रांताधिकाऱ्यांकडे पाणीटँकरची मागणी करावी, असेही आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

## अखेर सोलापुरातून २६मेला स.८:५०ला उडणार विमान

### विमानसेवेचा २६ मे पासून श्रीगणेशा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

सोलापूरसाठी २६ मे रोजी कोणत्याही स्थितीत विमानसेवा सुरू होणार आहे. याची सुरुवात गोव्यापासून होईल. नंतर मुंबईलाही विमानसेवा सुरू होईल, असा ठाम विश्वास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. २८) व्यक्त केला. दरम्यान, या विमानसेवेबाबत फ्लाय ९१ कंपनीचा मेलही आल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली असून, २६ रोजी सकाळी ८ वाजून ५० मिनिटांनी पहिले विमान उडणार असल्याचे त्यांनी नमूद केले.



गेल्या अनेक वर्षापासून सोलापूरचे नागरिक विमानसेवेची वाट पाहत आहेत. तारीख पे तारीख पडत आहे. तरीही प्रशासकीय पातळीवर त्या दिशेने वेगवान हालचाली सुरू झाल्याचे दिसत आहे. कारण जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ही सेवा लवकर कार्यान्वित होण्यासाठी फारच परिश्रम घेतले होते. त्या अनुषंगाने आता प्रवासी विमानसेवा कार्यान्वित होण्यासाठी मेल आल्याने त्यांचाही आनंद द्विगुणीत होत आहे. सुरूवातीला गोव्यातून सोलापूरला सकाळी ७ वाजून २० मिनिटांनी विमान येणार आहे आणि सोलापूरहून ८ वा. ५० मिनिटांनी गोव्याला उडाण घेणार आहे. यासाठी पहिले १० दिवस तिकिटांची बुकिंग्ही होणार आहे.

सोलापूरच्या विमानसेनेचे उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाल्यानंतर ही विमानसेवा सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंच, चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी, माजी आ. संजयमामा शिंदे, आ. सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रचंड परिश्रम घेतले होते. विधानसभा निवडणुकीपूर्वी एका पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री मोहोळ यांनीही निवडणुका पार पडताच सोलापूरकरांना विमानसेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजतागायत ही विमानसेवा सुरू झाली नाही. गेल्या अनेक वर्षापासून सुरु असलेल्या मागणीला यश येत नसल्याने सोलापूर विकास मंचचे सदस्य, चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी, स्थानिक उद्योजकांतूनही नाराजी निर्माण होत होती. तरीही येत्या १६ मेपासून सोलापूर विमानसेवेची तिकीट बुकींग सुरु होणार आहे.

## 'दीपबंधन'मधून रस्त्यावरील कुत्र्यांना बेल्टचे वाटप

### प्राण्यांच्या सुरक्षेसाठी स्वराज संस्थेचे महत्त्वपूर्ण पाऊल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी, नोकरी व व्यवसाय करणारे ८८ सदस्य एकत्र येऊन समाजातील विविध उपक्रमांमधून विधायक कार्य करून स्वखर्चातून लोकांना आधार देण्यासाठी स्वराज संस्थेची निर्मिती केली. स्वराज संस्थेतर्फे सुरू करण्यात आलेला दीपबंधन उपक्रम शहरातील प्राणिमित्रांच्या मनाचा ठाव घेत आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यांवर फिरणाऱ्या कुत्र्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी रिफ्लेक्टीव बेल्ट लावण्याचा हा उपक्रम आहे.

दीपबंधन हे केवळ एका उपक्रमाचे नाव नाही, तर माणसाचा मुक्या जीवांशी जोडलेल्या प्रेमाच्या आणि जबाबदारीच्या नात्याचे प्रतीक आहे. वाहनांच्या प्रकाशात चमकणारे हे रिफ्लेक्टीव बेल्ट रात्रीच्या वेळी कुत्रे सहज दिसण्यास मदत करतात आणि त्यांच्यावर तसेच वाहनचालकांवर होणाऱ्या अपघातांची शक्यता लक्षणीयरीत्या कमी करतात. आपण जसे आपल्या कुटुंबाची काळजी घेतो, तसेच या मुक्या जीवांचीही आपलेपणाने काळजी घ्यायला हवी, असे मत स्वराज संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा स्वराली सुधा रविंद्र भोसले यांनी व्यक्त केले.



**उपक्रमात सहभागी सदस्य**

स्वराली सुधा रविंद्र भोसले, निरंजन कुलकर्णी, व्यंकटेश इटेकर, दिपा नारायणकर, ऋतुजा कमले, मयूरेश गवळी, अर्णव कुलकर्णी, दिपक पांडे, महेश प्रधाने, पार्थ भोसले, आकाश कोठाडिया, मनिष परदेशी, मयुर बनसोडे, चैतन्य शेटे, आदिती भोसले, मुदिता वाघमारे, श्रद्धा गाडेकर, दिपा स्वामी, कुणाल जैन, श्रेयस राऊत, प्रथमेश ओहोळ, अभिषेक कुलकर्णी, उत्कर्ष उंबरजे, मनस्वी, आकांक्षा, राहुल आदि

या उपक्रमात स्वराज संस्थेच्या सदस्यांनी मिळून एकूण १३० कुत्र्यांना रिप्लेक्टीव बेल्ट लावले. स्वराज संस्थेकडून सहा वर्षांत गरजू लोकांना अन्नदान, गणपती मूर्तीकारांच्या मुलांमध्ये शैक्षणिक आवड निर्माण करणे, ऊन्हाळ्यात मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्यासाठी ५० पाण्याची टाकी वाटप, लॉकडाऊनमध्ये स्वखर्चातून अन्नधान्य किट देणे, फूटपाथावरील लोकांना शाल, चादर, चटई देणे तसेच ऊन्हाळ्यात पादत्राणे नसणाऱ्या एक हजार लोकांना पादत्राणे उपलब्ध करून देणे असे उपक्रम राबविले आहेत.

### ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत राष्ट्रीय हेल्पलाईन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन एल्डर लाईन १४५६७ ही टोल फ्री हेल्पलाईन सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार, मार्फत देशभरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या निवारणासाठी, सर्व राज्यात सुरु करण्यात आली आहे. सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि जनसेवा फौंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यामध्ये ज्येष्ठांसाठीची ही राष्ट्रीय हेल्पलाईन जनसेवा फौंडेशनद्वारे चालवली जात आहे.

या राष्ट्रीय हेल्पलाइन चा उद्देश हा भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक विश्वासार्ह राष्ट्रीय हेल्पलाइन तयार करून ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणे तसेच अत्याचार ग्रस्त वृद्ध व्यक्तींची काळजी घेणे हा आहे.

# रोजंदारी-बदली कामगारांना कायम करावे

### महापालिका कामगार संघटना कृती समितीचे १ मे रोजी धरणे आंदोलन

### कामगार नेते अशोक जानराव यांचा निवेदनाद्वारे इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

महापालिकेतील रोजंदारी-बदली कामगारांना कायम करण्याचा आकृतीबंध मंजूर करा या मागणीसाठी महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने कामगार दिनाचे औचित्य साधून गुरुवार, दि. १ मे रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे, असा इशारा कामगार नेते अशोक जानराव यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

याबाबत समितीने महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सन १९९२ मध्ये हद्दवाढ होऊन शहराचे क्षेत्रफळ सहापटीने वाढले.त्यात ११ गावांचा सम ावेश झाला. त्यामुळे कामगारांची संख्या कमालीची अपुरी वाटत होती. नागरिकांची फारच गैरसोय होत होती. नविन रोजंदारी कामगारांची महापालिकेला भरती करता येत नव्हती, त्याचे कारण मनपाने नविन रोजंदारी कामगारांची भरती यापुढे करणार नाही, असे राज्य शासनाला लेखी प्रतिज्ञापत्र दि. ६ एप्रिल १९९५ रोजी दिले होते. त्यामुळे गरज असुनही नविन रोजंदारी कामगारांची भरती करता येत नव्हती. शहरवासीयांना महापालिकेकडून सेवा, सुविधा मिळत नसल्याने जनक्षोभ वाढलेला होता. तो कमी करण्यासाठी २४९ कामगारांना रोजंदारीवर नेमणुका देण्याचे काम कनिष्ठ अधिकाऱ्यांनी केले.

या २४९ रोजंदारी कामगारांच्या नेमणुका तत्कालीन आयुक्तांनी केलेल्या आहेत. हे सर्व रोजंदारी, बदली कामगार बॅकडोअर चे आहेत. त्यांच्या नेमणूका या बेकायदेशीर आहेत, असे राज्य शासनाचे नगरविकास विभाग म्हणते. या रोजंदारी कामगारांना गेली ३० वर्षे महापालिकेच्या सक्षम मान्यतेनेच पगार मिळतो. अनेक तत्कालीन आयुक्तांनी त्यांच्या रोजंदारीच्या पगारात वाढ केलेली आहे, ती सक्षम मान्यतेशिवाय होतच नाही. आकृतिबंधाप्रमाणे जागा शिल्लक नाहीत, अशा सबबी सांगुन सेवेत कायम करण्याचे टाळले जाते. दि. २५ जानेवारी २०२२ रोजी तत्कालीन नगरविकास मंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्ही.सी. द्वारे बैठक घेवून त्या २४९ रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करा असे स्पष्ट सांगितले होते. त्याप्रमाणे या कामगारांना कायम करणे क्रमप्राप्त असताना कामगारांनी नियुक्ती पत्रे आणावी, वेतन पत्रिका द्यावी, हजेरीबूक आणावे, पगारबील आणावे असे कामगारांचे शिबीर घेवुन महापालिकेचे अधिकारी सांगत आहेत. ही कागदपत्रे कार्यालयात असतात. कामगारांच्या घरात नसतात हे प्रशासनाला माहित असुनही केवळ वेळ काढूपणा, कामगारांची दिशाभुल आणि फसवणुक केल्याचा आरोप केला आहे.

२४९ रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे प्रशासक या नात्याने आयुक्तांनी २४९ नविन जागा निर्माण करण्यासाठी आकृतीबंध मंजुर करुन अंतिम मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठवावा. हा अधिकार फक्त आयुक्तांना आहे, त्या अधिकाराचा आयुक्तांनी वापर करावा. याकडे लक्ष वेधण्यासाठी दि. १ मे कामगार दिनादिवशी रोजंदारी कामगार लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात येणार आहे, असे कामगार नेते अशोक जानराव यांनी या निवेदनात म्हटले आहे.



### शिवसेना बांधकाम कामगार सेना पदाधिकाऱ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि २८ एप्रिल**

शिवसेना बांधकाम कामगार सेना महाराष्ट्र राज्य शिवसेना बांधकाम कामगार सेना अक्कलकोट तालुका अध्यक्षपदी समर्थ गडलिंगप्पा बिराजदार यांची निवड झाली.

शिवसेना बांधकाम कामगार सेना तालुका उपाध्यक्षपदी संदीप स्वामीनाथ राचेटी व बांधकाम कामगार सेना अक्कलकोट तालुका महिला आघाडी तालुका प्रमुखपदी अनिताताई घोडके व तालुका उपप्रमुखपदी लताताई गायकवाड, बांधकाम कामगार शहर उपप्रमुखपदी आकाश बबलाद, तालुका बांधकाम कामगार सचिव पदी समर्थ गावडे यांची निवड करण्यात आली. बांधकाम कामगार सेना महाराष्ट्र राज्याचे प्रमुख प्रीतम धारिया यांच्या आदेशाने शिवसेना सोलापूर जिल्हा अध्यक्ष अमोलबापू शिंदे यांच्या हस्ते व बांधकाम कामगार सेना जिल्हा अध्यक्ष तेगेळी बांधकाम कामगार सेना जिल्हा उपप्रमुख स्वामीनाथ हेगडे, बांधकाम कामगार सेना जिल्हा संघटक वैशालीताई हावनूर, शिवसेना महिला आघाडी शहर उपप्रमुख वर्षाताई मेत्रे यांच्या उपस्थितीत तालुक्याचे बांधकाम कामगार सेना पदाधिकारी निवड करण्यात आले. त्यांचा शिवसेना सोलापूर जिल्हा अध्यक्ष अमोल बापू शिंदे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# धाराशिव वर्धापन दिन विशेषांक




सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छूक

एक शुभेच्छूक

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, धाराशिव

PM FME

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग धाराशिव
प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना(PMFME)
सर्व प्रकारच्या सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना लाभ

आत्मनिर्भर भारत अभियान अंतर्गत योजना ही असंघटीत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना सहाय करणेसाठी सन 2020-21 ते 2024-25 या कालावधीत राबविण्यात येत आहे

नवीन तसेच अस्तित्वातील सर्व सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे स्तर वृध्दी आणि विस्तारीकरणास अर्थसहाय्य

| | |
|---|---|
| बँक कर्जाशी निगडीत अर्थसहाय्य<br>संपुर्ण प्रक्रिया ऑनलाईन<br>पारंपारिक/ स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन<br>एकाच लाभार्थीस योजनेअंतर्गत एका पेक्षा जास्त / सर्व घटकांचा लाभ अनुज्ञेय | प्रकल्प अहवाल बनविणे व अर्ज करणे जिल्हा संसाधन व्यक्तीची मदत<br>वयोमर्यादा किमान 18 वर्षे, शिक्षणाची अट नाही<br>योजनेत ग्रामिण क्षेत्राबरोबर नगरपंचायत, महानगर क्षेत्रातील वैयक्तिक / गट लाभार्थीस लाभ |
| **आर्थिक मापदंड** | |
| **वैयक्तिक लाभार्थीस भांडवली गुंतवणुकीकरीता** | **लाभार्थ्यांना प्रशिक्षण** |
| पात्र प्रकल्प किमतीच्या 35 % अनुदान (जास्तीत जास्त रू. 10.00 लाखापर्यंत) | 100 % मोफत प्रशिक्षण (MCED धाराशिव यांच्या मार्फत 1 व 3 दिवसाचे प्रशिक्षण) |
| **सामाई पायाभूत सुविधा (CIF)/ मुल्य साखळी** | **स्वंय सहाय्यता गटातील सदस्यांना** |
| गट लाभार्थी, उत्पादक स्वंयसहाय्यता गट, शेतकरी उत्पादक कंपणी/ संस्था, सहकारी संस्था व अशासकीय संस्था यांना पात्र प्रकल्प किमतीच्या 35 % अनुदान (रू. 3 कोटीपर्यंत) | पात्र प्रकल्प किमतीच्या 35 % अनुदान (रू. 10.00 लाखापर्यंत)<br>बीज भांडवल रू. 40,000/- प्रति सदस्य ( ग्रामिणसाठी MSRLM व शहरीसाठी NULM मार्फत ) अनुदान |
| **मार्केटींग व ब्रॅन्डींगसाठी** | |
| पात्र प्रकल्प किमतीच्या 50% अनुदान , कमाल निधी केंद्र शासनाच्या विहीत मर्यादेत | |

अधिक माहितीसाठी संपर्क
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, धाराशिव
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धाराशिव
जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP)
संकेतस्थळ - www.pmfme.mofpi.gov.in

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छूक

मा.श्री. विलास राठोड

* तालुका सरचिटणीस भाजपा, तुळजापूर * अशासकीय सदस्य, संत सेवालाल महाराज बंजारा-लमाण तांडा ज्ञसमृद्धी योजना धाराशिव * जिल्हाध्यक्ष : राष्ट्रीय बंजारा परिषद

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

- रुपामाता नॅचरल शुगर युनिट नं. १ पाडोळी, जि. धाराशिव
- रुपामाता पावर लिमिटेड, रुपामाता नॅचरल शुगर युनिट नं. २ रोशनपुरी माजलगाव, जि. बीड
- रुपामाता नॅचरल शुगर युनिट नं. ३ देवसिंगा (तुळ) ता. तुळजापूर, जि. धाराशिव
- रुपामाता अर्बन को- ऑपरेटिव्ह केंडिट सोसायटी लिमिटेड, धाराशिव
- रुपामाता मल्टीस्टेट को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, धाराशिव
- रुपामाता मिल्क अँड मिल्क प्रोडक्ट पाडोळी, जि. धाराशिव
- रुपामाता मल्टीस्पेशालिटी को- ऑपरेटिव्ह हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर लिमिटेड, धाराशिव
- अध्यक्ष : समर्थ अर्बन को- ऑपरेटिव्ह बँक, धाराशिव
- जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, धाराशिव
- रुपामाता फाउंडेशन, धाराशिव

शुभेच्छूक

ॲड.श्री. व्यंकटराव गुंड (पाडोळीकर)

संस्थापक अध्यक्ष रुपामाता उद्योग समूह
प्रदेश कार्यकारणी सदस्य भाजपा महाराष्ट्र

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

ग्राम पंचायत कार्यालय, आंबेवाडी

ता.जि. धाराशिव

* झाडे लावा, झाडे जगवा
* पाण्याचा वापर जपून करा
* ग्राम पंचायत कर वेळेवर भरा
* पर्यावरणाचे रक्षण करा
* आपला परिसर स्वच्छ ठेवा

------------ शुभेच्छूक ------------

ग्राम पंचायत, आंबेवाडी व ग्राम पंचायत सदस्य

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

ग्रामपंचायत कार्यालय मस्सा खंडेश्वरी

श्री. त्रिंबक कचरे — सरपंच
श्री. संदिप तांदळे — उपसरपंच
कोमल दराडे — ग्रामसेवक

ग्रामपंचायत सदस्य :- जालिंदर किलचे, गीता मोहन ताटे, आशा बाळकृष्ण सावंत, इंदुबाई त्रिंबक वरपे, रेखा तुकाराम थोरात, सुनिता बाळासाहेब वरपे, विक्रम एकनाथ वरपे, गणेश बाळासाहेब शेळके, सतीश सुदाम शिंदे, सुरेखा रामलिंग माळी

शुभेच्छूक

ग्राम पंचायत, कार्यालय
मस्सा खंडेश्वरी, ता. कळंब, जि. धाराशिव

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

शिवसेना

अमीन सुबेकर
उपनगराध्यक्ष : लोहारा

शुभेच्छूक

श्री. अमीन सुबेकर
उपनगराध्यक्ष : नगर परिषद, लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

सुयशकुमार दडगुले

शुभेच्छूक

मा. सुयशकुमार दत्तु दडगुले
संस्थापक अध्यक्ष : धर्मराज प्रतिष्ठान तथा तालुका सरचिटणीस, भाजपा

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर
आ. कैलास (दादा) पाटील
आ. प्रविण स्वामी

दिपक (भैय्या) जवळगे
मा. जिल्हा परिषद, सदस्य

शुभेच्छूक

श्री. दिपक (भैय्या) जवळगे
मा. जिल्हा परिषद, सदस्य, धाराशिव

---

सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

मा. संताजी चालुक्य
जिल्हाध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, धाराशिव

मा. आशपाक सुबेदार

शुभेच्छूक

आशपाक बाबा सुबेदार
शहराध्यक्ष : भाजपा युवा मोर्चा, लोहारा

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

श्री. शिवशंकर हातरगे
तालुकाध्यक्ष : भाजपा
लोहारा तालुका

शुभेच्छूक

मा.श्री. शिवशंकर बसवंत हातरगे
तालुकाध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव

---

सोलापूर तरुण भारत

हार्दिक शुभेच्छा

वर्धापन दिनाच्या

शिवसेना

श्री. ओम शिवाजी कोरे
प्रा. सार्थक पुस्तकालय, लोहारा

सौ. आरती ओम कोरे
सभापती तथा नगरसेविका न.प. लोहारा (शिवसेना)

शुभेच्छूक

श्री. ओम कोरे सौ. आरती कोरे
लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव

## अग्रलेख...

# ‘टेरर’ आणि ‘ट्रीटी’ची फारकत!

पाक पुरस्कृत आणि प्रशिक्षित दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये क्रूर हल्ला करून पर्यटकांची हत्या केल्यानंतर भारताकडून ज्या काही प्रतिक्रिया आणि कृती अपेक्षित होत्या, त्याची सुरुवात सिंधू पाणीवाटप करारास स्थगिती देण्यापासून झाली आणि उभा देश या हल्ल्याच्या विरोधात संतापाने खदखदत असताना काहींना अचानक पाकिस्तानविषयी पुळका सुरू झाला. त्यांच्या मनातील मानवतेचे भ्याड उमाळे अचानक उचंबळून येऊ लागले आणि पाकिस्तानचे पाणी तोडण्याच्या भारताच्या जशास तशा उत्तरामुळे मने पाकिस्तानच्या सहानुभूतीने कळवळू लागली. देशाला आणि पाकिस्तानलादेखील मिळालेल्या स्वातंत्र्यापासूनच्या प्रत्येक दिवशी कोणत्या ना कोणत्या रूपाने पाकिस्तान ही भारताची डोकेदुखी ठरलेली असतानाही भारताने सातत्याने संयम दाखविला, पण ते भारताचे दुबळेपण नव्हते. गेल्या दहा वर्षांत संयमाची सीमारेषा ओलांडून भारताने दाखविलेल्या शौर्याचे चटके पाकिस्तानला सोसावे लागले, तेव्हापासून पाकिस्तानविषयी फुकाचा पुळका आलेल्या काही राजकीय, सामाजिक नेत्यांमध्ये, महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाचे नेते व काँग्रेसच्या वळचणीस राहून सत्तेच्या राजकारणासाठी स्वाभिमानदेखील गहाण टाकणारे शरद पवार यांचाही समावेश आहे. पहलगामच्या हल्ल्यानंतर मोदी सरकारने कठोर भूमिका घेतली. ते जनतेस अपेक्षितही होते आणि साहजिकही होते. कारण दहशतवादाच्या विरोधात शून्य सहनशीलता हे मोदी सरकारने जाहीर केलेले धोरणच आहे. केवळ भारतातच नव्हे, तर ज्या ज्या देशांना दहशतवादाच्या समस्येने ग्रासले आहे आणि त्याची मुळे थेट किंवा अप्रत्यक्षपणे पाकिस्तानात पोहोचलेली आहेत, त्या सर्व देशांनीही शून्य सहनशीलता धोरण अवलंबावे यासाठीदेखील भारत आग्रही आहे. म्हणूनच, पहलगाम हत्याकांडानंतर पाकिस्तानच्या विरोधात कठोर पावले उचलण्याचा मोदी सरकारचा पवित्रा देशाने मान्य केला असून, या मुद्यावर उभा देश सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभा असतानाही, पवार यांच्यासारख्या नेत्यांचे चेहरे मात्र पाकिस्तानच्या काळजीने काळवंडलेले दिसू लागले. भारताने एवढे कठोर पाऊल उचलल्यास पाकिस्तान स्वस्थ बसणार नाही, ही भविष्यवाणी तातडीने उच्चारून पवार यांनी आपल्या काळजीचे प्रदर्शन घडविले, की पाकिस्तानच्या प्रतिक्रियेविषयीचे भय व्यक्त केले, हे स्पष्ट नसले, तरी असे काही घडून पाकिस्तानची कोंडी होण्याची वेळ येऊ नये अशीच त्यांची अपेक्षा असावी हे मात्र स्पष्ट आहे. भारताने कठोर पावले उचलल्याने जळफळाट झालेल्या पाकिस्तानने प्रत्युत्तर म्हणून आता १९७२ चा शिमला करार रद्द करण्याची धमकी दिली आणि आपली भविष्यवाणी खरी ठरल्याचा आनंद पवार यांना लपविता आला नाही. पाकिस्तान गप्प बसणार नाही, तेदेखील काही कृती करतील आणि असे काही पाकिस्तानकडून होणार ही माझी शंका खरी ठरली अशी प्रतिक्रिया पवार यांनी व्यक्त केली आणि सिंधू करारास स्थगिती दिल्याने भारताचेच नुकसान होईल, असाही एक सूर उमटू लागला. एकूणच, ज्या परिस्थितीत भारताने काही कठोर भूमिका घेऊन पाकिस्तानला निर्वाणीचा इशारा दिला आहे, त्यामुळे पाकिस्तानबरोबरच देशातीलही मानवतावादाचा मुखवटा घेतलेल्या अनेकांचे धाबे दणाणले आहे. तसे का व्हावे याचे उत्तर शोधणे अवघड नाही. कारण ते केवळ एका शब्दात दडलेले आहे. मोदीद्वेष या शब्दास आता मात्र, पाकिस्तानच्या पुळक्याची जोड देऊन देशात नवे संभ्रम माजविण्यास सुरुवात झाली आहे.

म्हणूनच, पाकिस्तानची फूस असलेल्या दहशतवाद्यांच्या पहलगाममधील हिंसाचारानंतर प्रथमच देशवासीयांशी संवाद साधताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केलेली संयत भूमिका प्रशंसनीय ठरते. हा हल्ला म्हणजे आतापर्यंतच्या संयमाचे, सहनशीलतेचे आणि सहिष्णुतेचे सारे बांध तोडून टाकणारा प्रकार असल्याने त्याला सडेतोड उत्तर दिले जाईल, तो घडविणाऱ्यांना आणि त्याला फूस लावणाऱ्या किंवा त्याचे समर्थन करणाऱ्या कोणाचीही आता गय केली जाणार नाही, अशा कणखर शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी रविवारी ‘मन की बात’ या त्यांच्या नैमित्तिक संवाद कार्यक्रमात सरकारची भूमिका स्पष्ट केली. गेल्या २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात उचललेल्या प्रत्येक पावलामागची कारणमीमांसा त्यातून स्पष्ट होतेच, पण पाकिस्तानमध्ये भारतद्वेषाचा उद्रेक कशामुळे होत असावा याचाही अंदाज बांधता येतो. दहशतवादी हल्ला हा त्याच नैराश्याचा, उद्वेगाचा आणि द्वेषाचा परिणाम आहे, याबद्दल आता सरकारच्या मनात शंका नाही, हेही मोदी यांच्या वक्तव्यातून उघड झाले आहे आणि या उद्वेगाचा उद्रेक का झाला असावा याचे त्यांनी बांधलेले आडाखेदेखील लोकांसमोर आले आहेत. काश्मीरमध्ये मोदी सरकारच्या कारकीर्दीत सुरू झालेले विकासपर्व, त्यातून तेथे निर्माण होत असलेल्या रोजगाराच्या नव्या संधी, शैक्षणिक सुविधांचा लाभ घेण्याबाबत लोकांमध्ये रुजत असलेली मानसिकता, भौतिक विकासाचे नवे प्रकल्प, पर्यटनक्षेत्रात दिसू लागलेले उभारीचे दिवस व त्यातून स्थानिकांना मिळालेले आर्थिक स्थैर्य हीच या उद्वेगाची कारणे आहेत, हे सरकारचे मत आहे. असे काही झाले, की स्थैर्याच्या भावनेने आश्वस्त झालेल्या समाजात साहजिकपणे सरकारविषयी सहानुभूती वाढीस लागते आणि सरकारविरोधातील कारवायांतून अस्थिरता माजविण्याच्या प्रयत्नांस झिडकारले जाते. काश्मीरमध्ये अशांतता राहावी आणि त्याचाच फायदा घेऊन तेथील तरुणांची माथी भडकावत देशविरोधी कारवायांत त्यांना सहभागी करून घ्यावे ही पाकपुरस्कृत दहशतवादाची जुनी नीती आता फारशी कामी येणार नाही, ही या उद्वेगामागची कारणे आहेत आणि त्यातूनच हा हल्ला घडला आहे. या हल्ल्याची झळ पोहोचलेल्या प्रत्येकास न्याय मिळेल असा प्रखर विश्वास व्यक्त करताना मोदी यांनी कोणत्याही धर्म, पंथ, जात किंवा सामाजिक गटांविषयी देशातील जनतेत किंतु निर्माण होणार नाही याची संयत खबरदारी घेऊन समाजात पसरू पाहणाऱ्या भेदाची दरी बुजविण्याचाही प्रयत्न केला ही बाब जाणीवपूर्वक ध्यानात घ्यावयास हवी.

पहलगाम हल्ल्यानंतरच्या भारताच्या निर्णयांना उत्तर देण्यासाठी पाकिस्ताननेही काही पावले उचलली. केवळ शरद पवार यांनाच नव्हे, तर प्रत्येकासच ते अपेक्षित होते. पण त्यामुळे भयग्रस्त व्हावे अशी स्थिती भारतात निश्चितच नाही. म्हणूनच, ज्या करारांमुळे भारताचेच सातत्याने नुकसान होत गेले आणि पाकिस्तानसाठीच ते फायदेशीर ठरले अशा करारांच्या अटी औपचारिकरीत्या संपुष्टात आणल्यामुळे पाकिस्तानलाच त्याची मोठी किंमत मोजावी लागणार आहे. मुख्य म्हणजे, सिंधू पाणीवाटप करारास स्थगिती देण्याच्या भारताच्या निर्णयास प्रत्युत्तर म्हणून शिमला करार संपुष्टात आणण्याची धमकी पाकिस्तानने भारतास दिली असली, तरी भारताची भूमिका स्वच्छ आहे. ‘टेररिझम आणि ट्रीटी’ - म्हणजे दहशतवाद आणि करार कधीच एकत्र नांदू शकणार नाहीत. प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानने शिमला करार रद्द करण्याची धमकी दिल्याने भारतावरील काही राजनैतिक बंधनांच्या गाठी सैल होणार असून कदाचित व्याप्त काश्मीरमध्ये निर्णायक कारवाई करणे भारतालाच सोयीचे होईल, तेव्हा पाकिस्तानला मात्र, अशा संकटग्रस्त स्थितीत आपल्यासोबत कोण आहे का हे मागे वळून शोधूनच पाहावे लागेल. शिमला करारात भारत आणि पाकिस्तानातील कोणत्याही वादावर द्विपक्षीय चर्चेतून तोडगा काढण्यावर भर दिला गेला होता. मात्र त्याचेही वारंवार उल्लंघन करून भारताचा अविभाज्य भाग असलेल्या काश्मीरचा वाद आंतरराष्ट्रीय मंचावर नेण्याचा सातत्याने प्रयत्न केल्याने या कराराचा भंग याआधीही पाकिस्तानकडून झाला आहे. सिंधू करारास स्थगिती देण्याच्या भारताच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्यांना आता शिमला करार रद्द करण्याच्या पाकिस्तानच्या धमकीनंतर कोणत्या शंका येतील याचा अंदाजच बांधणे अवघड नाही. कारण, निर्णायक कृतीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याकरिता पाकिस्तान सहकार्य करत असल्याने भारतासंदर्भात मुक्तपणे शंका व्यक्त करणाऱ्यांना अशा वेळी मात्र, मूग गिळणेच सोयीचे ठरेल. ▌

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# मूर्तिभंजक अफगाण आता मूर्तिसंरक्षक

२०२१ मध्ये सत्ता हाती घेण्यापूर्वी तालिबान सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्याबाबत बोलली होती; परंतु या दाव्याबाबत अनेकांच्या मनात शंका होती. दोन महिन्यांपूर्वी तालिबान प्रशासनाने घोषणा केली की, अफगाणिस्तानमधील वारसा आणि ऐतिहासिक ठिकाणांचे संरक्षण, देखरेख आणि जतन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. ‘तो’ आपल्या देशाच्या समृद्ध संस्कृतीचा, इतिहासाचा आणि ओळखीचा भाग आहे. अनेक दशके चाललेल्या युद्धाच्या समाप्तीनंतर, बौद्ध धर्माशी संबंधित अनेक अवशेष आता खुद्द तालिबान प्रशासनाकडून उघड केले जात आहेत. उत्खननादरम्यान ते सापडल्याचा दावा केला जात आहे. याशिवाय, पूर्व अफगाणिस्तानमधील लघमान प्रांतातील गौवर्जन गावात खडकांमध्ये तयार केलेले पोकळ भाग २००० वर्ष जुन्या कुशाण साम्राज्याशी जोडले जात आहेत. हे खडकाळ खड्डे कुशाण साम्राज्याचे भांडार असल्याचे बोलले जात आहे. हे साम्राज्य एके काळी गोबीच्या वाळवंटापासून गंगा नदीपर्यंत पसरले होते. लघमानमध्ये दगडांवर ब्राह्मी लिपीमध्ये लिहिलेले शिलालेख आणि एक दगडी पाटीही सापडली असून त्यात द्राक्षे दळून वाईन बनवल्यासारखे दिसते. लघमानच्या संस्कृती आणि पर्यटन विभागाचे प्रमुख मोहम्मद याकूब अयुबी यांनी सांगितले, की अफगाणिस्तानला पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. हे अवशेष त्याचा पुरावा आहेत. येथे राहणारे लोक, मग ते मुस्लिम असोत वा नसोत; त्यांचे येथे साम्राज्य होते. तालिबान या ठिकाणांच्या सुरक्षेला महत्त्व देते. या मताला गझनी प्रांततही पाठिंबा मिळाला. तेथील संस्कृती विभागाचे प्रमुख हमीदुल्ला निसार यांनी सांगितले की, बामियानच्या बौद्ध शिल्पांचे जतन केले पाहिजे आणि भविष्यातील पिढ्यांना वारसा म्हणून सुपूर्द केले पाहिजे कारण ते आपल्या इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहेत.

हा एक महत्त्वाचा विषय आहे. मात्र, हा सांस्कृतिक वारसा १९९६ ते २००१ दरम्यानच्या पहिल्या तालिबान राजवटीत सापडला असता तर वेगळे परिणाम पाहायला मिळाले असते. २००१ मध्ये तालिबानचा संस्थापक मुला उमरने मूर्तिपूजा थांबवण्यासाठी सर्व बौद्ध मूर्ती नष्ट करण्याचा आदेश दिला आणि काही दिवसांमध्येच आंतरराष्ट्रीय निषेध असूनही बामियान येथील १५०० वर्षे जुन्या बुद्ध मूर्तींवर क्षेपणास्त्रे डागण्यात आली. लघमानचे हेरिटेज संवर्धन संचालक मोहम्मद नादिर मखवार यांनीही मागील सरकारमध्ये हेच पद भूषवले होते. ते म्हणाले की, तालिबान परतले तेव्हा लोकांना वाटत होते की ते पूर्वीसारखे ऐतिहासिक वारशांना महत्त्व देणार नाहीत; पण प्रत्यक्षात ते याला खूप महत्त्व देत आहेत. डिसेंबर २०२१ मध्ये तालिबानने अफगाण राष्ट्रीय संग्रहालय पुन्हा उघडले. त्यांनी स्वतः गैर-इस्लामिक वस्तूंचे नुकसान केले होते. २०२२ मध्ये, त्यांनी ऐतिहासिक बौद्ध स्थळ मेस आयनाक जतन करण्यासाठी ‘आगा खान ट्रस्ट फॉर कल्चर’ (एकेटीसी) कडे मदत मागितली.

आता बामियानमध्ये बुद्ध मूर्तींविषयी वारसास्थळांचे महत्त्व सांगणारे फलक दिसू लागले आहेत. ‘इंटरनॅशनल असोसिएशन फॉर द कॉन्झर्व्हेशन ऑफ ह्यूमन हेरिटेज’च्या संचालक वॅलेरी फ्रॅलँड यांच्या मते बामियान बुद्धमूर्तींचा नाश आपल्या प्रतिमेला किती हानिकारक होता, हे आता तालिबानला समजले आहे. त्यांचा असा विश्वास आहे की आता तालिबानला प्रत्येक प्रकारचा भौतिक वारसा जपायचा आहे. तथापि, तालिबानचे स्वारस्य केवळ पुतळे आणि इमारतींपुरती मर्यादित असल्याचे काही तज्ज्ञांनी उघड केले. प्रत्यक्षात इस्लामच्या नावाखाली आजही संगीत, नृत्य, लोककथा आणि महिलांशी संबंधित समस्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. उदाहरणार्थ, हेरात शहरातील ज्यूंचे जुने प्रार्थनास्थळ जतन केले गेले आहे; परंतु शहरातील प्राचीन ज्यू समुदायाच्या सद्य:स्थितीबद्दल कोणतीही बातमी नाही. तालिबानने आपल्या पहिल्या कारकीर्दीपासून अनेक आंतरराष्ट्रीय वारसा करारांवर स्वाक्षरी केली आहे. देशाच्या वारशाची हानी करणे हा त्या करारानुसार २०१६ पर्यंत ‘युद्ध गुन्हा’ बनला होता. आता या वारसा संवर्धनामुळे त्यांना पर्यटन आणि आर्थिक विकास दोन्ही साध्य करण्याची महत्त्वाची संधी उपलब्ध होऊ शकते; मात्र हे साध्य करण्याआधी तालिबानसमोर दोन मोठ्या अडचणी आहेत. एक म्हणजे पैशाची कमतरता आणि दुसरे म्हणजे पुरातत्त्व आणि वारसा यांचे ज्ञान असलेले लोक आता देश सोडून गेले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न मोठा आहे. कारण गेल्या वर्षी बामियानला भेट देणाऱ्या एका गटावर दहशतवादी हल्ला झाला होता. एकीकडे ही स्थिती असताना दुसरीकडे अफगाण तालिबानबाबत रशियाने आपल्या भूमिकेत मोठा बदल केला आहे. गुरुवारी रशियाच्या सर्वोच्च न्यायालयाने तालिबानचा दहशतवादी संघटनेचा दर्जा काढून टाकला. या निर्णयामुळे २००३ मध्ये लादण्यात आलेली बंदी संपुष्टात आली. या निर्णयाकडे मुत्सद्दी दृष्टिकोनातून तालिबानचा मोठा विजय म्हणून पाहिले जात आहे. रशियन सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय देशाच्या अभियोजन कार्यालयाने केलेल्या अपीलनंतर आला आहे. गेल्या वर्षी रशियामध्ये एक नवीन कायदा संमत करण्यात आला होता. न्यायालयांना एखाद्या संघटनेला दहशतवादी संघटना घोषित करण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्याचा तो अधिकार होता. या तरतुदीनुसार तालिबानवरील बंदी उठवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती, जी आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने पूर्ण झाली आहे. अफगाणिस्तानमध्ये अमेरिका आणि नाटो सैन्य सक्रिय असताना २००३ मध्ये रशियाने तालिबानला अधिकृतपणे दहशतवादी संघटना घोषित केले होते; पण २०२१ मध्ये अफगाणिस्तानातून अमेरिकन सैन्याने माघार घेतल्यानंतर आणि तालिबान काबूलमध्ये परतल्यानंतर रशिया आणि तालिबान यांच्यातील संबंध वाटाघाटीच्या पातळीवर आले. अलिकडच्या वर्षांमध्ये अनेक रशियन अधिकाऱ्यांनी तालिबानच्या प्रतिनिधींशी भेट घेतली आहे. आता या नव्या कायदेशीर दर्जामुळे दोन्ही देशामधील संबंध औपचारिक करण्याचा मार्ग सुकर झाला आहे. रशिया मध्य आशिया आणि अफगाण क्षेत्रात आपली राजनैतिक पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे. तालिबान राजवटीला अद्याप आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेली नाही; परंतु रशियासारख्या देशांनी उचललेली पावले त्यांच्यासाठी या दिशेने मार्ग खुला करू शकतात. काही दिवसांपूर्वी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दुबईत घेतलेली अफगाणिस्तानचे प्रभारी परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्तकी यांची भेट पाकिस्तानविरोधातील मोठी खेळी मानली जात आहे. तथापि, भारताने या संघटनेला देशाचे सरकार म्हणून मान्यता दिलेली नाही. अशी मान्यता न मिळण्यामागे त्याचा रानटी इतिहासही कारणीभूत आहे. नव्वदच्या दशकात या संघटनेने काबूल ताब्यात घेतले. येथून देशावर अतिरेकी शक्तींचे राज्य सुरू झाले. तिने महिलांना बुरखा घालण्यास आणि पुरुषांची सोबत असल्याशिवाय घराबाहेर पडू नये असे सांगितले. सध्या भारताने तालिबानला सरकार म्हणून पूर्ण मान्यता दिलेली नाही; पण तालिबानने अतिरेकी मार्गापासून दूर राहण्याची हमी दिल्याने तो या मार्गावर निघाला आहे. यापूर्वी अफगाणिस्तान पूर्णपणे पाकिस्तानच्या प्रभावाखाली होता. आता मात्र चित्र वेगळे आहे. या दोन देशांमधील संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. अशा परिस्थितीत तालिबानने बदलत असल्याचा संकेत देऊन भारताशी संबंध जोडले आहेत. ते दोन्ही देशांच्या हिताचे आहे. ▌

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# अखेर मोदींनी सोडले जलास्त्र

पाकिस्तानने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. धर्मद्वेषाने पछाडलेल्या या विकृत देशाची नांगी ठेचण्याची वेळ येऊन ठेपली आहे. गेली अनेक दशके भारताने पाकिस्तानच्या विकृत आणि राक्षसी कृत्याचा सामना केला आहे. हिंदूंच्या रक्तासाठी आसुसलेल्या पाकिस्तानविरोधात संपूर्ण देशामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, त्याचा कायमचा सोक्षमोक्ष लावण्याची मागणी देशात होत आहे. पहलगाम हल्ल्यामध्ये २८ निरपराध हिंदूंची हत्या हे अमानवीय कृत्य असून, संपूर्ण जगाने या हत्याकांडाचा निषेध करून भारताला पाठिंबा दिला आहे. या घटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी कमालीचे अस्वस्थ झाले असून, पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्यासाठी त्यांनी रणनीती आखली आहे. पाकिस्तानला वठणीवर आणण्यासाठी त्यांनी सिंधू जल वाटप करार रद्द करून जणू काही पाकिस्तानवर अणुबॉम्ब टाकला आहे. हा निर्णय वरवर जरी सहज आणि साधा वाटत असला, तरी त्याचे दूरगामी परिणाम पाकिस्तानसाठी भयंकर असे होणार आहेत.

दोन्ही देशांमधील संबंधामध्ये प्रदीर्घ काळापासून कटुता असली, तरी गेल्या ६० वर्षांपासून या करारास भारताने हात लावला नव्हता. भारत आणि पाकिस्तानने १९६५, १९७१ व १९९९ अशी तीन युद्धे लढली आहेत तसेच तीन दशकांहून अधिक काळ भारत दहशतवादाचा बळी ठरला आहे. तरीही भारताचा संयम ढळला नाही. मात्र, निरपराध हिंदूंच्या हत्याकांडानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्याचा प्रण केला आहे.



पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाने हजारो निरपराध भारतीयांचे बळी घेतले. लाखो काश्मिरी पंडितांना आपले घरदार सोडून आपल्याच देशामध्ये निर्वासित व्हावे लागले. तरीही भारताची मर्जी पाकिस्तानवर कायम होती. सर्वप्रथम २०१९ मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुलवामा हल्ल्यानंतर सिंधू नदीचे पाणी रोखण्याचा इशारा दिला होता. तो आता प्रत्यक्षात येणार आहे. सिंधू जल करारानुसार सिंधू नदीच्या खोऱ्यातील रावी, बियास आणि सतलज या पूर्वेकडील तीन नद्यांचे पाणी भारताच्या वाट्याला येते तर सिंधू नदीच्या खोऱ्यातील सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील तीन नद्यांचे ८० टक्के पाणी पाकिस्तानला दिले जाते. जागतिक बँकेच्या पुढाकाराने १९६० मध्ये पाणी वितरणाचा करार अस्तित्वात आला. परंतु, आता तो भारताने स्थगित केला असून, त्यामुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडणार हे निश्चित आहे. २०१६ च्या पाक पुरस्कृत पुलवामा हल्ल्यानंतर भारताने एअर स्ट्राईक करून पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले होते. तरीही पाकिस्तान वठणीवर येत नाही, हे बघून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टोकाचे पाऊल उचलले आहे. सिंधू जल करार स्थगित करणे ही तर प्राथमिक सुरुवात आहे. या एकाच निर्णयाने पाकिस्तानची हवा टाईट झाली आहे. तेथील राजकारण्यांचे मानसिक संतुलन ढासळले आहे. हे त्यांच्या बेताल वक्तव्यावरून सहज लक्षात यावे. नरेंद्र मोदी यांनी घेतलेला हा निर्णय एवढा भयंकर आहे. लोकांना मात्र याची जाणीव नाही. सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकपेक्षाही हा निर्णय भविष्यामध्ये प्रभावी ठरणार आहे. अणुबॉम्बपेक्षाही अचूक असे जलास्त्र नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानवर सोडले आहे. परंतु, त्याच्या परिणामासाठी आणि खात्रीसाठी देशवासीयांना काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. पाकिस्तानची ८० टक्के शेती भारताच्या या पाण्यावर अवलंबून आहे. पाकचे उद्योग भारताच्या पाण्यावर आश्रित आहेत. पाकिस्तानच्या आर्थिक विकासाचा कणाच भारतीय पाणी आहे. यास भारताने कधीच हात लावण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु, हा करार स्थगित होताच पाकिस्तान पूर्णपणे बिथरला आहे. मोदी यांच्या या एका निर्णयाने पाकिस्तानच्या पायाखालची जमीन सरकली आहे. पाक पुरस्कृत दहशतवादामुळे नाहक भारतीयाचा बळी जात आहे, हे तेथील जनतेला कळायला हवे. उद्योगपतींना कळायला हवे. तेथील शेतकऱ्यांना कळायला हवे. नंतर ते आपल्या सरकारला याचा जाब विचारतील. पहलगाम हत्याकांडावरून पाकिस्तानने स्वतःच आत्महत्या केली आहे. त्यानंतर भारताने जलास्त्र चालवून पाकिस्तानला बेचिराख करण्याची योजना आखली आहे. भारतीय जनतेने काही काळ धीर धरून त्याचा परिणाम बघण्यासाठी वाट बघावी. जनतेच्या मनामध्ये जे जे आहे, ते सर्व काही नरेंद्र मोदी करतील एवढा हा आश्वासक चेहरा नक्कीच आहे. ▌

९८८१७१७८५६

**२२ एप्रिल २०२५ ही तारीख आपल्या देशाच्या इतिहासात एकापेक्षा जास्त कारणासाठी किंवा घटनेसाठी आवर्जून नोंदवावी लागेल. त्यातली एक अत्यंत महत्त्वाची आणि साहजिक घटना म्हणजे आपल्या देशातील काश्मीर मधल्या पहलगाममधे झालेला दहशतवादी हल्ला आणि त्या हल्लयात बळी पडलेले २५ हून जास्त निरपराध हिंदू नागरिक.**

# लक्षाधीश सोने



ही घटनाच इतकी धक्कादायक , भीतीदायक होती आणि आहे की त्यामुळे त्यादिवशी घडलेली दुसरी महत्त्वाची घटना पूर्णपणे झाकोळली गेली आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी घडलेली पण ही झाकोळली गेलेली दुसरी घटना म्हणजे त्यादिवशी आपल्या देशाच्या बाजारात सोन्याचे भाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे पोचले. वरवर पाहता, निदान सकृतदर्शनी, तरी या दोन घटकांचा किंवा घटनांचा तसा थेट संबंध नाही. त्यामुळे या किंवा अशा घटना या एकमेकांचे कारण आणि परिणाम आहेत असे विधान पटकन पटणारे नाही. त्या अर्थाने पहलगाम मधे झालेला हिंदू नागरिकांवर दहशतवादी हल्ला आणि सोन्याचे भाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे पोचणे या एकाच दिवशी घडलेल्या दोन घटकांचाही तशा अर्थाने थेट संबंध नाही. एकमेकांचे कारण आणि परिणाम (Cause - Effect Relationship अशा अर्थाने) असे नातेबंध नाही. पण जरा शांतपणे आणि दीर्घकालीन विचार करायचा झाला तर याच दोन घटना असे नव्हें तर अशा स्वरूपाच्या दोन घटनांमध्ये संबंध असतो.

आणि तो संबंध पूर्णपणे बादरायण किंवा ओढून ताणून आणलेला नसतो. युद्ध, युद्धजन्य कुरबुरी, दहशतवादी हल्ला, कोरोना सारखी जागतिक प्रभाव करणारी ( तथाकथित ) वैद्यकीय आणीबाणी अशा घटकांचा आणि घटनांचा निःसंदिग्ध असा परिणाम स्थानिक आणि जागतिक बाजारात सोन्याच्या किरकोळ व घाऊक बाजारात नक्कीच होतो. असा विचार करायला लागले की लक्षात येते की २२ एप्रिल २०२५ रोजी आपल्या देशात सोन्याचे बाजारभाव १,००,००० च्या पार होण्यात पहलगाम हल्ला हे कारण नसेल आणि नाही; पण दहशतवादी हल्ला, युद्ध, रोगराई, राजकिय स्पर्धा यातून निर्माण होणारी परिस्थिती हे सोन्याचे भाववाढीचे कारण असते असाच गेल्या काही दशकांचा इतिहास आहे.

त्यामागची तर्कसंगत कारणमीमांसा आवर्जुन लक्षात घेण्याजोगी आहे. दहशतवादी हल्ला, युद्ध, युद्धजन्य परिस्थिती, कट-कारस्थान-कारवाई, प्रदीर्घ काळ चालणारी रोगराई असे घटक आणि घटना एकप्रकारची अस्थिरता, अनिश्चितता निर्माण करतात. आणि ही अशी अस्थिरता - अनिश्चितता सोन्याचे बाजारभाव चढे करतात आणि ठेवतात. अशा पार्श्वभूमीवर २२ एप्रिल २०२५ रोजी आपल्या देशात सोन्याचे बाजारभाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे नेण्यास त्याच दिवशी झालेला पहलगाम मधला हिंदु नागरिकांवरचा दहशतवादी हल्ला हे कारण नाही. आणि चुकूनमाकून असले तरी एकमेव कारण तर निश्चितच नाही. २२ एप्रिल २०२५ रोजी आपल्या देशात सोन्याचे बाजारभाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे जाण्याचे एक संभाव्य कारण आदल्याच दिवशी घडले होते. हे कारण प्रत्यक्षात घडले आहे आपल्या देशापासून भौगोलिक दृष्टया फार लांब. पण या घटनेचे संभाव्य परिणाम मात्र जेंव्हा केंव्हा होतील तेंव्हां मात्र ते आपल्या देशाच्या जवळपास होतील हे निर्विवाद ! आणि शेअरबाजारा प्रमाणेच Markets always discount the future हे वस्तू- बाजार, सेवा-बाजार, धातू-बाजार, तंत्र-बाजार यांच्याबाबतही खरे आहे आणि असते. त्यानुसार त्यादिवशी आपल्या देशातील बाजारात सोन्याचे भाव १,००,००० च्या पलीकडे जाण्यातले एक अगदी तात्कालीक कारण म्हणजे त्या दिवसांत अमेरिकी राष्ट्राध्यक्ष आणि युक्रेनचे राष्ट्रप्रमुख यांच्यात झालेली भेट. मधे काही दिवस ( गेले कित्येक महिने धुमसत असलेले ) रशिया - युक्रेन युद्धात पुन्हा एकदा अचानक रशियाने युक्रेनवर क्षेपणास्त्र हल्ले केल्याची या अमेरीका - युक्रेन राष्ट्र प्रमुखांच्या भेटीला पार्श्वभूमी होती. या भेटीनंतर रशियाला युक्रेन युद्ध लवकर संपवण्यासाठी स्वारस्य नसावे असे वाटते अशी व्यक्त केली गेलेली प्रतिक्रिया फार बोलकी आहे. त्यातही अलिकडच्या काळात जागतिक व्यापारात एकाधिकारशाही मिळवण्यासाठी अमेरीका - रशिया - चीन यांच्यात व्यापारी युद्ध सुरू झाले आहे का अशी चर्चा सध्या सुरू आहे. अगदीं व्यापारी युद्ध सुरू झाले नसले तरी या तीन राष्ट्रातील स्पर्धा दिवसेंदिवस तीव्र होत चालल्याची कुजबुज नक्कीच आहे. अशा गोष्टींचा सोन्याच्या बाजारभावाशी एका वेगळ्या तऱ्हेने संबंध असतो. आणि झटकून टाकावा इतका तो लांब - लांबचाही नसतो. कोणत्याही कारणाने अनिश्चितता - अस्थिरता जाणवायला लागली किंवा त्याची चाहूल लागली की जागतिक गुंतवणूक क्षेत्रातील तरलता ( Liquidity qH$dm Investible Surplus ) आपला रोख सोन्याच्या खरेदी कडे वळवते. आणि त्यातून सोन्याचे भाव चढे राहतात. आपण असे सारे २०२० साली कोरोनाचा जगभरात प्रादुर्भाव झाला तेंव्हां अनुभवले आहे. अर्थात हा प्रादुर्भाव , त्याचा प्रभाव, त्याचा प्रसार, त्याचा प्रचार जसजसा कमी होत गेला , तसतसे सोन्याचे बाजारभाव टप्प्याटप्प्याने खाली येण्याचाही अनुभव त्यावेळी आपण घेतला आहे. अशी अस्थिरता आर्थिक असू शकते. अशी अस्थिरता राजकीय असू शकते. अशी अस्थिरता सामाजिक असू शकते. अशी अस्थिरता स्थानिक असू शकते. अशी अस्थिरता राष्ट्रीय असू शकते. अशी अस्थिरता जागतिक असू शकते. अशी अस्थिरता तात्कालीक असू शकते. अशी अस्थिरता मध्यमकालीन असू शकते. अशी अस्थिरता दिर्घकालीन असू शकते. आणि कोणत्याही प्रकारच्या अस्थिरतेचे मोठ्या दीर्घकालीन गुंतवणुकीला वावडे असते. या वाक्यातील दीर्घकालीन आणि म ोठ्या हे दोन्ही शब्द महत्त्वाचे आहेत. अशी अस्थिरता जेंव्हा नसते तेंव्हां हा पैसा शेअरबाजार, वस्तूबाजार, सेवाबाजार, तंत्रज्ञान, प्रवर्तकीय सहभाग असा विविध प्रकारे गुंतवला जातो. जसजशी अस्थिरतेची तीव्रता सुरू होते-वाढत जाते, तसतसे गुंतवणुकीचे इतर मार्ग किंवा साधने यात गुंतवलेल्या किंवा गुंतवले जाऊ शकतील अशा पैशांचे प्रमाण कमी कमी होत जाऊन तो ओघ सोन्याच्या किंवा सोन्यातील गुंतवणूकीकडे वळू लागतो असा आजपर्यंतचा अनुभव आहे. अशा अस्थिरतेच्या काळात सोन्याचे भाव चढे राहण्यात अजून एक पैलू असतो आणि तो पैलू म्हणजे अशा काळात सरकारने किंवा सरकारी पुढाकाराने केली जाणारी सोन्याची खरेदी. अशा अस्थिर-अशांत काळात राष्ट्रीय अर्थव्यवस्था व त्यात असणारा तरल त्वरीत निधी सोन्याकडे वळवण्याचा सरकारी कल असतो. गंमत म्हणजे, आजमितीला जगात कोणत्याही देशाचे स्वयंभू , राष्ट्रीय चलन सुवर्णाधिष्ठीत ( Gold Based Currency ) नसूनही असे होते. अशा परिस्थितीत अशी सरकारी गुंतवणूक अनेकदा Parking of Funds स्वरूपाची असते ; Investing of Funds नव्हे. त्यातही सरकारी गुंतवणूक जेंव्हा सोन्याकडे वळते तेंव्हां त्यांची खरेदी एकरकमी असते ; पण त्यांची विक्री जेंव्हा केंव्हा होते तेंव्हां मात्र ती टप्प्या - टप्प्याने होते. यावेळी सोन्याचे भाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे जाण्यामागे अजून एक संभाव्य कारण आहे. हे कारण म्हणजे २० एप्रिल २०२५ रोजी चीनने केलेली घोषणा. त्यादिवशी चीनने असे जाहीर केले की अमेरिका प्रणित व अमेरिका प्रभावित SWIFT पद्धतीच्या बाहेरील व्यवहारात येण्यास चीन सक्रियपणे इतरांना उद्युक्त करते आहे. त्यातून डॉलर मधील व्यवहार कमी होत इतर चलनाचे मूल्यांकन कसे, कधी, किती प्रभावित होईल याचा सध्या अंदाज घेणे सुरू आहे. अशा काळात, तात्पुरती का होईना पण सोन्याची सरकारी खरेदी वाढते. हे सारे यावेळीही सोन्याच्या बाजारभावात घडणार का ?

- चन्द्रशेखर टिळक

## वाचक पत्रे

### पंतप्रधानांच्या प्रत्येक कृतीस पाठिंबा आवश्यक

पहलगाम येथे झालेल्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्याचा प्रतिशोध घेण्यासाठी संपूर्ण देशवासीयांचे रक्त सध्या सळसळत आहे. यापुढे सिंधू नदीच्या पाण्याचा एक थेंब सुद्धा पाकड्यांना दिला जाणार नाही असे भारताने ठणकावले असून, सिंधू जल करार स्थगित केला आहे. हा तर ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी हैं. सध्या देशपातळीवर मोठ्या प्रमाणात उच्चस्तरीय बैठकांची मालिका सुरू असून पाकला कायमचा धडा शिकवण्यासाठीची तयारी चालली आहे. वेळ आणी तारीख हा गोपनीयतेचा विषय असल्याने केव्हा एकदा पाकड्यांवर हल्ला होतो आणि आम्ही भारतमातेच्या विजयाचा जल्लोष करू याच भावना आज संपूर्ण देशवासीयांच्या आहेत. जगभरातून भारताला मिळणारे समर्थन पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सफल विदेश नीतीचे द्योतक आहे. या संकट काळात सर्वपक्षीय समर्थन मोलाचे ठरते आणि ती या देशाची परंपरा आहे. सर्वपक्षीयांनी ती जोपासली याचा खरंच अभिमान आहे. सैनिकांच्या सुट्ट्या रद्द झाल्या आहेत, रजेवर गेलेल्यांना भारत मातेने परत बोलावले आहे. या देशाचा जबाबदार नागरिक म्हणून त्या सैनिकांचे मनोबल वाढवताना, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रत्येक कृतीस समर्थन देताना देशभक्तिपर गीताच्या त्या ओळी नकळत ओठावर येतात, ‘देश हैं पुकारता, पुकारती माँ भारती’...

**अखिल देशपांडे**/ अकोला

●● ●●

### निसर्ग बदलतोय की माणूस?

आजच्या वर्तमानकाळात हवामान बदलच्या घटना वाढत आहेत. तापमानवाढ, पूर, दुष्काळ, चक्रीवादळे यासारख्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. आपण सहजपणे म्हणतो निसर्ग बदलतोय पण थोडा विचार केला तर लक्षात येते, खरा बदल निसर्गात नव्हे, तर माणसाच्या वागण्यात झाला आहे. पूर्वी माणूस निसर्गाच्या नियमांनुसार जगायचा. तो झाडे लावायचा, पाणी जपायचा, जमिनीचा सन्मान करायचा. पण जसजशी प्रगती झाली, तसतसे माणूस निसर्गावर वर्चस्व मिळवू लागला. विकासाच्या हव्यासाने घनदाट जंगलतोड झाली, नद्या प्रदूषित झाल्या, सिमेंटीच्या कारखान्यांतून धूर आणि सांडपाणी सोडले गेले. रासायनिक औषधांचा वापर त्यामुळे हवामान चक्र बिघडले त्यामुळे ऋतू अनियमित झाले. निसर्गाचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य होते, ते आपण विसरलो. त्यामुळे आता निसर्गही आपली बदलती प्रतिक्रिया दाखवत आहे. निसर्ग आपला स्वभाव विसरत नाही, बदल माणसाच्या विकासावर आहे. आपणच जर वागणूक बदलली नाही, तर निसर्गाचे रौद्ररूप आपल्याला रोखता येणार नाही. म्हणूनच वेळेत जागे होऊन निसर्गाशी पुन्हा नाते जोडणे, त्याचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. ▌

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बसवेश्वरांची शिकवण आचरणात आवश्यक

## डॉ. इरेश स्वामी; बसव मानद पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल -**

आजच्या समाजाला जगद्ज्योती महात्मा बसवेश्वरांच्या विचाराची गरज आहे. समाज सुधारण्यासाठी महात्मा बसवेश्वरांची शिकवण प्रत्येकाने आचरणात आणणे आवश्यक आहे असल्याचे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. इरेश स्वामी यांनी केले.

गुरुविद्या प्रतिष्ठानतर्फे आयोजित केलेल्या जगद्ज्योती महात्मा बसवेशवर बसव मानद पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरूविद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष सातलिंग शटगार उपस्थित होते. प्रास्ताविक उपाध्यक्ष राजश्री तडकासे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सातलिंग शटगार, संस्थापक सोमशेखर भोगडे, उप्पाध्यक्षा राजश्री तडकासे, माजी अध्यक्ष प्रा. प्रभाकर नागणसूरे, सदस्य विजयकुमार भोगडे, कार्याध्यक्षा नमिता थिटे, सल्लागार मोहन भूमकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्तात्रय जामदार, मंजूर शेख, प्रतिक्षा खंडाळकर, शिवलीला भोगडे, नेहा भोगडे, नितीन भोगडे यांनी परिश्रम घेतले. आभार मोहन भुमकर यांनी मानले. सूत्रसंचालन सचिवा श्रीदेवी यळमेली यांनी मानले.




### पुरस्कार प्राप्त असे

डॉ. मनोहर मोरे -गुरूविद्या बसवरत्न पुरस्कार, वैशाली देशपांडे - गुरुविद्या बसव माता पुरस्कार, अनिता मोरे - गुरूविद्या बसव भूषण पुरस्कार, विठ्ठलराव न्हावकर, छबुबाई न्हावकर - गुरूविद्या बसव शरण दांपत्य पुरस्कार, चनबसवेश्वर सोलापुरे - गुरुविद्या बसव भक्त पुरस्कार, शिवानंद हिरेमठ - पक्षी मित्र गुरुविद्या बसव पुरस्कार, सुनिता शटगार - गुरुविद्या बसव शरणी पुरस्कार, मानसी वैद्य व मोहन वैद्य- गुरुविद्या बसव शरण दांपत्य पुरस्कार, दिवगंत मुख्याध्यापिका पल्लवी दळवी - मरणोत्तर बसव शरणी पुरस्कार, सुनील व धनश्री वाघमोडे- गुरूविद्या बसव शरण दांपत्य पुरस्कार.

# कुरनूरचे सामीराव मोरे यांना सहाय्यक उपनिरिक्षकपदी बढती

**अक्कलकोट दि . २८ एप्रिल**

कुरनुर (ता.अक्कलकोट) येथील सामीराव मोरे यांना केंद्रीय सशस्त्र बल विभागात सहाय्यक उपनिरिक्षकपदी नुकतीच पदोन्नती मिळाली आहे. ते १९९६ मध्ये केंद्रीय सशस्त्र बलात कॉन्स्टेबल म्हणून रुजू झाले होते. २९ वर्षे सेवा पूर्ण केल्यानंतर त्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. सेवा काळात तामिळनाडू, गुजरात, गोवा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, केरळ, हैद्राबाद इत्यादी ठिकाणी सेवा बजावली. सध्या हैदराबाद येथे सहाय्यक उपनिरीक्षक पदी त्यांची बढती मिळाली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




## अुत्तम सेवा | मंगळवार दि. २९ एप्रिल २०२५ | नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **नोंदणी व मुद्रांक विभाग पुणे** | | | |
| | शिपाई (२८४ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | १०/०५/२५ |
| २) | **मुंबई उच्च न्यायालय, BHC** | | | |
| | वाहन चालक (११ पदे) | दहावी व हलके मोटार वाहन परवाना व ३ वर्षे अनुभव असावा | ३८ पर्यंत | ०९/०५/२५ |
| ३) | **नवी मुंबई महानगरपालिका** | | | |
| १ | स्टाफ नर्स (१३१ पदे) | GNM/B.Sc (नर्सिंग) उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ११/०५/२५ |
| २ | लिपीक (१३५ पदे) | पदवी व मराठी-इंग्रजी टायपिंग | ३८ पर्यंत | |
| ३ | लेखा लिपीक (५८ पदे) | पदवी व मराठी-इंग्रजी टायपिंग | ३८ पर्यंत | |
| ४ | परिचारिका (३८ पदे) | दहावी व ANM कोर्स उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| ५ | औषध निर्माता (१२ पदे) | पदवी (फार्मासी) व अनुभव असावा | ३८ पर्यंत | |

**❊ मोफत सरकारी अपडेट ❊**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ४) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| १ | असि. लोको पायलट (९९७० पदे) | पदवी/पदविका (मेकॅ/इले/इलेक्ट्रॉ / ऑटो) अभियांत्रिकी उत्तीर्ण किंवा ITI (इले / फिटर / इन्स्ट्रू / टर्नर /रेडिओ /इलेक्ट्रॉ/मोटार/वायरमन/ट्रॅक्टर/ डिझेल/मशिनीस्ट/ए. सी.) उत्तीर्ण | ३० पर्यंत | ११/०५/२५ |
| ५) | **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. मर्या.** | | | |
| १ | निम्न श्रेणी लिपीक (२६० पदे) | B.Com व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | ०२/०५/२५ |
| २ | सहा. अभियंता (१३४ पदे) | B.E व (सिव्हील) उत्तीर्ण असावे | | |
| ३ | उच्च श्रेणी लिपीक (३७ पदे) | B.Com व MS-CIT उत्तीर्ण तसेच लेखा परीक्षा उत्तीर्ण असावे | ५७ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. www.uttamseva.org


# महापालिका कर्मचाऱ्यांना मेडिकल कॅशलेस विमा सुविधा उपलब्ध करावी

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर कर्मचारी युनियनची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल -**

महापालिका कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणेच मेडिकल कॅशलेस विमा सुविधा उपलब्ध करावी यासह विविध मागण्यांचे निवेदन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर कर्मचारी युनियनच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिका मध्ये आजतागायत दिनांक ६ एप्रिल १९९५ नंतरचे २४९ बदली रोजंदारी सेवक कार्यरत असून आज तगायत त्यांना सेवेत कायम केले गेले नाही. तात्कालीन आयुक्त पी. शिवशंकर यांनी अंतिम स्वरूपाची यादी प्रसिद्ध केल्याच्या तारखा निश्चित धरून या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा दुरुस्ती प्रस्ताव १ मे कामगार दिनाचे औचित्य साधून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा. सोमपा मधील अधिकारी कर्मचारी वर्ग यांना शासनाच्या धोरणानुसार उर्वरित महागाई भत्ते द्यावे. सोमपा मधील कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतनानुसार१०,२०,व ३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना लवकरात लवकर लागू करावी. सोमपा कर्मचाऱ्यांना मेडिकल कॅशलेस विमा पूर्वीप्रमाणेच चालू करावा आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे यावेळी अध्यक्ष कामगार नेते बापूसाहेब सदाफुले, खजिनदार अरुण मेत्रे, सहसचिव रामचंद्र चंदनशिव, धनाजी लोंढे, बिबीशन गायकवाड, सिद्धार्थ तळभंडारे, संतोष वाघमारे, गौतम कांबळे व बदली रोजंदारी सेवक व युनियनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा -२)

संस्थेचे नाव - श्री संभाजी शिक्षण प्रसारक मंडळ, थेरगाव, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर (728055C001) द्वारा संचलीत १००% अनुदानित श्री. प्रेमनाथ विद्यालय, थेरगाव, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर येथे पवित्र प्रणालीमार्फत खालील पध्दतीने शिक्षणसेवक पदे नेमणे आहेत.

| अ. क्र. | पद | एकत्रित मानधन | विषय व पदसंख्या | शिकवण्याचे मानधन | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षणसेवक (इयत्ता ६ वी ते इयत्ता ८ वी) | रु. १६,०००/- द.म. | गणित-१ | मराठी | OBC |
| | | | मराठी-१ | मराठी | NTB |

❊ अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी - २०२२ (TAIT) दिलेल्या उमेदवारापैकी ज्यांनी पवित्र प्रणालीवर वैयक्तीक माहिती नोंदवून स्वप्रमाणीत केलेली आहे. अशाच उमेदवारांनी जाहिरातीनुसार पवित्र पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत.

❊ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन नि.क्र. संकिर्ण-२१८/प्र.क्र.३९७/टीएन-१ दि. ०७/०२/२०१९ व शालेय शिक्षण क्रीडा विभाग शा.नि.क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.१७४/ टीएनटी-१ दि.२१/०६/२०२३ नुसार शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता आवश्यक आहे.

❊ वरील रिक्त पदांसाठी पवित्र प्रणालीमार्फत शासनाकडून उमेदवारांची नावे कळविली जाणार आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष संस्थेकडे कोणीही अर्ज करु नये.

**स्थानिक सचिव**
**श्री संभाजी शिक्षण प्रसारक मंडळ, थेरगाव**



## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६४/२०२५
नि.११

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधीश सो, यांचे न्यायालयात**

**१) अनुसया उर्फ अनिता बाबुराव माळी,**
वय : ४८ वर्षे, धंदा : घरकाम,
**२) शाश्वत बाबुराव माळी**
वय १२ वर्षे, धंदा शिक्षण,
दोघे रा. दहिटणे, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर.
(अर्जदार नं.२ यांचे अ.पा.क. म्हणून अर्जदार नं.१ आई) — **अर्जदार**

**विरुध्द**

**महाराष्ट्र सरकार**
(अर्जाची नोटीस मा. जिल्हाधिकारी सो. सोलापूर यांचेवर बजावण्यात यावी) — **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार नं.२ यांचे नावे असलेली जिल्हा व जिल्हा परिषद सोलापूर, तालुका पंचायत समिती अक्कलकोट पैकी मौजे दहिटणे, ता. अक्कलकोट येथील जिरायत शेतजमीन गट नंबर १४८ यांसी क्षेत्र ० हेक्टर ८६ आर यांसी पोट खराब क्षेत्र ० हे. २० आर यांसी एकूण क्षेत्र १ हे. ०६ आर यांसी आकार १ रुपये ९५ पैसे, यांसी चतुःसिमा :- पूर्वेस : गट नं.१४८ पैकी शब्बीर शेख यांची जमीन, पश्चिमेस : गट नं. १४८ पैकी मल्लिनाथ माळी यांची जमीन, दक्षिणेस : गट नं. १५१ व उत्तरेस : रस्ता यापैकी इसारा पावतीने दिलेली विक्री क्षेत्र ० हे. ५३ आर यांसी पोट खराब ० हे. ११ आर यांसी एकूण ० हे. ६४ आर यांसी आकार १ रुपये २१ पैसे यांसी चतुःसिमा : पूर्वेस : गट नं. १४८ पैकी शब्बीर शेख यांची जमीन, पश्चिमेस : गट नं.१४८ पैकी राहिलेली जमीन, दक्षिणेस : गट नं. १५१ व उत्तरेस : रस्ता अशी मिळकत ही अर्जदार नं.२ यांचा असलेल्या हिश्याची मिळकत विक्री करण्यास परवानगी मिळणेसाठी यातील अर्जदार नं.१ व २ यांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरबाबत अर्जदार नं.२ यांच्या नांवाने असलेली मिळकत विक्री करण्यास परवानगी देणेस कुणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा नेमलेली तारीख १३/६/२०२५ रोजी हजर राहून हरकत घ्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ते आदेश करतील नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली. ता. २८/०४/२०२५

**सही/-** **लिपिक** | **कोर्टाचा शिक्का** | **हुकुमावरून सही/- अधिक्षक जिल्हा न्यायाधीश सोलापूर**


# स्वप्नील देशमुख याची कृषी सहायक पदी निवड

**माळशिरस,दि.२८ एप्रिल-**

येथील स्वप्नील बाळासाहेब देशमुख याची कृषी सहायक पदी निवड झाली असून नुकताच त्याने म हाड येथे आपल्या पदावर रुजु झाला असून त्याच्या निवडी बद्दल अभिनंदन होत आहे.




## भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर
## ICAR - National Research Centre On Pomegrante

(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

**WALK-IN-INTERVIEW**

A Walk in interview will be held on 05.05.2025 11:00 AM at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sr. no | Name of the Project | Name of Post | Emolument (Fixed) P.M. | Education Qualification | Number of Post |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Test protocol for efficacy evaluation of new molecules (SYN products) of Syngenta against wilt of pomegranate | Young Professional - 1 | Rs. 30,000/- P.M. Fixed | Graduate degree in Agriculture/Life Sciences | 01 |
| 2 | Indian Council of Agricultural Research | Young Professional - 1 | Rs. 30,000/- P.M. Fixed | Graduate Degree in Agriculture /Biotechnology and Allied Sciences from the recognized university | 01 |

Sd/-
**DIRECTOR**



## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- तुकडी सोलापूर पोटतुकडी व ता. पंढरपूर, मा. दुय्यम निबंधक पंढरपूर याचे कार्यक्षेत्रातील तसेच जिल्हा परिषद सोलापूर पंचायत समिति पंढरपूर याचे हद्दीतील मौजेः- व्होळे ता. पंढरपूर येथील गावठाण मधील मालमत्ता क्र.७०७ मधील संपूर्ण क्षेत्र ३५०० चौ. फुट म्हणजेच ३२५.२७ चौ.मी. खुली जागा आहे. या खुल्या जागेचे बक्षीसपत्र आज रोजी या बक्षीसपत्राने दिले आहे. मालमत्ता क्रमांक ७०७ संपूर्ण क्षेत्र चौ. फुट/चौ.मी. ३५०० चौ.फु. (३२५.२७ चौ. मी. खुली जागा) सदर खुल्या जागेच्या चःतुसिमा खालीलप्रमाणे पूर्व - रस्ता, पश्चिम - स्वतःची मिळकत दक्षिण स्वतः ची मिळकत, उत्तर - तानाजी होळकर, येणेप्रमाणे चतुःसिमेतील ही श्री. स्वपनील मोहन घाटुळे यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे.

सदर श्री. स्वपनील मोहन घाटुळे यांनी आमची अशिल कंपनी श्रीराम फायनान्स लि. यांचेकडे कर्ज मागणी केलेली असून त्या कर्जापोटी वरील मिळकत तारण देण्याचे मान्य केलेले आहे. सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचेही कसल्याही स्वरूपाचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा सदर गहाणखतास हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाचे आत आमचेंशी संपर्क साधून लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे कोणाची हरकत न आल्यास सदर मिळकतीवर श्री. स्वपनील मोहन घाटुळे यांचे व्यतिरीक्त अन्य कोणाचीही हक्क, अधिकार नाही, असे गृहीत धरून सदर मिळकतीचे गहाणखत आमचे अशिल कंपनीचे हक्कात करून घेण्यास येईल व त्यानंतर कोणाचीही कसल्याही स्वरूपाची तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. सबब ही जाहीर नोटीस दिली. दिनांक २८/०४/२०२५

**सही/-**
**जाहीर नोटीस देणार**
**ॲड. योगेश घनशामराव अबूज**
**आनंद नगर, आनंद बाजार जवळ,**
**धाराशिव ता. जि. धाराशिव. ४१३५०१**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**



## जाहीर प्रगटन/प्रसिध्दीकरण

दि.कि. अ.नं. ५०/२०२५
नि.५

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात**

**१) शुभम मनोज मनगिरे,**
वय- अज्ञान, धंदा-शिक्षण, रा. तुळशीराम रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
**२) साक्षी मनोज मनगिरे,** वय- अज्ञान, धंदा व रा.सदर
**३) अश्विनी मनोज मनगिरे,** वय- ३८ वर्षे, धंदा घरकाम रा. सदर
अर्जदार नं. ३ स्वतः करिता व अर्जदार नं. १ व २ यांचे अ.पा.क. आई म्हणून — **अर्जदार**

**विरुध्द**

**महाराष्ट्र शासन**
(यांचे समन्स/नोटीस सहाय्यक सरकारी अभियोक्ता बार्शी यांना बजावण्यात यावे) — **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे बार्शी हद्दीतील जमीन गट नं. ७८८/१/ब पैकी दक्षिण बाजूचे क्षेत्र ०१ हे ४५.५ आर यापैकी पूर्व बाजुकडील ०० हे ४० आर क्षेत्र, पश्चिमेस - सदर खरेदी देणार यांचे उर्वरीत क्षेत्र, उत्तरेस - सदर गटापैकी प्रसन्ना मनगिरे यांचे क्षेत्र येणेप्रमाणे चतुःसिमा पूर्वक जमीन आतील सर्व तदंगभुत वस्तू हक्कासह. पैसे ही अज्ञानाची शेतजमिन विकणेकामी परवानगी मिळणेसाठीचा अर्ज मे. कोर्टात आणलेला असून सदर शेतजमिन विक्री करणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारचा हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी, बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि. ९/६/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी.

त्याअर्थी, कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर शेतजमिन विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रगटन दिले ता. २८/०४/२०२५

**सही/- क.लिपिक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा. अधिक्षक जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी**


# शेळगी येथे मोफत महाआरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

सामाजिक क्रांतीचे उदगाते जगदज्योती महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवानिमित्त निमित्त शेळगी भागातील नागरिकांसाठी मोफत महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी बसवमुर्तीची महापुजा करण्यात आले यांप्रसंगी डॉ सुर्यप्रकाश कोठे, शेळगी येथील डॉ. राजश्री मठ, डॉ. सिध्देश्वर दुलंगे, डॉ. वानकर, शेळगी नागरी आरोग्य केंद्राचे टोणपे, संतोष चिवडशेट्टी, विवेक गाली, जयश्री धप्पाधुळे, परमेश्वर रमणशेट्टी उत्सव समितीचे अध्यक्ष युवराज यलशेट्टी उपाध्यक्ष आकाश कौदी, कार्याध्यक्ष -विनायक सरसंबी, खजिनदार -केदार बिराजदार, लेझीम प्रमुख गौरीशंकर बाळशेट्टी, आदी उपस्थित होते. शिबीरात पोटाचे आजार, कावीळ, हिपॅटायटिस बी, मधूमेह, रक्तदाब, डोळ्यांचे विकार इत्यादी आजारासंबंधी तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून मोफत औषधे, मोफत चष्मे देण्यात आले. शिबीर यशस्वी करण्यासाठी गंगाधर झुरळे शिवयोगी पाटील, बसवराज यलशेट्टी, रामचंद्र राजमाने, महादेव यलशेट्टी, अक्षय कोरडे, गौरीशंकर बालशेट्टी, योगीराज कलमाडी, सागर बिराजदार, पिनू करपे, केदार बिराजदार, रोहित वग्गे, प्रशांत काशिद, अनिकेत कदम. समर्थ पाटील, विवेक यलशेट्टी, ऋषी कारले, प्रज्वल झुरळे, भोला बोरगांवकर आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शिवराज धप्पधुळे यांनी केले.


## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (यापूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड हे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 98025642 | गृह कर्ज | १. चत्रभुज प्रभाकर काळे २. प्रभाकर अभिमान काळे | 09/04/2025 | रुपये 5,97,648.89/- |
| | **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ९८ चे सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण मोजमाप ५८० चौ. फूट., ग्रामपंचायत दाडशिंगे, उप-विभाग : बार्शी, विभाग : सोलापूर, महाराष्ट्र-४१३४०१, आणि **सीमा : पूर्व :** ग्रामपंचायत रस्ता, **पश्चिम :** जगन्नाथ काळे, **उत्तर :** मधुकर काळे, **दक्षिण :** ग्रामपंचायत रस्ता. | | | | |
| 2 | 129488255 | मालमत्तेवर कर्ज | १. विकास मोहन गायकवाड २. आकाश मोहन गायकवाड | 05/04/2025 | रुपये 5,45,070.44/- |
| | **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्र. २९१/१ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण मोजमाप क्षेत्र ८२५ चौ. फूट, ग्रामपंचायत वाणेवाडीच्या हद्दीत स्थित, उप-विभाग : बार्शी, विभाग : सोलापूर, महाराष्ट्र-४१३४०१, आणि **सीमा : पूर्व :** ग्रामपंचायत रस्ता, **पश्चिम :** गायरान, **उत्तर :** रावण निवृत्ती गायकवाड, **दक्षिण :** अण्णा यादव | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : २९/०४/२०२५**
**ठिकाण : सोलापूर**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे- उपळाई (ठोंगे) हद्दीतील लोकांना आमचे अशिलांनी नोटीस देण्यास सांगितलेवरुन व सही केल्यावरुन या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे उपळाई (ठोंगे) हद्दीतील जमीन क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे - उपळाई (ठोंगे) येथील गट नं. ४४५ याचे एकूण क्षेत्रफळ ०३ हे. ६२ आर., आकार ०६ रु. ९० पैसे, जमीन मालक श्री. धनंजय बजरंग कटकदौंड यांच्या मालकीचे ०२ हे. २२ आर. + पो. ख. ०० हे. १९ आर., असे एकूण क्षेत्र ०२ हे. ४१ आर., याचा आकार ०३ रु. ९४ पैसे, यांसी चतुःसिमा पूर्वेस - गट नं. ४४३, ४४४, दक्षिणेस - ओढा, पश्चिमेस गट नं. ४४६ व उत्तरेस - सदर गट नंबरपैकी प्रतिभा विकास ठोंगे व रस्ता, येणेप्रमाणे आतील सर्व तदंगभूत वस्तूसह, हक्कासह, अधिकारासह.

वरील वर्णनाची जागा श्री. धनंजय बजरंग कटकदौंड यांच्या मालकीची असून, त्यांनी विक्रीस काढल्याने आमचे अशिल व त्यांच्यामध्ये सदर जमीनीबाबत खरेदी घेण्याचा व्यवहार ठरवून सदर खरेदीखताची ठरलेल्या रक्कमेपैकी आमचे अशिलांकडून काही रक्कम स्विकारलेली असून, त्यांनी आमचे अशिलास रजिस्टर खरेदीखत करुन देण्याचे ठरविले आहे. सदरची जमीन निर्वेध, निजोखमी असल्याबाबत खात्री व हमी त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. परंतु, वर वर्णन केलेल्या जमीनीबाबत कोणाचीही (व्यक्ती अथवा संस्थांचा) कसल्याही प्रकारची हरकत, हक्क, हितसंबंध, दावा, लिज, टाच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार, वाटणी हक्क, खरेदी-विक्री, वगैरे अन्य स्वरुपाचा हक्क व हितसंबंध वाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा, मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमूद जमीन आमचे अशिल पुढील रजिस्टर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मात्र कोणाचीही कसलीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर व जमीनीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली आहे. **ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. २९/०४/२०२५.**

**सही/-**
**अशिलातर्फे**
**ॲड. श्री. रोहित अनिल जोशी**
B.Sc. Hon's, L.L.B.
**ब्राह्मण गल्ली, बार्शी**
**मो. नं. ९९२३३३२३२९**



## बांधकाम विभाग जिल्हा परिषद, सोलापूर
### जाहिर निविदा/दरपत्रक सुचना क्रमांक १/२०२५-२६ सोलापूर

सर्व संबंधित शासनमान्य नोंदणीकृत प्रमाणित कंपनी यांना कळविण्यात येते की, सोलापूर जिल्हा परिषद सोलापूर बांधकाम विभाग क्र. १ व २ कडील बांधकाम विषयक कामासाठी

| अ. क्र. | कामाचा तपशील | बयाणा रक्कम रुपये/- | काम पूर्ण करण्याची मुदत | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत बांधकाम विभाग क्र. १ व २ मध्ये बांधकाम विषयक कामासाठी जिल्ह्यात होत असलेल्या रस्ते व इमारत बांधकामाचे ई-अंदाजपत्रक आणि ई-मोजमाप पुस्तिका करण्याकरीता संगणकीकृत प्रणालीचा उपयोग करण्यासाठी व लागू करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. | २०,०००/- | १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ | शासनमान्य नोंदणीकृत / प्रमाणित कंपनी |

दि. २९/०४/२०२५ ते १३/०५/२०२५ अखेर रोजी दुपारी ५.०० पर्यंत भरलेली दरपत्रके सॉफ्टवेअर कंपनी स्वतःच्या लेटर पॅडवर स्वीकारली जातील. अधिक माहितीसाठी जिल्हा परिषद कार्यालयात संपर्क साधावा.

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सोलापूर**




## महत्त्वाचे

### शेवरॉन गोल्फ स्पर्धेत अदितीला ६२ वे स्थान

**द वुडलॅण्ड** : भारतीय गोल्फर अदिती अशोकने अंतिम फेरीत इव्हन-पार ७२ चा रोलर-कोस्टर राईड अशी कामगिरी करत येथे सुरु असलेल्या शेवरॉन गोल्फ अजिंक्यपद स्पर्धेत टी-६२ वा क्रमांक मिळवला. भारतीय व्यावसायिक खेळाडू दुसऱ्या दिवसानंतर कटमध्ये पोहोचण्यासाठी



जवळजवळ धडपडत होती. अदितीचे फेरे ७२-७४-७७-७२ होते आणि एकूण सात-षटकांचे २९५ गुण होते. शेवटच्या दिवशी अदितीने समान संख्येच्या बर्डीविरुद्ध दोन बोगी दिल्या. तिने दुसऱ्या होलवर बोगीने सुरुवात केली आणि लगेच तिसऱ्या होलवर बर्डीने परत उडी मारली. तथापि, सातव्या होलवरील दुसऱ्या बोगीने तिला मागे खेचले आणि त्यानंतर तिने १२ व्या होलवर स्ट्रोक घेतला आणि ७२ वर बंद झाला. जपानच्या माओ सायगोने ही स्पर्धा जिंकला. प्ले-ऑफमध्ये सायगोनेच बर्डी मारून विजयावर शिक्कामोर्तब केले. तिच्या पाठोपाठ थायलंडच्या आरिया जुतानुगार्न, कोरियाची ह्यो जू किम, चीनची रुओनिंग यिन आणि अमेरिकेची लिंडी डंकन आदिंनी स्थान मिळविले. ■

### नॉर्थईस्ट युनायटेडला नमवून जमशेदपूर उपांत्य फेरीत

**भुवनेश्वर** : कलिंगा स्टेडियमवर झालेल्या नाट्यमय उपांत्यपूर्व सामन्यात पेनॉल्टी शूटआऊटमध्ये नॉर्थईस्ट युनायटेड एफसीचा ५-४ असा पराभव करून जमशेदपूर एफसीने कलिंगा सुपर चषक फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. नियमित वेळेनंतर सामना अनिर्णीत राहिला होता, त्यामुळे पेनॉल्टी शूटआऊट सडन डेथचा अवलंब करण्यात आला. त्यात जमशेदपूरने बाजी मारली. ३० मार्च रोजी आयएसएल प्लेऑफमधून २-० असा विजय मिळवून बाहेर पडल्यानंतर जमशेदपूर जुआन पेड्रो बेनालीच्या संघासाठी एक काटा ठरला आहे. आता जमशेदपूर एफसी आणि मुंबई सिटी एफसी यांच्यात बुधवार ३० एप्रिल रोजी उपांत्य फेरीचा सामना होणार आहे. दोन्ही प्रशिक्षकांनी सुरुवातीपासूनच सावध दृष्टिकोन स्वीकारला. नॉर्थईस्टकडून अलाएद्दीन अजराय, नेस्टर अल्बियाच आणि गिलेर्मो फर्नांडिस आणि जमशेदपूरकडून जेवियर हर्नांडिझ गोंझालेझ, जेवियर सिव्हेरियो आणि जॉर्डन मरे सारख्या आक्रमक धोक्यांसह, बचावात्मक शिस्त अत्यंत महत्त्वाची होती.

### मॅन्चेस्टर सिटी सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरीत

**वेम्बली** : मॅन्चेस्टर सिटीने नॉटिंगहॅम फॉरेस्टवर २-० असा विजय मिळवत सलग तिसऱ्या हंगामात एमिरेट्स एफए चषक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. रिको लुईसचा सुरुवातीचा गोल आणि जोस्को ग्वार्डिओलचा उत्तरार्धातील हेडर पेप ग्वार्डिओलाच्या संघला विजय मिळवून देण्यासाठी पुरेसा होता. आता १७ मे रोजी क्रिस्टल पॅलेस आणि मॅन्चेस्टर सिटी यांच्यात अंतिम सामना करेल.

# दिल्लीचा फलंदाजीत सुधारणा करण्यावर भर

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात मंगळवारी अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) याच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. या सामन्यात संघर्षरत केकेआरविरुद्धच्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा मधल्या षटकांत आपल्या फलंदाजीत सुधारणा करण्यावर भर असेल. स्पर्धेच्या शेवटच्या टप्प्यात ते कोणत्याही अडचणी टाळण्यासाठी प्रयत्न करतील.

दिल्लीला गत चार सामन्यांमध्ये दोन पराभवांना सामोरे जावे लागले आहे, यात रविवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या पराभवाचा समावेश आहे.

या हंगामात आतापर्यंत दिल्ली कॅपिटल्सने ९ सामन्यांपैकी ६ सामने जिंकले असून ते १२ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या


अजिंक्य रहाणे


अक्षर पटेल

स्थानावर आहे. केकेआरने ९ पैकी केवळ ३ सामने जिंकले असून ५ सामने गमावले. केकेआर ७ गुणांसह गुणतालिकेत सध्या सातव्या क्रमांकावर आहे.

अभिषेक पोरेलने वरच्या क्रमांकावर आक्रमक फलंदाजी केली आहे परंतु अनुभवी फाफ फू प्लेसिसला पुन्हा फॉर्ममध्ये परतण्यासाठी संघर्ष करावा लागात आहे.

के.एल. राहुल या हंगामात दिल्ली कॅपिटल्सचा आघाडीचा धावा करणारा फलंदाज आहे, परंतु रविवारी रात्री फिरकीपटूंविरुद्ध तो वेग वाढवू शकला नाही. राहुलला करुण नायरकडून सहकार्य मिळणे अपेक्षित आहे. पंजाब किंग्जविरुद्ध पावसाने व्यत्यय आणलेल्या सामन्यात झालेल्या कठीण कामगिरीनंतर अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील कोलकाता नाईट रायडर्स संघाचा आत्मविश्वास थोडासा कमी झाला आहे. गोलंदाजीत दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेलने आघाडीवरून दोन बळी घेतले, परंतु इतरांकडून त्याला फारशी साथ मिळाली नाही. दरम्यान, केकेआरला गत तीन सामन्यांत एकही गुण मिळवता आला नाही, ज्यामध्ये दोन पराभव आणि एक निकाल न लागल्याने समावेश आहे. रहाणेआपल्या सघ घसरगुंडी रोखण्यासाठी आणि प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी उत्सुक असेल, कारण आणखी एका पराभवामुळे हे काम कठीण झाले आहे. केकेआरसाठी विविध विभागांमध्ये समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यांच्या फलंदाजीत स्थिरता नाही. क्विंटन न डी कॉक नआणि रहमानुल्ला गुरबाजला नरेनसोबत सलामीच्या खेळाडूंमध्ये फिरवले जात आहे, तर संघ रहाणे आणि तरुण अंगकृष रघुवंशी यांच्यावर धावा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. व्यंकटेश अय्यर, आंद्रे रसेल, रिंकू सिंग व रमनदीप सिंग या मधल्या फळीतील त्रिकुटाला लक्षणीय प्रभाव पाडण्यात संघर्ष करावा लागला आहे. ◀(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**दिल्ली कॅपिटल्स वि. कोलकाता नाईट रायडर्स**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# २०२८ पासून आयपीएल हंगाम १४ सामन्यांचा असणार

### नवीन संघांचा समावेश नाही : अरुण धुमाळ




◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

२०२८ पासून आयपीएल हंगाम ९४ सामन्यांपर्यंत वाढवण्याचा सक्रियपणे विचार करत आहे, परंतु नजीकच्या भविष्यात नवीन फ्रॅन्चायझी सुरू करण्याची बीसीसीआयची कोणतीही योजना नाही, असे आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमाळ म्हणाले.

गुजरात टायटन्स (जीटी) व लखनौ सुपर जायण्ट्स (एलएसजी) फ्रॅन्चायझींच्या विक्रीनंतर २०२२ मध्ये आयपीएल लीगचा विस्तार त्याच्या सध्याच्या ७४ सामन्यांच्या स्वरूपात झाला. स्पर्धेच्या वेळापत्रकात अडचणी आणि ब्रॉडकास्टर्सना जास्त डबल-हेडर खेळण्याची इच्छा नसल्याने २०२५ साठी ८४ सामन्यांपर्यंत वाढवण्याच्या सुरुवातीच्या योजनांना विलंब झाला, परंतु मध्यम कालावधीत विस्तार अजूनही विचाराधीन आहे.

आयपीएलचा भविष्यातील दौरा कार्यक्रम (एफटीपी) पुढील दोन वर्षांसाठी निश्चित केलेला आहे, जो मार्चच्या मध्यापासून मे अखेरपर्यंत चालेल.

बीसीसीआय २०२८ मध्ये सुरू होणाऱ्या पुढील प्रसारण-माध्यम हक्क सायकलसाठी संपूर्ण होम-ॲण्ड-अवे, ९४-मॅच फॉरमॅटमध्ये विस्तार करण्याचा गंभीरपणे विचार करेल, असे अरुण धुमल यांनी सांगितले.निश्चितच, ती एक संधी असू शकते. आम्ही आयसीसीमध्ये चर्चा करत आहोत, आम्ही बीसीसीआयमध्ये इन-हाऊस चर्चा करत आहोत. द्विपक्षीय व आयसीसी स्पर्धांबद्दल, फ्रॅन्चायझी क्रिकेट व टी-२० क्रिकेटबद्दल चाहत्यांची आवड कशी बदलत आहे हे पाहता, आम्हाला त्याबद्दल अधिक गांभीर्याने बोलावे लागेल आणि खेळाच्या भागधारकांसाठी जास्तीत जास्त मूल्य कसे निर्माण करता येईल ते पहावे लागेल, असेही ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

### ऑस्ट्रेलियन पॉडकास्टर्सला बीसीसीआयकडून नोटीस

**सिडनी** : बीसीसीआयकडून ''विनम्र कायदेशीर पत्र'' मिळाल्याने एका लोकप्रिय ऑस्ट्रेलियन पॉडकास्टच्या निर्मात्यांना त्यांच्या समाज माध्यम खात्यावरून सध्या सुरु असलेल्या इंडियन प्रीमियर लीगच्या प्रसारणाशी संबंधित 'प्रत्येक व्हिडीओ' काढून टाकण्यास भाग पाडले आहे.

द ग्रेड क्रिकेटरचे आयोजन करणारे सॅम पेरी आणि इयान हिगिन्स यांना आठवड्याच्या शेवटी बीसीसीआय आणि आयपीएलकडून कायदेशीर नोटीस मिळाली. या वर्षीच्या आयपीएल स्पर्धेच्या आमच्या कव्हरेजमधील प्रत्येक व्हिडीओ आमच्या समाज माध्यम खात्यावरून काढून टाकण्यात आला आहे, असे पेरीने सोमवारी पॉडकास्टवर सांगितले. कायदेशीर नोटीस मिळाल्यानंतर आम्ही ते व्हिडिओ काढून टाकण्याचा निर्णय घेतला, ते म्हणाले. ■




# सोलापूरच्या रुद्र कराटे ॲथलिटसना पाच रौप्य व दोन कांस्य

**मलेशिया ओपन कराटे स्पर्धा**

**कोच भुवनेश्वरी सह विजेते संकेत, अन्वी, आर्या, अनुष्का, कार्तिका**

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

कौलालंपूर येथे २५ ते २७ एप्रिल पर्यंत पार पडलेल्या चौदाव्या सायलेंट नाईट मलेशिया ओपन कराटे इंटरनॅशनल्समध्ये शिवस्मारक सोलापूर येथील रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्टस व योग संस्थेच्या पाच कराटे ॲथलिटसनी पाच रौप्य व दोन कांस्य पदकांची कमाई केली.

या स्पर्धेतील सहभागी इंडोनेशियन, मलेशियन व श्रीलंकन प्रतिस्पर्ध्यांवर निसटत्या फरकाने मात केली. संकेत धन्नाईक याने वरिष्ठ गटात वैयक्तिक कुमिते प्रकारात रौप्य, अनुष्का पल्ली हिने कनिष्ठ गटात वैयक्तिक व सांघिक कुमिते प्रकारात रौप्य व अन्वी गाडे हिने कनिष्ठ गटात सांघिक काता प्रकारात रौप्य पटकाविले. तसेच कार्तिका गंधमल हिने सांघिक कुमिते प्रकारात कास्य आणि आर्या यादव हिने सांघिक कुमितेमध्ये रौप्य तर वैयक्तिक कुमिते प्रकारात कास्य पदकांचे कमाई केली.

वर्ल्ड कराटे फेडरेशनच्या कनिष्ठ व वरिष्ठ गटातील एशियन कराटे चँपियनशीप मधील प्रतिस्पर्धींना सामोरे जाण्याकरिता पूर्वतयारी म्हणून मलेशिया ओपन स्पर्धेतील अनुभव कामी येत असल्याने ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशन सोलापूर तर्फे अशा स्पर्धांमधून खेळवून संभावित कराटे ॲथलिटसची एशियन स्तरासाठी तयारी करत असल्याचे कोच भुवनेश्वरी संगीता सुरेश जाधव यांनी सांगीतले. प्रमुख प्रशिक्षक मिहिर सुरेश जाधव यांनी विजेत्यांचा ऑफलाईन व कोच भुवनेश्वरीने ऑनलाईन सराव करवून घेतला.

यशस्वी खेळाडूंचे शहरमध्यचे आमदार देवेंद्र कोठे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार आणि शिवस्मारकचे संचालक गंगाधर धरणे व रंगनाथ बंकापुर तसेच क्रीडाभारतीचे ज्ञानेश्वर मॅकल, भाजप खेल प्रकोष्ठचे यशवंत पाथरुट आणि आय.एम. एस.चेसंचालक अमोल व सायली जोशी यांनी कौतुक केले.



नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात आयोजित पद्म पुरस्कार वितरण सोहळ्यात क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनला पद्मश्री प्रदान करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

# पुण्यातील गजानन पाटील प्रतिष्ठानतर्फे अंगडी, गवळी व खांडेकर यांचा सन्मान

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित मार्गदर्शक माजी क्रीडा अधिकारी गुरुवर्य गजानन मारुती पाटील यांच्या ६३ व्या जयंतीनिमित्त स.हिने. प्रशालेचे क्रीडा शिक्षक क्रीडा शिक्षक विरेश अंगडी, राष्ट्रीय खेळाडू व शहर पोलिस दलातील सुलक्षणा गवळी, श्रीशैल खांडेकर यांचा सन्मान झाला

पुणे येथील पत्रकार भवन सभागृहात क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल क्रीडा प्रशिक्षक व खेळाडू तसेच कठीण परिस्थितीत क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय प्राविण्य मिळवलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आंतरराष्ट्रीय खेळाडू अस्लेश मस्कर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी माजी रणजी कर्णधार श्रीकांत जाधव, निवृत्त उपसंचालक जनक टेकाळे, दत्ता झोडगे, अजिंक्य जाधव, मधुकर पाटील आदी उपस्थित होते.

यंदाचा क्रीडा पुरस्कार अथलेटिक क्रीडा मार्गदर्शक डॉ . अरविंद चव्हाण, खेळाडू प्रणव गुरव आणि रुजूला भोसले यांना प्रदान करण्यात आला. तसेच सोमती कोडक, चैतन्य कावरे, दिव्या घोडेकर, गुलाब वसावे , भवनीत कौर, शामराव दौंडकर, दत्ता झोडगे व साची पांडे (पुणे) यांचे सत्कार करण्यात आले. तसेच विशेष सत्कार ऋतुजा वऱ्हाडे हिचा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात साची पांडे हिच्या प्रार्थनेने झाली.

समारोप पसायदानाने करण्यात आला. डॉ गौरी पाटील यांनी प्रास्ताविक केले. दत्ता झोडगे यांनी आभार मानले. डॉ. दिपाली गोडसे यांनी सूत्रसंचालन केले. .



**पुरस्काराचे यंदा चौथे वर्ष**

डॉ गौरी पाटील यांनी कै. गजानन पाटील यांच्या स्मरणार्थ गुरुवर्य गजानन पाटील क्रीडा प्रतिष्ठानची स्थापना केली असून या अंतर्गत क्रीडा क्षेत्राशी संबंधित उपक्रम राबवले जातात पुरस्काराचे यंदा चौथे वर्ष होते.

# नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमी विजेता

### एनजीसीए करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट

### आनंद शेंडे सामनावीर, निशिकेश गज्जम मालिकावीर

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने एनजीसीए करंडक १४ वर्षांखालील गटाचे विजेतेपद पटकाविले. आनंद शेंडेने सामनावीर तर निशिकेश गज्जमने मालिकावीरचे पारितोषिक पटकाविले.

निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीने आयोजित केलेली ही स्पर्धा डोणगाव रोडवरील पुष्प जिम खानाच्या मैदानावर झाली. यात ८ संघानी भाग घेतला होता. सोमवारी झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी मास्टर अकादमीवर १०२ धावांनी विजय मिळविला. एनजीसीए संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात ६ बाद २६० धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये ऋग्वेद पाटील ६३, संग्राम पवार ४१, आनंद शेंडे ३९, देवांशू बगलेने ३४ धावा केल्या. मास्टर्स क्रिकेट अकॅडमीकडून गोलंदाजीत प्रशांत जाधवने ३८ धावांत दोन बळी टिपले. सूर्यअंजन मुसळे, निशिकेश गज्जम व विवेक बनसोडे यांनी प्रत्येकी गडी बाद केला. विजयी २६१ धावांचे लक्ष्य मास्टर मास्टर्स क्रिकेट अकॅडमीस पेलवले नाही. त्यांना निर्धारित ५० षटकात ९ बाद १५८ धावा करता आल्या. पारितोषिके सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशन टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन संजय वडजे व निवड समिती चेअरमन राजेंद्र गोटे यांच्या हस्ते देण्यात आली. याप्रसंगी इंदापूरचे उद्योगपती श्री. पवार व बार्शीचे उद्योगपती दिनेश येवणकर, राहुल म्हेत्रे, विनोद पाटील, कीर्तिकर आदी उपस्थित होते. स्पर्धेचे आयोजक निलेश गायकवाड यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू गायकवाड यांनी केले.



**वैयक्तिक पारितोषिके**

आनंद शेंडे (सामनावीर). ऋग्वेद पाटील (फलंदाज), निशिकेश गज्जम (फलंदाज व मालिकावीर) अनुज वाल्मिकी (सामन्यातील व स्पर्धेतला गोलंदाज), यशराज टेकाळे (यष्टीरक्षक).

# नाणेफेकीच्या कौलावर पुण्यास विजेतेपद

### क्रीडा भारतीची राज्य निमंत्रित कबड्डी स्पर्धा : छत्रपती संभाजीनगरला उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

पावसामुळे नाणेफेकीच्या कौलावर पुण्याच्या प्रकाशतात्या बालवडकर संघाने राज्य निमंत्रित कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. छत्रपती संभाजीनगरच्या साई सेवा क्रीडा मंडळास उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. जयहिंद क्रीडा मंडळ श्रीरामपूरने तृतीय तर मिडलाईन मुंबईने चौथे स्थान मिळविले.




क्रीडाभारती, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ व भारतीय मजदूर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा शिंदे चौकातील शिवस्मारक मैदानावर पार पडली. रविवारी रात्री उपांत्य सामने झाल्यानंतर पाऊस पडल्यामुळे मॅट ओले झाले होते. त्यामुळे अंतिम सामना नसल्यामुळे नाणेफेकीचा करण्याचा निर्णय पंचानी घेतला. त्यात पुण्याने बाजी मारली. तत्पूर्वी झालेल्या उपांत्य सामन्यात पुण्याने श्रीरामपूरच्या जयहिंद क्रीडा मंडळाचा ४४-२९ असा पराभव केला. यात आदित्य शेळके व भाऊसाहेब गोराने यांनी उल्लेखनीय खेळी केली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात छत्रपती संभाजीनगरच्या साई सेवा क्रीडा मंडळाने मुंबईच्या मिडलाईन स्पोर्टस् क्लबला ४४-२९ असे हरविले. यात राहूल टेके व रत्नेश धावणे यांनी प्रेक्षणीय खेळ केला. या स्पर्धेसाठी पंचप्रमुख म्हणून धाराशिवचे फुलचंद कदम व सहपंचप्रुमख म्हणून सोलापूर जिल्हा कबड्डी संघटनेचे सहसचिव जयंत मोरे यांनी काम पाहिले. पारितोषिके मुख्य सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत, अतरिक्त पोलिस अधिक्षक प्रीतम यावलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. प्रथम चार संघाना अनुक्रमे एक लाख, ५०, २० व १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक व करंडक देण्यात आले. यावेळी क्रीडा भारतीचे अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापुर, प्रांतमंत्री ज्ञानेश्वर म्यॅकल, सहमंत्री डॉ. उज्वल मलजी व अरुण उपाध्ये आदी उपस्थित होते. क्रीडा भारतीचे सचिव राजेश कळमणकर यांनी सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मुंबईत १ मे पासून 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'

## पंतप्रधानाच्या हस्ते होणार उदघाटन

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २८ :**

मुंबई बीकेसी येथील जियो वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे पर्यंत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्याचे उदघाटन १ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी बीकेसी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. पंतप्रधान मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही सहभाग राहणार आहे.

उद्योग मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर हे मुंबईला म्हटले जाते. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी याच महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट सुरू केले. त्यामुळे मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई ही देशात अग्रगण्य शहर आहे. त्याचबरोबर, गेल्या ३ वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक ही एक नंबरला आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई एक नंबरला राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा उद्देश आहे. तसेच महाराष्ट्राची संस्कृती, महाराष्ट्राची सांस्कृतिक संस्कृती, औद्योगिक संस्कृती, पर्यटन संस्कृती आणि ज्या काही महाराष्ट्राच्या परंपरा आहेत, त्या जागतिक पातळीवर जाव्यात, यासाठी मुंबई शहराची निवड केंद्र शासनाने केलेली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रीस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व निर्मातेही कार्यक्रमात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले .

या चार दिवसीय सोहळ्यात भारत पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसेच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. त्यांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी करणार आहेत. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. विशेषतः तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ मे रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ए. आर. रहमान यांच्या सांगीतिक कार्यक्रम होणार आहे.

## अनैतिक संबंधातून एकाचा खून प्रकरण

# दोघा आरोपींना चार दिवसाची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२८ एप्रिल**



मारोळी येथील अनैतिक संबंधातून एका २९ वर्षीय तरूणाचा खून केल्याप्रकरणात सुभाष होनमुखे व संजय होनमुखे या दोघा आरोपींनी पोलिसांनी अटक करून मंगळवेढा न्यायालयाचे न्यायाधीश श्रीमती एस.एन. गंगवाल-शाह यांचेसमोर उभे केले असता चार दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.

या घटनेची हकिकत अशी,यातील ३२ वर्षीय विवाहित महिलेचे मयत सागर इंगोले (रा. सलगर बु.) याचेबरोबर गेल्या दोन वर्षापासून अनैतिक संबंध होते.या घटनेची माहिती तीचा पती व दीर यांना मिळताच दि.२६ एप्रिल रोजी पहाटे ४.०० वा. मारोळी गावात वरील दोघा आरोपींनी मयताच्या डोकीत काठीने मारून गंभीर जखमी करून खून केला. याची फिर्याद मयताचे वडील मनोहर इंगोले यांनी पोलिसांत दिल्यावर वरील दोघा आरोपींना तपासिक अंमलदार पोलिस उपनिरिक्षक विजय पिसे यांनी अटक करून मंगळवेढा न्यायालयात उभे केले होते. न्यायालयाने वरील दोघा आरोपींना दि.३० एप्रिल पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.




# अवकाळी पावसाने मंद्रुप मधील शेतकऱ्यांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल**

शनिवारी रात्री झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. पपई, द्राक्षे, केळी, चिकू व आंबा या फळबागांचे नुकसान झाले. जोरदार वाऱ्यामुळे वीजेचे खांब पडले असून शेतात व रस्त्यावर झाडे उन्मळून पडली आहेत. वीजेचे खांब पडल्याने व तारा तुटल्याने दोन दिवस वीजपुरवठा बंद होता. शनिवारी रात्री वादळी वारा व विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने मंद्रुप परीसरात झोडपून काढले. काही ठिकाणी गारांचा पाऊस पडला .अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे जनावरांसह शेळ्या मेंढयांचे हाल झाले. पावसावेळी सोसाटयाचा वारा असल्याने अनेक घरावरील पत्रे उडाले. सोसाटयाचा वारा असल्याने व विजांच्या कडकडाटही मोठा असल्याने भीतीचे वातावरण होते. गावामध्ये गटारी तुडुंब भरून वाहत होत्या. रात्री दहापर्यंत जोरदार पाऊस बरसल्यानंतर रात्रभर पावसाची रिपरिप सुरूच होती. अवकाळीमुळे व पत्रे उडाल्याने कुटुंबाचे व जनावरांचे हाल झाले. दोन दिवस वीज नसल्यामुळे शेतातील लोकांना पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागली. जोरदार वाऱ्यामुळे आंबे जमीनीवर पडले, तर पपई व केळीची झाडे जमीनदोस्त झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात येत आहे.

### दोन एकर पपई जमीनदोस्त

अवकाळी पावसाबरोबर मोठ्या प्रमाणात वारा असल्याने दोन एकरवरील पपईंचे झाडे जमीनदोस्त झाली आहेत. काढणीला आलेली पपई जमीनीवर पडल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. शासनाने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावे.

**- श्रीकांत मुंजे, शेतकरी, मंद्रुप**

# इंगळगीत श्री रेवणसिद्धेश्वर यात्रा आजपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगीचे श्री रेवणसिद्धेश्वर यात्रा मंगळवार २९ एप्रिल पासून सुरू होत आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अक्षय तृतीयेच्या आदल्या दिवशी म्हणजे मंगळवार २९ एप्रिल रोजी तेलाभिषेक व १००८ दीपोत्सव कार्यक्रम आणि बुधवार ३० एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजता बैल जोडी मिरवणूक, अकरा वाजता ह. भ. प. श्री महांतेश घंटे महाराज हिपळे यांचे भारुडचे कार्यक्रम, दुपारी चार वाजता नंदीध्वज मिरवणूक, पालखी मिरवणूक, पूरवंत, रात्री आठ वाजता बसवेश्वर पाळणा कार्यक्रम होणार आहे. तसेच गुरुवार एक मे रोजी सकाळी नऊ वाजता अमोघसिद्ध गायन संघ कुरुघोट आणि रामलिंगेश्वर गायन संघ गळुर्गी यांच्यातर्फे ढोळ्ळीन पदगळू (ढोल गीतांचे) कार्यक्रम होणार आहे. त्याच दिवशी कुस्तीचे उद्धघाटन इंगळगी चे सुपुत्र आमचे आधारस्तंभ श्री स्वामी समर्थ सूतगिरणी वळसंगचे विद्यमान अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांच्या हस्ते होणार आहे. शुक्रवार २५ एप्रिल ते २९ एप्रिल दररोज सायंकाळी सात ते रात्री नऊ या वेळेत लिंगन्ना शास्त्री (कुंभारी) यांचे प्रवचन होणार आहे. तरी या यात्रा कालावधीमध्ये चालणाऱ्या विविध कार्यक्रमांचे सर्व भक्तांनी उपस्थित राहून धर्मलाभ घ्यावे असे आवाहन समस्त रेवणसिद्धेश्वर यात्रा कमिटी आणि ग्रामस्थांनी केले आहे.

# शासनाच्या सर्व सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, दि. २८ एप्रिल:**

: महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अधिकाधिक लोकाभिमुख झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत. १५ ऑगस्टपर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करण्यात याव्यात. जो विभाग १५ ऑगस्टपर्यंत त्यांच्या सेवा ऑनलाईन होणार नाहीत, त्या विभागाला दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. असे प्रतिपादन सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.



सह्याद्री अतिथीगृह येथे साम ान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन) आणि महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यम ाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची ''दशकपूर्ती'' आणि ''प्रथम सेवा हक्क दिन'' निमित्त राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव, आयोगाचे नवनियुक्त ब्रँड अम्बेसेडर पद्मश्री शंकर महादेवन, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, म ाजी राज्य सेवा हक्क मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रीय, राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण बलदेव सिंह, पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यासह वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सध्या १००० पेक्षा जास्त सेवा या कायद्याच्या अंतर्गत अधिसूचित केल्या आहेत. जवळपास ५८३ सेवा ऑनलाईन दिल्या जात आहेत. अजून ३०६ सेवा या ऑनलाइन आणायच्या आहेत तर १२५ सेवा ऑनलाईन आहेत पण त्या कॉमन पोर्टलवर उपलब्ध नाहीत आणि म्हणून शासनाच्या सर्व विभागांना १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत सर्व सेवा ऑनलाईन कराव्यात.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे मूलभूत अधिकार संविधानात समाविष्ट केले हे मूलभूत अधिकार सर्वांना मिळाले पाहिजेत. गेल्या १० वर्षात तंत्रज्ञानाच्या गतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात फरक पडलेला आहे आणि म्हणून या सेवा अधिक गतिमान पद्धतीने करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत. मंत्रालयात चेहरा पडताळणी ॲपमुळे देखील निम्मी गर्दी कमी


# रामहिंगणीत जावयाने केला सासऱ्याचा खून

## सासू व मेव्हणी गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.२८ एप्रिल-**

पत्नीस नांदायला पाठवत नसल्याच्या रागातून जावयाने सासऱ्याचा खून करून सासू व मेहुण्यास गंभीर जखमी केल्याची घटना रविवारी रात्री १२ वाजणेच्या सुमारास राम हिंगणी (ता. मोहोळ) येथे घडली .

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयत बापूराव माशाळ हे त्यांची पत्नी आणि मुलगा यांच्यासह रामहिगणी काळे वस्ती येथे राहत्या घराच्या पोर्चमध्ये झोपलेले होते. मंगेश देविदास सलगर (वय- ३५ रा. वडवळ स्टॉप जवळ, लक्ष्मी नगर कोळेगाव ता.मोहोळ) याने पत्नी निशाला नांदण्यास सासरा आणि सासूच पाठवत नसल्याने तसेच उलट कोर्टात दावा करतात म्हणून रागाच्या भरात झोपलेल्या सासरे बापूराव मासाळ यांना चाकूने वार करून भोकसून जीवे ठार मारले. गोठ्याम ध्ये झोपलेला त्यांचा मुलगा अभिषेक मासाळ व त्याची आई आशाबाई सोडवण्यासाठी गेले असता त्यांनाही जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने चाकूने भोकसून गंभीर जखमी केले. विशेष म्हणजे त्यानेच रात्री १२ वाजून २६ मिनिटांनी मोहोळ पोलिस ठाण्यात फोन वर रामहिगणी येथे ५ ते ६ लोकांनी मारहाण केली आहे अबुलन्स व पोलिस मदतीची गरज असल्याचे सांगितले. त्यानुसार सदर माहितीवरून पोलीस उपनिरीक्षक के०सरकर, पो.ह.पवार व पो.कॉ. पवार हे रामहिंगणी येथे रवाना झाले. दरम्यान, १वाजाण्याच्या सुमारास कॉल करणाराने पुन्हा कॉल करून घटनास्थळी लवकर यावे अशी विनंती केली. पोलीस उपनिरीक्षक केसरकर यांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली. त्यावेळी एक इसम घराच्या बाहेर रक्ताने माखलेल्या अवस्थेत आढळला. आजूबाजूचे नागरिकांनी माहिती दिली की, सदर कॉल करणारा मंगेश देविदास सलगर (वय २९ वर्षे, रा. वडवळ स्टॉप, कोळेगाव, ता. मोहोळ, जि. सोलापूर) याने आपले सासरे बापूराव तुळशीराम मासाळ, सासू आशा मासाळ व मेव्हणा अभिषेक यांच्यावर झोपेत असताना चाकूने सपासप वार केले आहेत. जखमींना अश्विनी हॉस्पिटल, सोलापूर येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे. मंगेश सलगर याने घटनेनंतर स्वतः:च जखमा करून घेतल्याचे लोकांकडून समजून आले. त्यास तातडीने पोलीस सुरक्षेत ग्रामीण रुग्णालय मोहोळ येथे उपचारासाठी हलविण्यात आले. जखमींबाबत अश्विनी हॉस्पिटल,इथून मिळालेल्या माहितीनुसार जखमी बापुराव तुळशीराम मासाळ, वय ५३ वर्षे, रा. राम हिंगणी, ता. मोहोळ हे मरण पावले आहेत. तर त्यांची पत्नी आशाबाई, (वय ४८) वर्षे आणि त्याचा मुलगा अभिषेक, वय २४ वर्षे हे देखील जखमी असून अभिषेक याचा जबाब नोंदवून घेण्यात आला आहे याबाबत मयत सासरे बापूराव मासाळ यांचा मुलगा अभिषेक मासाळ रा काळे वस्ती राम हिंगणी याने त्याचे भावजी मंगेश देविदास सलगर वय - ३५ याच्या विरोधात फिर्याद दाखल केली आहे . त्यानुसार मोहोळ पोलिसांनी बापूराव मासाळ यांचा धारदार हत्याराने खून करून त्यांचा मुलगा मंगेश माशाळ व त्याची आई या दोघाना गंभीर जखमी केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे या घटनेचा तपास मोहोळ पोलिस ठाण्यातील ए पी आय पाटील हे करित आहेत





मयत - बापूराव माशाळ

# मंद्रुपमध्ये ८ मे पासून पीर शेख साहेब व शेख सालार उरूस

## महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख व हरीयाणाचे विक्रांतकुमार यांच्या कुस्तीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल**

सालाबादप्रमाणे यंदाही ॲड. राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आठ मे पासून शेखसाहेब व शेख सालार उरूस संपन्न होणार आहे.

यावेळी पीर शेखसाहेब ट्रस्ट अध्यक्ष शब्बीर मुल्ला, मंद्रुपचे तहसीलदार सुजित नरहरे , सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार, सरपंच अनिता कोरे, उपसरपंच भगवान व्हनमाने यांच्या प्रमुख उपस्थितीत राहणार आहे. १० मे रोजी महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख व हरीयाणाचे विक्रांतकुमार यांच्या कुस्तीचे आयोजन करण्यात आल्याची माहीती संयोजक माजी उपसरपंच रमेश नवले व पैलवान सुनिल टेळे यांनी दिली. यावेळी नितीन टेळे, संतोष बरूरे, म्हाळप्पा नरूटे, श्रीमंत रूपनर , जावेद तांबोळी व इम्रान मुल्ला आदि उपस्थित होते.

गुरुवार दिनांक ८ मे रोजी रात्री संदल मिरवणुक व दिवसभर बबलेश्वरचे सुरेश हंगीरगी व अथणीच्या के. सर्यवंशी यांचे कलगी तुऱ्याचे गाणे होणार आहेत. शुक्रवार दिनांक ९ मे रोजी सकाळी कलगी तुऱ्याचे गाणे, रात्री गलीफ मिरवणुक, शनिवार दिनांक १० मे रोजी सकाळी कलगी तुऱ्याचे गाणे व दुपारी ४ वाजता भव्य जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ५० रूपयांपासून ते दोन हजार रूपयांपर्यंत कुस्त्या होणार आहेत. यावेळी कै. खंडू वाघम ोडे यांच्या स्मरणार्थ विजेत्या पैलवानाला मानाची गदा देण्यात येणार आहे.

## निधन वृत्त...

### मंगल पात्रे



**सोलापूर,दि.२९-**

माजी महापौर स्व. मुरलीधर पात्रे यांच्या पत्नी मंगल पात्रे (वय ७२) यांचे सोमवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा न्यू बुधवार पेठेतील त्यांच्या राहत्या घरापासून उद्या (मंगळवारी) दुपारी एक वाजता निघणार आहे. रूपा भवानी स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. पत्रकार नितीन पात्रे यांच्या त्या मातोश्री होत.

### अशोक कलशेट्टी



**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

आरोग्य विभागातील माजी निवृत्त प्रशासकीय अधिकारी आणि भवानी पेठेतील नवदुर्गा मंडळाचे खजिनदार अशोक कलशेट्टी (वय ६६) यांचे शनिवार २६ एप्रिल रोजी रात्री साडेआठ वाजता ह्रदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर लिंगायत रुद्रभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा, मुलगी, जावई,भाऊ, वहिनी पुतणे पुतणी असा मोठा परिवार आहे. ते पत्रकार सुभाष कलशेट्टी यांचे काका होत.


### उत्तमराव निकाळजे



**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

संजय नगर कुमठा नाका येथील रहिवासी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हायस्कूलचे सचिव उत्तमराव निकाळजे (वय ८७) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. प्रभाग क्रमांक २० चे नगरसेवक प्रवीण निकाळजे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### जनार्दन डोके



**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

श्री भगवंत आणि पांडुरंगाच्या भक्तीत लीन होऊन, भजन आणि कीर्तनामध्ये दंग होऊन, बेभान होऊन नाचणारे, हभप जनार्दन (आप्पा) डमरे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते १०५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात चार भाऊ, पुतणे, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### काशीबाई पासकंटी



**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

अशोक सिद्राम पासकंटी यांच्या मातोश्री कै. काशीबाई सिद्राम पासकंटी (वय ७९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळ लवकरच कार्यरत

## कामगार मंत्री आकाश फुंडकर यांचे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या शिष्टमंडळास आश्वासन

**मुंबई, दि. २८ एप्रिल:**

वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाची रचना व आर्थिक तरतुदीबाबत कार्यवाही सुरू असून लवकरच राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठीचे स्वतंत्र कल्याणकारी मंडळ कार्यरत करू असे आश्वासन राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिले. वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे मार्गदर्शक, ठाणे येथील आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या शिष्टमंडळाने कामगार मंत्री श्री फुंडकर यांची मुंबईत भेट घेतली, त्यावेळी श्री फुंडकर यांनी हे आश्वासन दिले. या शिष्टमंडळात राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर वर्धा, कार्याध्यक्ष बालाजी पवार नांदेड, सरचिटणीस विकास सूर्यवंशी सांगली, कोषाध्यक्ष राजेंद्र टिकार बुलढाणा व व्यवस्थापन समिती सदस्य दत्तात्रय घाडगे ठाणे यांचा सहभाग होता.




वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मागील सरकारच्या काळात मंत्रिमंडळ बैठकीत स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाला मान्यता देण्यात आली आहे. मात्र अद्याप पुढील कारवाई झालेली नाही. याबाबत राज्य संघटनेच्या शिष्टमंडळाने श्री केळकर यांच्या समवेत कामगार मंत्री श्री फुंडकर यांची भेट घेतली.

वृत्तपत्र विक्रेता हा दुर्लक्षित घटक असून अनेक अडचणींवर मात करत व्यवसाय करत आहे. सध्या वृत्तपत्र व्यवसायातील अडचणी बरोबरच या वृत्तपत्र विक्रेत्यांनाही लढावे लागत आहे. त्यामुळे वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठीचे कल्याणकारी मंडळ लवकरात लवकर कार्यरत करावे. या मंडळासाठी लागणारा निधी उभा करण्याचे मार्ग राज्य शासनाने नेमलेल्या अभ्यास समितीने सुचवलेले आहेत. २०१९ मध्ये या अभ्यास समितीने आपला अहवाल राज्य शासनास दिला असून त्यातील सुचवलेल्या मार्गापैकी काही मार्गांचा अवलंब करून निधीचा स्त्रोत नक्की करावा. त्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी पेन्शन, व्यवसायासाठी मदत, व्यवसायासाठी साधनसामग्रीची पुरवठा, आरोग्य सुविधा, वृत्तपत्र विक्रेत्यांच्या म ुलांच्या उच्च शिक्षणासाठी योजना आदी योजना लागू करव्यात अशी विनंती आमदार केळकर यांनी वृत्तपत्र विक्रेत्यांच्यावतीने कामगार मंत्र्यांच्या वेळी केली. राज्य संघटनेचे अध्यक्ष पाटणकर, कार्याध्यक्ष श्री पवार, सरचिटणीस सूर्यवंशी, कोषाध्यक्ष टिकार व सदस्य घाडगे यांनीही यावेळी झालेल्या चर्चेत सहभाग घेतला.

कामगार मंत्री फुंडकर यांनी यावेळी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या व्यवसाय एकूण कामाची पद्धत याबाबत सविस्तर चर्चा केली. इतर महामंडळाबाबतच्या येत असणाऱ्या अडचणी व त्याचा विचार करून वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी असणाऱ्या स्वतंत्र कल्याणकारी मंडळाची रचना याबाबत काम सुरू असल्याचे सांगितले. लवकरच वृत्तपत्र विक्रेत्यांचे कल्याणकारी मंडळ कार्यरत होईल असे आश्वासन दिले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ॥ उसंतवाणी ॥

१४९४



काश्मीर प्रश्नी जे । बोलती कुजके ।
बोलुनी मोजके । हाणा त्यांना ॥१॥

अजुनी हल्ल्याची । वाटे ज्यांना शंका ।
जाळा त्यांची लंका । वैचारीक ॥२॥

वळवळे ज्यांचा । सेक्युलर किडा ।
त्यांना द्यावा धडा । कडक तो ॥३॥

काश्मीरात धाडा । लिब्रांडुंना आधी ।
तिकडेच व्याधी । जाऊ द्या रे ॥४॥

यांना म्हणे हव्या । बैठका नि चर्चा ।
कमिटीत खुर्च्या । अडविती ॥५॥

गंगा नि जमनी । यांची तहजीब ।
बरळते जीभ । सेक्युलर ॥६॥

कांत म्हणे सारी । चर्चा आहे व्यर्थ ।
कृतीलाच अर्थ । नेमका तो ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
२८ एप्रिल २०२५

# ८०० पोलिसांना महासंचालकांचे बोधचिन्ह जाहीर

✔ सोलापूर शहर व ग्रामीण पोलिस दलातील २० जणांचा समावेश


मनिषा दुबुले


मनोज यादव


शैलेंद्र सातपुते


दिलीप किर्दक


मोहम्मद करनाचे


दिपक चव्हाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
पोलिस दलामध्ये विविध प्रकारच्या प्रवर्गामध्ये केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल आणि राष्ट्रपती यांचे गुणवत्ता पुर्ण सेवेचे पदक व शौर्य पदक प्राप्त केलेल्या राज्यातील ८०० पोलिस अधिकारी व अमंलदार यांना राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी १ मे महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर बोधचिन्ह/सन्मानचिन्ह जाहिर केले आहे.

यामध्ये सोलापूर जिल्ह्यात यापूर्वी कार्यरत असलेल्या मनिषा दुबुले, मनोजकुमार यादव, बाळासाहेब भालचिम, संजीवकुमार झाडे या पोलिस अधिकाऱ्यांसमवेत सोलापूर शहर व ग्रामीण पोलिस दलातील २० पोलिस अधिकारी व अमंलदारांचा समावेश आहे. येत्या महाराष्ट्र दिनाच्या समारंात पोलिस पदक देऊन पोलिसांना सन्मानित करण्यात येणार आहे. पोलिस दलात उत्कृष्ठपणे योगदान देत सातत्याने वैशिष्टयपूर्ण कामगिरीवर भर देणाऱ्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राज्याच्या पोलिस महासंचालकाडून विशेष बोधचिन्ह मंजूर केले जाते. पोलिस महासंचालक कार्यालयाकडून सोमवारी बोधचिन्ह मंजूर झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे जाहिर करण्यात आली. यामध्ये सोलापूर जिल्ह्यात यापूर्वी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे.

**अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे अशी...**
**(कंसात सध्याचे कार्यरत ठिकाण) :**

मनिषा दुबुले (पोलिस अधिक्षक, सीआयडी, कोल्हापूर), मनोजकुमार यादव (उपअधिक्षक, लोहमार्ग, पुणे), बाळासाहेब भालचिम (उपअधिक्षक, सातारा), संजीवकुमार झाडे (पोलिस निरीक्षक, कोल्हापूर)

अजित पाटील (पोलीस उप अधीक्षक, सोलापूर ग्रामीण), संगीता पाटील (पोलिस निरीक्षक, सोलापूर शहर), नागनाथ कानडे (पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर शहर), शैलेंद्र सातपुते (ग्रेड पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर शहर), दिलीप किर्दक (ग्रेड पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर शहर), विलास इंगळे (ग्रेड पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर शहर), सिध्दू थोरात (ग्रेड पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर शहर), महंमद करनाचे (ग्रेड पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर शहर), मकरंद कुलकर्णी (ग्रेड पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर शहर), राजेंद्र बंडगर (ग्रेड पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर शहर), गुरूसिध्दप्पा इंगळगी (ग्रेड पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर शहर), विनोद घाटे (ग्रेड पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर ग्रामीण), चंद्रकांत पवार (सहायक पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर ग्रामीण), सुभाष शेंडगे (सहायक पोलिस उपनिरीक्षक, सोलापूर ग्रामीण), संतोष गायकवाड (पोलिस हवालदार, सोलापूर ग्रामीण), विजय पौळ (पोलिस हवालदार, सोलापूर शहर), दिपक चव्हाण (पोलिस हवालदार, सोलापूर शहर), विनोद चौहान (पोलिस हवालदार, सोलापूर शहर), दिपक डोके (पोलिस शिपाई, सोलापूर शहर), दादासाहेब सरवदे (पोलिस शिपाई, सोलापूर).


नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्मभूषण पुरस्कार स्वीकारताना अभिनेते नंदमुरी बाळकृष्ण.



## शेठ गोविंदजी रावजी महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

### २५ वर्षांनंतर विद्यार्थी पुन्हा एकत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
येथील शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयात १९९६ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा दिनांक २६ व २७ एप्रिल २०२५ रोजी अतिशय उत्साही वातावरणात उपलप फॉर्म हाऊस,विजापूर रोड, सोरेगाव येथे संपन्न झाला.

२५ वर्षांच्या कालखंडानंतर सर्व माजी विद्यार्थी पुन्हा एकत्र आले आणि पुन्हा एकदा आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा देत, वर्गातील वातावरणाचा अनुभव घेतला.

दि. २७ एप्रिल रोजी सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भेट दिली. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वीणा जावळे, उपप्राचार्य डॉ. शांतिनाथ बागेवाडी, आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ. आनंद मादगुंडी यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन शैक्षणिक समन्वयक व सहयोगी प्राध्यापक डॉ. रेवणसिद्ध उस्तुरगे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. हनुमंत क्षीरसागर यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे तसेच माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले. स्नेहमेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यासाठी निमाच्या (National Integrated Medical ssociation - NIM) सोलापूर शाखेचे माजी अध्यक्ष डॉ. रुपेश एडके, डॉ. रवी पवार, डॉ. प्रणित नरळे आणि डॉ. सुखदेव शिनगारे यांनी मेहनत घेतली.

## महात्मा बसवेश्वरांनी समताधिष्ठित समाजाची निर्मिती केली : डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य

### सोलापूर विद्यापीठात बसवेश्वर जयंतीनिमित्त व्याख्यान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात स्त्री-पुरुष समानतेचे धोरण अंगीकारत जातिवाद नष्ट करत समताधिष्ठित समाजाची निर्मिती करून समाज सुधारण्याचे महान व क्रांतिकारी कार्य केल्याचे गौरवोद्गार कपिलधारा येथील डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महास्वामी यांनी काढले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासनच्यावतीने महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी डॉ. वीरूपाक्ष शिवाचार्य महास्वामी हे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा हे होते. अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत केले.

डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य म्हणाले, महात्मा बसवेश्वरांनी वचन साहित्याच्या माध्यमातून ज्ञानाचा भांडार निर्माण केला आहे. या वचनांमधून आदर्श जीवनशैली, विचारशैली तसेच चांगले शिकवण सांगितले आहे. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी अनुभवमंटपाची निर्मिती करून लोकशाहीची खरी मूल्ये रुजवण्यास सुरुवात केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा म्हणाले, महात्मा बसवेश्वरांनी समाज सुधारण्याचे महान कार्य केले आहे. अनेक वचन साहित्य त्यांनी रचले. सूत्रसंचालन डॉ. अंबादास भासके यांनी केले.

## महत्वाचे...



### पोस्ट बेसिक आश्रम प्रशालेमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
नेहरू नगर येथील पोस्ट बेसिक आश्रम प्रशाला एस.एस.सी. १९९३ बॅच मधील माजी विद्यार्थ्यांचा तिसऱ्यांदा स्नेहमेळावा नुकतेच कामती येथील सिनाई रिसॉर्ट सेंटर येथे पार पडला. या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त माजी विध्यार्थी संजयकुमार राठोड, माजी विध्यार्थी पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. तोळाराम राठोड, मागास सेवा समाज संस्थेचे संचालक माजी विद्यार्थी सचिन चव्हाण, पोलीस निरीक्षक राकेश जाधव उपस्थित होते. ॲडव्हेंचर पार्कमध्ये विविध खेळ, बाबा गाडीमध्ये बसून मनसोक्त आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. सूत्रसंचालन महारुद्र कत्ते तर आभार गंगाधर फुलमाळी यांनी मानले. स्नेहमेळावा संयोजक समितीमध्ये पत्रकार माजी विद्यार्थी राजेंद्र कांबळे, रमेश जाधव यांनी परिश्रम घेतले.



### लोकमंगल बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त ५१ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
लोकमंगल बँकेच्या २८ व्या वर्धानप दिनानिमित्त बँकेच्या प्रदान कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हेडगेवार रक्तपेढीचे व्यवस्थापक रंगनाथ जोशी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी बँकेचे संचालक देवानंद चिलवंत, सौरभ अंबुरे, अनंता चव्हाण, सतीश लामकाने, अशोक सापटनेकर, अभिजीत टाकळीकर, जितेंद्र नाईक-लाड व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस, लोकमंगल फौंडेशनचे संचालक मारुती तोडकर उपस्थित होते.

### पु.ना.गाडगीळ ज्वेलर्समध्ये अक्षय्य तृतीयेनिमित्त ऑफर

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
जानेवारी महिन्यात सिने अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते शुभारंभ झालेल्या पु.ना.गाडगीळ ज्वेलर्स येथे अक्षय्य तृतीये निमित्त ग्राहकांसाठी विशेष आकर्षक योजना सुरु करण्यात आली. सोन्याच्या दागिन्याच्या मजुरीवर ३० टक्के पर्यंत सूट, डायमंडच्या दागिन्यांच्या मजुरीवर १०० टक्के पर्यंत सूट तर जुने सोन्यावर कोणतीही घट तूट नाही. व्ही.आय.पी रोड, एम्प्लॉयमेंट चौक, हॉटेल ध्रुव समोर असलेल्या दालनात दि. १८ एप्रिल ते ३० एप्रिलपर्यंत या आकर्षक संधीचा लाभ ग्राहकांना घेता येणार आहे.




## चंदननगरमध्ये स्वामींच्या स्वयंभू पादूकांचे पूजन स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त भजन व महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**
जुळे सोलापूर येथील चंदननगरमध्ये स्वामी समर्थांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रदिपकाका पानसरे यांच्या निवासस्थानी स्वयंभू पादूकांचे पूजन करण्यात आले.




गेल्या ४० वर्षापासून हा उपक्रम सुरू आहे. १९८२ मध्ये पानसरे काकांच्या घरी स्वामींच्या पादूका स्वयंभू प्रकट झाल्यानंतर त्यांनी हा उत्सव सुरू केला. दहा वर्षे लाडूवाटप केले जात होते. त्यानंतर मात्र महाप्रसाद सुरू केल्याचे अमोल पानसरे यांनी सांगितले. दरवर्षी दोन हजार भक्तांना महाप्रसाद वाटप होत असे. कोरोनानंतर मात्रा दोनशे ते तीनशे भक्तांना महाप्रसाद वाटप होत असल्याचे अतुल पानसरे यांनी सांगितले. दरम्यान या उत्सवानिमित्त सकाळी लघुरूद्राचा अभिषेक होऊन दुपारी १२ वाजता 'श्री स्वामी समर्थ' च्या गजरात गुलाबपुष्पवृष्टी झाली. नैवेद्य आरती होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी वासुदेव कुलकर्णी यांच्या मंडळाचे भजन झाले. प्रतिभा पानसरे, मानसी व मधूर पानसरे, भास्कर रत्नपारखी, शैलेंद्र गिराम, निलेश व्हनमाने, समर्थ पुजारी, कृष्णात उपाध्ये, शंकर उपाध्ये, रूद्रेश स्वामी आदींचे सहकार्य लाभले.

## सोलापुरात ३० बटूंच्या होणार मोफत सामुदायिक मुंजी

### देऋब्रा संस्था, ब्रह्म संस्था व दत्तात्रय पाठक यांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, जुळे सोलापूर ब्रह्म बहुउद्देशीय सामाजिक संस्था आणि द्वारकाधीश मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक यांच्या वतीने १ मे व ७ मे रोजी सुमारे ३० बटुंवर मोफत सामुदायिक उपनयन संस्कार होणार आहेत.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणातेजक संस्थेतर्फे दिनांक ७ मे रोजी जुळे सोलापूरातील द्वारकाधीश मंदिरात नऊ बटूंवर उपनयन संस्कार केले जाणार आहेत. सकाळी १० वा. १३ मिनिटांचा मुहूर्त आहे. पुरोहित जयंत तुळजापूरकर व सहकारी पौरोहित्य करणार आहेत. यावेळी बटूंना संस्थेतर्फे नवीन सोवळे, उपरणे, ताम्हण, पळी आणि पंचपात्र असे साहित्य दिले जाणार आहे. एका बटू समवेत १० पाहुणे मंडळींना मोफत भोजन संस्थेतर्फे दिले जाईल. उपनयनसाठीच्या धार्मिक विधीचा खर्च संस्थेतर्फे केला जाणार असल्याची माहिती युवक शाखा अध्यक्ष तथा कार्यक्रम प्रमुख सुशांत कुलकर्णी यांनी दिली. जुळे सोलापूर ब्रह्म बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे गुरुवार दि. १ एक मे रोजी दिपाली केटरर्स येथे सामुदायिक उपनयन संस्कार होणार आहेत. या सोहळ्यात १२ बटू सहभागी होणार आहेत. संस्थेतर्फे सर्व बटूंना धार्मिक विधीचे साहित्य, ताम्हण, पळी, भांडे, तांब्या आणि पंचे यासह पाहुणे मंडळींना भोजन सर्व काही मोफत दिले जाणार आहे. सकाळी ११ वा. २१ मिनिटांनी मुहूर्त आहे. यावेळी राघवेंद्राचार्य आद्य गुरुजी व सहकारी पौरोहित्य करणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डी.डी. कुलकर्णी यांनी दिली.



विजापूर रोडवरील द्वारकाधीश मंदिरचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक यांच्यावतीने सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून दि.१ मे रोजी द्वारकाधीश मंदिरात सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा होणार आहे. यावेळी ९ बटूंवर संस्कार होतील. सकाळी ११ वाजून ३४ मिनिटांचा मुहुर्त आहे.

पौरोहित्य वैभव शिरसीकर आणि सहकारी करणार आहेत. बटूंना सोवळे, उपरणे, पळी, पंचपात्र, ताम्हण, तांब्या यासह पाहुणे मंडळींना भोजन दिले जाणार आहे. यानिमित्ताने त्याच दिवशी २५ ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, संगीताचा कार्यक्रमही होणार असल्याची माहिती दत्तात्रय पाठक यांनी दिली.



### शपथ सेवा हक्क दिनाची...

**सोलापूर :** पोलिस आयुक्त कार्यालयात सेवा हक्क दिनाच्या अनुषंगाने सोमवारी पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना शपथ दिली. यावेळी पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, डॉ. दीपाली काळे, वरिष्ठ पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

## कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**
'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार', आता कीर्तनाची वेळ सोमवार ते शनिवार सायंकाळी ६ वाजता फक्त आपल्या सोनी मराठी वाहिनीवर.'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' हा महाराष्ट्रातील कीर्तनकारांवर आधारित असलेला पहिला वहिला रिॲलिटी शो असून याने कीर्तनकारांना खूप मोठी संधी देणारा प्लॅटफॉर्म 'सोनी मराठी' वाहिनीनं उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधून १०८ कीर्तनकारांसह हा शो सुरू झाला आणि महाराष्ट्राचा सांस्कृतिक असा अनमोल ठेवा अभिमानानं रसिकांसमोर आणला. 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' या सोनी मराठी वाहिनीच्या रिॲलिटी शो अंतर्गत महाराष्ट्रातील कीर्तनकारांना खूप मोठा रंगमंच मिळाला आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## साईनाथ नगरात गळफासाने तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

डोणगाव रस्त्यावरील साईनाथ नगरात राहणाऱ्या तरुणाने राहत्या घरात रविवारी सायंकाळी ७ च्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली.

विशाल शत्रुघ्न घुले (वय ३४, रा. साईनाथ नगर) असे तरुणाचे नाव आहे. रविवारी सायंकाळी सातच्या सुमारास विशाल याने राहत्या घरात छताच्या हुकाला बेडशीटच्या सहाय्याने गळफास घेतला. त्यास बेशुध्द अवस्थेत खाली उतरवून हवालदार वाल्मिकी यांनी रात्री ८.३५ वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# बाजार समितीच्या राजकीय आखाड्यात कल्याणशेट्टींच्या पॅनलने मारली बाजी!

**सलग दुसऱ्या विजयश्रीचे माने अन् हसापुरे ठरले किंगमेकर**

- आ. सुभाष देशमुख पॅनलचे तीन उमेदवार झाले विजयी
- सर्वांना एकत्रित घेऊन बाजार समिती अग्रगण्य ठेवू : आ. सचिन कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार दिलीप माने, दक्षिणचे नेते सुरेश हसापुरे यांच्याच पॅनलचे वर्चस्व राहिले. बाजार समितीच्या १८ संचालकापैकी तब्बल १५ जागा जिंकण्यात कल्याणशेट्टी यांच्या श्री सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनलला यश आले. तर आमदार सुभाष देशमुख यांनी उभे केलेल्या परिवर्तन पॅनलकडे ग्रामपंचायत मतदार संघाच्या तीन जागा गेल्या. ग्राम पंचायत मध्ये मात्र आमदार बापू यांनी विरोधकांना चांगलेच ताणवल्याचे पाहायला मिळाले. मात्र या विजयाचे खरे किंगमेकर माजी आमदार दिलीप माने आणि सुरेश हसापुरे हेच ठरल्याचे दिसून आले.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पॅनल मध्ये दिलीप माने, सुरेश हसापुरे, राजशेखर शिवदारे, श्रीशैल नरोळे, अविनाश मार्तंडे, इंदुमती अलगोंडा ही प्रमुख नेतेमंडळी होती. तर आमदार सुभाष देशमुख यांनी उभ्या केलेल्या पॅनलमध्ये त्यांचे चिरंजीव मनीष देशमुख, रामप्पा चिवडशेट्टी, आप्पासाहेब पाटील, चनगोंडा हवीनाळे, धनेश आचलारे त्यांच्यासह इतरांचा समावेश होता. बापूंनी या निवडणुकीत आमदार विजयकुमार देशमुख, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, राष्ट्रवादीचे काका साठे, महादेव चाकोते, जाफरताज पाटील, बाळासाहेब शेळके या नेत्यांची मदत घेतली होती. त्याचा ग्रामपंचायत मध्ये निश्चितच फायदा झाला. मात्र बाजार समितीवर आपली सत्ता आणू शकली नाही.

रविवारी या निवडणुकीसाठी तब्बल ९६ टक्के मतदान झाले होते. त्यामुळे निकाल काय लागणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांनी सुरुवातीला सर्वात हॉट समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत मतदार संघाचे मतमोजणी घेतली. यामोजणीमध्ये आमदार सुभाष देशमुख यांच्या पॅनलने बाजी मारत चार पैकी तीन जागा जिंकल्या. सर्वसाधारण मधून मनीष देशमुख, रामप्पा चीवडशेट्टी तर अनुसूचित जाती मतदारसंघातून अतुल गायकवाड हे तिघे विजयी झाले. आर्थिक दुर्बल मधून मात्र यतीन शहा यांना पराभवाचा धक्का बसला. त्या ठिकाणी कल्याणशेट्टी समर्थक सुनील कळके हे विजयी झाले. ग्रामपंचायत मध्ये शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वानकर रवी रोकडे आणि संगमेश बंगले पाटील यांना पराभवाचा धक्का बसला.मनीष देशमुख यांनी पहिलीच निवडणूक जिंकल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला त्यांच्या जल्लोषासाठी मतमोजणी केंद्राबाहेर युवा कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, सोसायटी मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलने बाजी मारली असून सोसायटी मतदारसंघातील सर्वसाधारण महिला आर्थिक दुर्बल आणि इतर मागासवर्ग या सर्व ११ चे ११ उमेदवार तब्बल ८०० मताच्या फरकाने विजयी झाले आहेत. सोसायटी मतदारसंघातून कपबशीला मतदारांनी स्वीकारले असून नारळ नाकारला आहे. या निकालाने दिलीप माने व सुरेश हसापुरे यांची सोसायट्यांवर असलेली पकड पुन्हा एकदा स्पष्ट झाली.




**सुरेश हसापुरे आणि मनिष देशमुख यांची गळाभेट :** निकालानंतर बाहेर पडताना मनीष देशमुख आणि संचालक सुरेश हसापुरे यांची भेट झाली. या दोघांनीही राजकीय संस्कृती जपत एकमेकांची गळाभेट घेतली.निकालानंतर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत दिलीप माने, सुरेश हसापुरे राजशेखर शिवदारे आणि त्यांच्या पॅनलच्या विजयी उमेदवारांनी विजय प्रमाणपत्र घेतले.विजयानंतर कार्यकर्त्यांनी मतदान मोजणी केंद्राबाहेर एकच जल्लोष केल्याचे पाहायला मिळाले. ग्राम पंचायत मध्ये आलेल्या अपयशाचे आम्ही सर्व नेते चिंतन करू अशी प्रतिक्रिया देताना हा विजय सर्वसामान्य शेतकरी आणि कार्यकर्त्यांचा असल्याचे सचिन कल्याणशेट्टी यांनी दिलीप माने यांनी सांगितले.

### आम्ही सर्वजण एकत्रित मिळून शेतकरी हितासाठी कार्य करू

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक आम्ही पुन्हा एकदा जिंकलेली आहे. केवळ आणि केवळ शेतकऱ्यांचा विश्वास यामुळे ही निवडणूक जिंकता आली. पुढील बाजार समितीची सर्व कार्य शेतकरी हितासाठीच राहील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पॅनल मधील सर्व वरिष्ठ नेते मंडळी यांचा विचाराने पुढील सभापती उपसभापती निवड करण्यात येईल. सर्वांच्या एकत्रित कार्यामुळे हा विजय झालेला आहे.

**- दिलीप माने, माजी आमदार तथा विजयी उमेदवार**

### शेतकऱ्यांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर पुन्हा एकदा आमचीच सत्ता आली आहे. हा विजय म्हणजे शेतकऱ्यांनी आमच्या व आमच्या पॅनलवर दाखवलेला विश्वास आहे. शेतकऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीची प्रगती आणखीन उत्तरोत्तर वाढवू. तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करू.

**- सचिन कल्याणशेट्टी, आमदार तथा पॅनल प्रमुख**

### प्रस्थापितांविरोधात सुरू केलेल्या लढाईस यश

या निवडणुकीत श्रीसिद्धेश्वर परिवर्तन पॅनलला तीन जागा जरी मिळाल्या असल्या, तरी आम्ही समाधानी आहोत. प्रस्थापितां विरोधात जी लढाई आम्ही सुरू केली होती. त्यास आम्हाला यश येत आहे. पुढच्या निवडणुकीत ही आमची संख्या निश्चितच वाढलेली दिसेल. सत्तेत आलेल्या पॅनलने शेतकरी, कामगार, व्यापारी यांच्या हितासाठी काम करावे अन्यथा आम्ही तीन जरी असलो तरी १५ संचालकांस भारी आहोत हे त्यांनी विसरू नये.

**- मनिष काळजे, शिवसेना जिल्हाप्रमुख**

### अपेक्षेनुसार जागा मिळाल्या

या निवडणुकीत कार्यकर्त्यांसाठी आम्ही कोणाबरोबर युती केली नाही. स्वबळावर लढलो आणि ३ जागा जिंकल्या. १४ भाजपच्या कार्यकर्त्यांना संधी दिली तर एक काँग्रेसचा उमेदवार घेतले. आम्हाला अपेक्षा एवढ्या जागा मिळाल्या आहेत. सोसायटी मतदारसंघात आमची ताकद नव्हती. त्यामुळे तेथे निवडून येण्याचा प्रश्न नव्हता. तरीही येथे आमच्या उमेदवारांना चांगली मते पडली आहेत. निवडून आलेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन.

**- आ.सुभाष देशमुख, परिवर्तन पॅनलप्रमुख**

**मतदारसंघ निहाय विजयी उमेदवार आणि पडलेली मते**

| विजयी उमेदवार | मिळालेली मते |
|---|---|
| **ग्रामपंचायत सर्वसाधारण मतदार संघ** | |
| मनीष देशमुख | ६३५ |
| रामपा चिवडशेट्टी | ६१४ |
| **ग्रामपंचायत अनुसूचित जाती मतदारसंघ** | |
| अतुल गायकवाड | ५८९ |
| **ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल मतदारसंघ** | |
| सुनील कळके | ५७० |
| **सोसायटी मतदारसंघ** | |
| श्रीशैल नरोळे | १२४४ |
| उदय पाटील | १२७६ |
| प्रथमेश पाटील | १२६८ |
| नागण्णा बनसोडे | १२७६ |
| दिलीप माने | १३६२ |
| राजशेखर शिवदारे | १३६६ |
| सुरेश हसापुरे | १३५२ |
| **सोसायटी महिला राखीव मतदारसंघ** | |
| इंदूमती अलगोंडा | १३२७ |
| अनिता विभुते | १२८८ |
| **सोसायटी इतर मागासवर्ग मतदार संघ** | |
| अविनाश मार्तंडे | १३४५ |
| **सोसायटी आर्थिक दुर्बल मतदार संघ** | |
| सुभाष पाटोळे | १२४३ |
| **व्यापारी मतदारसंघ** | |
| मुस्ताक चौधरी | ६२३ |
| वैभव बरबडे | ६६१ |
| **हमाल तोलार मतदारसंघ** | |
| गफार चांदा | ३७३ |




अखेर कल्याणशेट्टी यांचा बाजार समितीमध्ये दमदार प्रवेश.



राजशेखर शिवदारे, दिलीप माने यांची परंपरा कायम...



विजयी आनंद व्यक्त करताना ज्येष्ठ नेते मंडळी.



ठरल्या प्रमाणे आपले सचिन भाऊच आले.



हे बाजार समितीचं राजकारण आहे, इकडे असंच असतं.



नेत्यांना पाहताच... आले आनंदअश्रू.

(सर्व छायाचित्रे केवल तिवारी)

## ▶▶ महत्वाचे...

### पूर्व वैमनस्यातून महिलेला महिलांकडून मारहाण

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

पूर्व वैमनस्यातून महिलेला महिलांकडून लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले. हा प्रकार सोमवारी सकाळी ९ वाजता आमराई, क्रांती नगर येथे घडला. निलोफर आमीर दर्जी (वय ३०, रा. आमराई) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. निलोफर या सोमवारी सकाळी आमराई येथील राहते घराजवळ असताना, पूर्वी झालेल्या भांडणाच्या रागातून मालन रहीम शेख, रजिया शहापूर व इतर दोन जणांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात निलोफर हिच्या चेहऱ्याला जखम झाली तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने दुपारी १२.१० वाजता भाऊ अजहर याने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकीच्या धडकेत सायकलस्वार जखमी

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

होटगी रस्त्यावरील सहारा चोक येथील रस्ता ओलांडताना दुचाकीची धडक बसल्याने सायकलस्वार जखमी झाला. हा अपघात रविवारी रात्री ८.३० वाजता घडली. जरिम करीम तांबोळी (वय ४०, रा. सहारा नगर) असे जखमी सायकलस्वाराचे नाव आहे. जमिर हे रविवारी रात्री ८.३० च्या सुमारास सायकल चालवित सहारा चोक येथून रस्ता ओलांडत होते. त्यावेळी त्यांच्या सायकलीस अज्ञात दचाकीची धडक बसली. यात चेहरा, डोके तसेच दोन्ही पायाला जखम झाली. जखमी अवस्थेत रात्री ९.१० वाजता पत्नी हफिजा यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### घरगुती कारणातून पोलीस ठाण्याजवळ एकाला मारहाण

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

घरगुती कारणाातून अज्ञात व्यक्तीने सलगरवाडी पोलीस ठाण्याजवळ अज्ञात कारणातून लाथाबुक्यांनी तसेच बेल्टने मारहाण केली. हा प्रकार रविवार दुपारी एकच्या सुमारास घडला.युवराज बबन राठोड (वय ४१, रा. डोणगाव ता उ सोलापूर) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. युवराज हा घरगुती कारणातून अज्ञात व्यक्तीने मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागून जखमी झाला. दुपारी चारच्या सुमारास तो स्वत: रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कोंडी शिवारात शेतात महिलेला सर्पदंश


**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी गावाच्या परिसरात शेतात असताना महिलेला सर्पदंश झाला. हा प्रकार रविवारी सकाळी आठ वाजता घडला. सुमन शिवाजी राठोड (वय ३३, रा. कोंडी ता उ सोलापूर) असे महिलेचे नाव आहे. सुमन या रविवारी सकाळी कोंडी शिवारातील त्यांच्या शेतात होत्या. त्यावेळी त्यांच्या उजव्या पायाला सापाने दंश केला. भाऊ विजय चव्हाण याने सकाळी सात वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मिरीत शेतीच्या कारणावरुन तरुणीसह तिघांना मारहाण

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

मोहोळ तालुक्यातील मिरी येथे शेतीच्या कारणातून तरुणीसह तिघांना तलवार तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. हा प्रकार रविवार सायंकाळी ७.३० च्या सुमारास घडला. संजय शिवाजी भोई (वय २४), संगिता संजय भोई (वय २२) व शिवाजी भगवान भोई (वय ५५, सर्व रा. मिरी ता. मोहोळ) असे मारहाण झालेल्यांची नावे आहेत. मिरी गावाच्या शिवारातील शेतात असताना, शिवाजी आणि संतोष कुंभार यांच्यात शेतीच्या कारणातून वाद झाला.



यातून कुंभार व त्याच्या पाच ते सहा साथीदारांनी तलवार व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात संजयच्या डोक्याला, पाठीला जखम झाली. तसेच संगिताहिला डाव्या हाताला जखम झाली तर शिवाजी यास पाठीला जखम झाली. हा प्रकार रविवार सायंकाळी ७.३० च्या सुमारास घडला. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने सोमवारी रात्री १२.५० वाजता नातेवाईक राजकुमार भोई यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# सोलापूर जनता बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षाचा उद्या शुभारंभ

- बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांची माहिती
- ग्राहक सभासदांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

सोलापूर जनता सहकारी बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षाचा बुधवारी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर शुभारंभ होणार आहे. यानिमित्त हुतात्मा स्मृती मंदिरात सायंकाळी ६ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.




या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन कोऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटीज लिमिटेड (नॅफकॅब)चे उपाध्यक्ष सी.ए. मिलिंद काळे, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास सोलापूर जनता सहकारी बँकेच्या सर्व ग्राहक, सभासद, हितचिंतक बंधू भगिनींनी उपस्थित रहावे, असे आवाहन सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी याप्रसंगी केले.

बँकेच्या हीरक महोत्सवानिमित्त वर्षभर सर्व शाखांच्या वर्धापन दिनानिमित्त ग्राहक मेळावे, काही शाखांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, कर्मचाऱ्यांचे विविध गुणदर्शन, व्याख्याने, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, बँकांच्या संचालकांसाठी तसेच कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा, परिसंवाद तसेच विद्यार्थ्यांसाठी माहितीपर व्याख्याने, माजी कर्मचारी आणि माजी संचालक यांचे एकत्रिकरण असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.


बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या शुभारंभानिमित्त बँकेच्या नवी पेठ शाखेत बुधवारी श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली आहे. या पूजेच्या तीर्थप्रसादासाठी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्व ग्राहक, सभासद, हितचिंतकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सोलापूर जनता बँकेतर्फे करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे, संचालक ॲड. प्रदीपसिंह राजपूत, तज्ञ संचालक सी. ए. गिरीष बोरगावकर, जगदीश भुतडा, मुकुंद कुलकर्णी, विनोद कुचेरिया, संचालिका चंद्रिका चौहान, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे, उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी, मकरंद जोशी, देवदत्त पटवर्धन, सहाय्यक सरव्यवस्थापक तुळशीदास गज्जम, मुख्य कार्यालयातील अधिकारी मदन मोरे, सुहास कमलापूरकर, मल्लिनाथ खुने, सुधांशू रानडे उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११०१

**पतित - पावन । करी नाम हे जतन ।।**
**वागवी अभिमान । सेना म्हणे यातिहीन ।।**

सर्वगुण संपन्न असा म्हणजेच सर्व चांगल्या गुणांचा संगम असलेला आणि अवगुणांना अजिबात थारा नसलेला जीव संसारात सापडणे तसे कठीण आहे. कारण संसार म्हटला की कळत न कळत मी हा आलाच. आणि मी आला म्हणजे थोड्या फार प्रमाणात का होईना ईर्षा, द्वेष, मत्सर, काम,क्रोध, अहंकार, माया, लोभ, स्वार्थ आदि किंवा आदिपैकी कांहीतरी आलेच. हे सत्य असले तरी जेव्हा जीवाला जीवनातील कोणत्याही पायरीवर देह हा मिथ्या असल्याची जाणीव होते आणि देहामुळे निर्माण झालेले ईर्षा, द्वेष,मत्सर, काम, क्रोध आदि सुध्दा मिथ्या वाटू लागतात तेव्हा त्याच्याकडून जे कांही घडते ते चांगलेच घडते. चांगल्या वर्तनाची सुरुवात म्हणजे समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम, कर्तव्यरुपी पांडूरंगाचे त्याच्या जीवनात आगमन होणे होय. महापातकांच्या राशीची जाणीव होऊन सत्याकडे पाऊल उचललेल्या आजमिळाचा जर उध्दार होऊ शकतो, तर संसारात लहान सहान पातक केलेल्यांचा उध्दार होणार नाही काय? या जीवाचाही उध्दार होईल. या जीवाने संत समागम करून सत्याची कास धरावी. भगवंत अशांचा उध्दार करतो, स्वीकार करतो. आपला स्वीकार करुन त्याने अभिमान बाळगावा, अशा अपेक्षेसह सेनाजींनी त्यांचा हा भाव प्रगट करतांना पंढरीनाथांना,



**तारिला आजामीळ । महापापी की चांडाळ ।। पतित - पावन । करी नाम हे जतन ।।, वागवी अभिमान । सेना म्हणे यातिहीन ।।,**

असे म्हटले आहे. हा पंढरीनाथ सर्वांचा उध्दारक आहे, येथे सर्व तरतात. असे सांगतांना चोखोबाराय, चोखा म्हणे येथें सर्वां अधिकार । उंच नीच अपार तरले नामें ।।, असे म्हणतात. जन्मत: कोणीही वाईट नसतो. त्याचे चांगुलपण किंवा वाईटपण हे त्याच्यापासून घडणाऱ्या आचार-विचारावर अवलंबून असते. चांगल्या व्यक्तिला वाईटाचा संग लागला तर चांगला व्यक्ति वाईट होऊ शकतो. तसेच वाईट व्यक्तिला चांगल्याचा सहवास लाभला तर वाईट व्यक्ति चांगला होत असतो. अर्थात, चांगल्यांच्या पोटी जन्माला आला म्हणून चांगला आणि वाईटांच्या पोटी जन्माला आला म्हणून वाईट असे होत नाही. पंढरीचा पांडूरंग हा समचरणी उभा राहून समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम आणि कर्तव्याचा संदेश देतो. या पांडूरंगाचा ज्याला सहवास लाभला किंवा जो पांडूरंगाच्या अपेक्षांची पूर्ती स्वत:च्या वर्तनातून करतो, त्याचा उध्दार होतो, असे सेनाजींना वाटते. पंढरीचा पांडूरंग हे चांगुलपणाचे अत्युच्च टोक आहे. त्याचबरोबर हा पांडूरंग मानवतेचा, माणुसकीचा, प्रेमाचा सागर आहे. या सागरात मन:पूर्वक न्हाण्याचा प्रयत्न करणारा ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, माया, अहंकार, स्वार्थ, लोभ आदिच्या मळीतून मुक्त होतो. समचरणी उभा राहून समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम, कर्तव्याचा संदेश देणाऱ्या पांडूरंगाला कर्तव्य तत्पर राहून नि:स्वार्थ प्रेम करणारा भक्त आवडतो. असा भक्त कोणत्या जातीत जन्माला आला किंवा तो स्त्री आहे की पुरुष याच्याशी त्याला कांही देणे घेणे नसते. त्या भक्ताचे कार्य आणि प्रेम हेच त्याच्यासाठी सर्वश्रेष्ठ असते. आपण वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे करतो. त्यामुळे भगवंताने आपल्याकडे यातिहीन म्हणून न पाहता आपल्या कर्तव्याकडे आणि प्रेमाकडे पाहून आपला स्विकार करावा, आपला अभिमान बाळगावा असे सेनाजी लडीवाळपणे म्हणतात. खरे म्हणजे सेनाजींनाही माहिती आहे की, भगवंत त्यांना अव्हेरुच शकत नाही. तरीपण वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे पूर्णत्वास नेण्यातच भगवंताची भक्ती, प्रेम दडले आहे, हे सांगण्यासाठी सेनाजींनी हा लडीवाळपणा केला असावा. आपण स्वत:ला कमी न समजता कार्यतत्पर राहावे, असा भावार्थ येथे घेणे उचित होईल असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, शिवजयंती (परंपरेने), श्री परशुराम जयंती, चंद्रदर्शन |
| दि. २९ एप्रिल २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - विश्वावसू | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - वैशाख | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| शु. द्वितीया (१७.३२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - कृत्तिका (१८.४७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - सौभाग्य (१५.५४) | |
| करण - बालव (०७.१९) | |

### राशीभविष्य

**मेष :** आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. आहारात नियमितता ठेवा. व्यापार मध्यम राहील. व्यक्तिगत समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील जबाबदारीकडे लक्ष द्या.

**वृषभ :** अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. व्यापारात फायदा होईल. मोठ्या लोकांशी संबंध वाढतील. आर्थिक चिंता सलत राहील. कौटुंबिक तणाव रहाण्याची शक्यता.

**मिथुन :** आपल्या चातुर्याचे आपले अधिकारी कौतुक करतील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक आवक वाढेल. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

**कर्क :** व्यवसायात अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. स्व:विवेक बुद्धीने काम करा. कौटुंबिक परिस्थिती तणावपूर्ण राहील.

**सिंह :** शुभचिंतकाची भेट झाल्या मुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कन्या :** विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा. बुद्धीचे कामे अधिक करू नका.

**तुळ :** कोणत्यातरी प्रसिद्ध व्यक्तिशी संबंध वाढतील. आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. स्थावर मालमत्तेची विक्री करतांना घाई गडबड करू नका.

**वृश्चिक :** कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल. पराक्रम व क्षमतेमुळे आपल्याला यश व फायदा होईल. खर्च विचार करून करा. रोजगारात प्रगती राहील.

**धनु :** धार्मिक, शुभकार्याची आखणी कराल. आपल्या लोकप्रियतेचा फायदा होईल. आरोग्य मध्यम राहील. मेहनतीवर विश्वास ठेवा चांगले फळ मिळेल. कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर :** चांगल्या व्यक्तींचा संप ठेवा. आर्थिक आवक वाढणार आहे. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांचा आदर व सेवा करा. आळस सोडून द्या. समाजात आपली पत वाढेल. मानसिक ताण कुटूंबाचा खूप राहील.आर्थिक फटका बसेल.

**कुंभ :** व्यापारातील फायदा, मानसिक प्रसन्नता व उत्साह वाढविल. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक स्थिती चांगली राहील.मीन : रोजगारात परिवर्तन कींवा नवीन संधी चालून येईल.

# एसटीत जागेसाठी धडपड

## सोलापूर बसस्थानकात लहान मुलांना खिडकीतून सोडले जाते आत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

राज्याची दळणवळण व्यवस्था एसटी महामंडळाच्या खांद्यावर आहे. सध्या उन्हाळी हंगाम सुरू आहे. या उन्हाळी हंगामात अबालवृद्ध प्रवाशांची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी एसटी बसेसला प्राधान्य दिले जात आहे.



एसटी बसेसद्वारे प्रवासी प्रवास करत आहेत. उन्हाळ्यामध्ये जागा वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. प्रवासी बाहेर फिरण्यासाठी तसेच गावी जाण्यासाठी बस स्टैंडवर गर्दी करतात. त्यामुळे सर्व एसटी बसेस या हाउसफुल धावत आहेत. एसटीमध्ये प्रवासी गर्दी वाढत असल्यामुळे प्रवाशांच्या गर्दीतून वाट काढत एसटीमध्ये बसण्यासाठी जागा मिळावी, यासाठी प्रवाशांची मोठी धडपड सुरू आहे.

नुकतेच एक दृश्य सोलापूर बसस्थानकावर पहावयास मिळाले. एका महिलेने चक्क आपल्या मुलाला खिडकीतून जागा पकडण्यासाठी आत सोडले. जागा पकडण्यासाठी प्रवाशांनी जीव घेण्या खिडकीचा वापर केला आहे. यापूर्वी सर्रासपणे एसटीत जागा पकडण्यासाठी खिडकीच्या माध्यमातून बॅगा, रुमाल किंवा पिशवी टाकल्या जात होत्या. परंतु आता चिमुकले बालगोपाळच बाहेरून खिडकीच्या आत टाकले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. स्क्रॅप एसटी मधूनच प्रवासी वाहतूक सुरू असल्याने प्रवाशांनी एसटीमध्ये चढताना किंवा उतरताना दक्षता घेणे आवश्यक आहे. काही ठिकाणी एसटी बसेसच्या काचा फुटलेल्या आहेत, काही एसटीच्या खिडक्यांचे पाईप तुटलेले आहेत. दरवाजे मोडक्या स्थितीत, पत्रे उचकटलेले आहेत. अशा परिस्थितीत प्रवास करणे जोखमीचे ठरते. त्यामुळे लहानग्यांना घेऊन प्रवास करताना पालकांनी तसेच प्रवाशांनी सावधानता बाळगावी.

## सोलापूर तालुका पोलिस ठाण्यातील जप्त वाहनांचा १ मे रोजी लिलाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

सोलापूर तालुका पोलीस ठाणेस जमा असलेल्या वाहनांच्या जाहीर लिलाव १ मे २०२५ रोजी करण्यात येणार आहे. लिलाव प्रक्रिये मध्ये सहभाग घेण्यास इच्छुक असलेल्या व्यक्ती / फर्म यांनी राष्ट्रीयकृत बँकेचा २५ हजार रुपयांचा डिमांड ड्राफ्ट पीए टू एसपी सोलापूर या नावाने अनामत रक्कम म्हणुन भरणे आवश्यक आहे. सदर जाहीर लिलाव प्रक्रिये बाबतची सविस्तर जाहीरात / माहिती त्या मधील अटी व शर्तीसह पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीणचे कार्यालयाच्या https://solapurpolice.gov.in या संकेतस्थळावर, सोलापूर तालुका पोलीस ठाणे व पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आली असल्याचे सोलापूर तालुका पोलिसांकडून कळविण्यात आले आहे.





## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमच्या विद्यार्थी सेना शहराध्यक्षपदी भंडारे

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

ऊर्जामंत्री नितीन राऊत यांच्या आदेशानुसार व प्रदेशाध्यक्ष जयप्रकाश भवसागर यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरम च्यावतीने अमित भंडारे यांची विद्यार्थी सेना शहर अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

ही निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष ॲड. निलेश भंडारे यांच्या अध्यक्षतेखाली व महासचिव रमेश हसापुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय विश्रामगृह येथे पार पडलेल्या बैठकीत जाहीर करण्यात आली. यावेळी प्रा. विकास कांबळे, अनिल धोत्रे, सुभाष माने, कमल अग्रवाल, वैभव धोत्रे, माधुरी कांबळे, निखिल भंडारे, सलमान मुल्ला उपस्थित होते.

# दुभाजकातील काटेरी झाडांमुळे अपघातात वाढ

### सोलापूर-विजयपूर महामार्गावर काटेरी झाडे वाढली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

हत्तूर ते सैफुल या दरम्यानच्या दुभाजकांमध्ये मोठया प्रमाणात काटेरी झाडे वाढली आहेत. त्यामुळे सोलापूर विजयपूर महामार्गावरून ये जा करणाऱ्या दुचाकी स्वारांसह अन्य वाहनचालकांना काटेरी झाडांचा त्रास होत आहे.

वाढलेल्या काटेरी झाडामुळे अपघातात वाढ होत आहे. म्हणून वाहनचालकांमधून प्रशासनाकडून काटेरी झाडे तोडण्याची मागणी होत आहे. हत्तूर ते सैफूल सात किलोमीटर अंतराचा आहे. या रस्त्याच्या दुभाजकात चिलारी व बाभुळ काटेरी झाडे वाढलेली आहेत. दुभाजका लगत दुचाकीस्वार जात असताना वाहन चालकांना त्रास होत आहे.



सोलापूर विजयपूर महामार्गावरून ये जा करताना काटेरी झाडांचे त्रास होत आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावे लागत आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांसह व्यापारी, नोकरदार व कामगार प्रवास करतात. घाईत जाताना त्यांना झाडांच्या फांद्या लागतात. त्याचा त्रास होत आहे. म्हणून काटेरी झाडे तोडून काढावे.

**- धनंजय धर्माधिकारी, उद्योजक, मंद्रुप**

काटेरी झाडामुळे अपघात घडले आहेत. सीना-भीमा खोऱ्यातील चाळीसहून अधिक गावातील नागरिकांना ये-जा करावे लागते . शिवाय शिक्षक, आरोग्य सेवक, सेविका, ग्राम सेवक, तलाठी, पोलिस कर्मचारी यांना येथूनच ये-जा करावी लागते. दुचाकीवरून मोठया प्रमाणात रहदारी असल्याने प्रशासनाने काटेरी झाडे तोडून रस्ता सुरळीत करावे.

**- सुदर्शन हसापूरे, कॉन्ट्रॅक्टर, सोलापूर**

## मातंग समाज संघातर्फे ५ मे रोजी विद्यार्थी-पालक मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मातंग समाज संघ महाराष्ट्र राज्य या संघटनेतर्फे सोमवार दि. ५ मे २०२५ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे विद्यार्थी पालक मेळावा आयोजित केला आहे, अशी माहिती संघाच्या राज्य उपाध्यक्ष मीनाक्षी पेठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिक्षित समाज सुदृढ समाज हे ब्रीद वाक्य घेऊन मातंग समाज उत्थानासाठी शिक्षण, रोजगार, व्यवसाय, प्रबोधन व मार्गदर्शन या पंचसूत्री उपक्रम राबवण्याचे काम या संघातर्फे केले जाते. या संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विक्रम गायकवाड (मुंबई) यांच्या प्रेरणेतून सोलापूर येथे विद्यार्थी पालक मेळावा आयोजित केला आहे. यावेळी ॲड. विक्रम गायकवाड, राज्य कार्याध्यक्ष संजय भोंडवे, सरचिटणीस राजू पवार, भाग्यवंत लांडगे आदी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यास आठवी ते पदवी तसेच पुढील शिक्षण घेतलेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी उपस्थित राहावे. सहभागी होणाऱ्यांनी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे, अधिक माहितीसाठी मीनाक्षी पेठे (८६६८८५७६८७) यांच्याशी संपर्क साधावा.

यावेळी राज्य संजय भोंडवे, आदर्श धडे, श्रीकांत बोराडे, करुणा झुंजारे, अवधूत आडकर आदी उपस्थित होते.

## लोकमंगल कृषी महाविद्यालयात पुस्तक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत जागतिक पुस्तक दिन हा प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या मुक्त वाचन अभियानाने संपन्न झाला.

पुस्तक हे केवळ ज्ञानाचं साधन नसून, ते माणसाच्या विचारांची दारं उघडणारं, मनाला दिशा देणारं आणि आयुष्य समृद्ध करणारं माध्यम आहे. पुस्तकांच्या महत्त्वाची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी हा पुस्तक दिन साजरा करण्यात येतो. याच दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी विविध कथा, कादंबऱ्या, वैज्ञानिक अशा बहुअंगी पुस्तकांचे वाचन करून हा दिवस उत्स्फूर्तपणे साजरा केला. सदरील उपक्रम हा विद्यार्थ्यांमध्ये वाचनाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि त्यांना लेखनासाठी प्रेरणा देणे तसेच पुस्तकाच्या माध्यमातून विचारमंथनास चालना देणे या उद्देशावर आधारित होता. हा उपक्रम यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी प्रा. नम्रता गोरे, प्रा. मीनाक्षी नाईकनवरे आणि प्रा. अजित कुरे यांनी परिश्रम घेतले. उपक्रमाच्या संपन्नतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.



## कामगारांना भांडी व सेफ्टी किटचे वाटप चालू करा

### कामगार संघटना महासंघाचा रास्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम, पेंटर, वेल्डर, फर्निचर, प्लंबर, वायमेन, रोजगार हमी योजनेतील कामगारांना गृहउपयोगी वस्तू संच (भांडी) आणि सेफ्टी किटचे वाटप त्वरित चालू करावे आणि इतर लाभाचे प्रकरणे निकाली काढण्याच्या मागणीसाठी कामगार संघटना महासंघाचे अध्यक्ष साथी बशीर अहमद यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पुनम गेट येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळेस कामगार मंत्रालय मुर्दाबाद, कामगारांच्या मागण्या मान्य करा, सहाय्यक कामगार आयुक्त मुर्दाबाद, भ्रष्टाचारी सचिव विवेक कुंभार यांना अटक करा, साहित्य वाटपात १५०० कोटींचा झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी राज्य गुन्हा अन्वेषण विभागामार्फत करण्यात यावी अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी साथी बशीर अहमद, सायबण्णा तेगेळ्ळी, सिद्धार्थ बोराडे, छगन पंढरे, कॉ. एजाज शेख, मिलिंद गायकवाड, जब्बार पटेल, ज्ञानेश्वर देशमुख, जावेद नदाफ, शिवाजी कांबळे, जहीर शेख, बाबा बागवान, ज्ञानेश्वर गोरवे, राजू जाधव, संदीप भागवत, सुनील बडे, दत्ता हिंगोले, शाहीदा मुलाणी उपस्थित होते.

## वरवडे शिवारात तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मोहोळ तालुक्यातील वडदेगावातील तरुणाला वरवडे गावाच्या शिवारात मारहाण करण्यात आली. हा प्रकार शनिवारी रात्री ९ च्या सुमारास घडला. सारंग श्रीकांत मस्के (वय ३५, रा. वडदेगाव ता. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. अज्ञात कारणातून हुसेन गायकवाड व इतर दोन जणांनी द्रगड तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात उजव्या डोळ्याजवळ जखम, तसेच डाव्या पायाला मार लागल्याने रात्री ११.५५ वाजता वडील श्रीकांत यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## मातंग समाज कृती समितीतर्फे गुरुवारी आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्यातील मातंग समाजातील लोकांवर होत असलेल्या अन्याय, अत्याचार विरोधात मातंग समाज कृती समिती, शहर जिल्हातर्फे गुरुवार, दि. १ मे २०२५ रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती युवराज पवार व ॲड. शैलेश पोटफोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर, लातूर, परभणी, पुणे, बीड, हिंगोली अशा विविध जिल्ह्यात जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२५ अखेरपर्यंत मातंग समाजाच्या पुरुष, महिला, अल्पवयीन मुले व मुली यांच्यावर खून, बलात्कार, गंभीर जीवघेणी मारहाण असे प्रकार मोठ्या प्रमाणात घडले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या विविध सामाजिक उन्नतीच्या योजनांमध्ये मातंग समाजाला जाणीवपुर्वक डावलण्याचा प्रयत्न आजही होताना दिसून येत आहे. जातीय अन्याय अत्याचाराच्या घटनेतील आरोपींना सहकार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर खातेंतर्गत कडक कायदेशीर कारवाई करुन घडलेल्या गंभीर अमानवी घटनांचा तपास एस.आय.टी. कडे देऊन सर्व खटले जलद गती न्यायालयामध्ये चालविले जावेत. . लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाकडून दिल्या जाणाऱ्या कर्जासंदर्भातील अटी व शर्ती जाचक अटी व शर्ती कमी करण्याची गरज आहे. या महामंडळाला केंद्र राज्य शासनाच्या माध्यमातून ५०० कोटी निधीची तरतूद व्हावी, इच्छुकांना विनातारण पाच लाखापर्यंतचे कर्ज उपलब्ध करून द्यावे. सामाजिक न्याय विभागाचा निधी इतरत्र वळवणाऱ्या राजकीय पुढारी तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांवर ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करावा आदी मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस राजू क्षीरसागर, रमेश बोराडे, श्रीकांत देडे, हिरालाल अडगळे, शिवाजी गायकवाड, शशिकांत डोलारे, नामदेव गायकवाड उपस्थित होते.

## कै. रामकृष्ण बुगडे यांची पुण्यतिथी साजरी

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

श्रीमती नरसम्मा बसप्पा बंडा प्रशालेत श्री कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेचे माजी प्रेसिडेंट व शिक्षण संस्थेचे संस्थापक कै. रामकृष्ण व्यं. बुगडे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शालेय समितीचे सदस्य जनार्दन गडगी यांनी भूषविले. यावेळी संस्थेचे विश्वस्त व्यंकटेश बुगडे उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष गडगी, व्यंकटेश बुगडे, मुख्याध्यापक एम.डी.बिराजदार, सरस्वती तिमप्पा मराठी प्राथमिकचे मुख्याध्यापक बड्डूरे, बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका तट्टे, के.बी. बंडा इंग्लिश मिडियमच्या मुख्याध्यापिका शेख यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन शिक्षक रेस यांनी केले.

# मिरवणुकीसाठी रात्री बारापर्यंत परवानगी द्या

### बसवेश्वर जन्मोत्सव मंडळातर्फे पोलिस आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

जगतज्योती श्री महात्मा बसवेश्वर जयंती बुधवार दि.३० एप्रिल रोजी मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात शहरात साजरी करण्यात येते. या मिरवणुकीमध्ये श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव मंडळांना पारंपारिक वाद्य वाजवण्यासाठी रात्री बारापर्यंत परवानगी देण्यात यावी. अशा मागणीचे निवेदन श्री महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती जन्मोत्सव महामंडळाचे अध्यक्ष मनीष काळजे आणि कार्याध्यक्ष संतोष केंगनाळकर यांनी पोलिस उपायुक्त आयुक्त डॉ. दिपाली काळे यांना दिले.



पोलीस प्रशासनाने सर्व बसवभक्तांची बैठक पोलिस आयुक्त कार्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. श्री महात्मा बसवेश्वर मार्गावर मिरवणूक काढताना येणाऱ्या अडचणी प्रशासनास सांगितल्या. नेहमीच पोलीस प्रशासनाचे सर्व मंडळांना सहकार्य असते त्याचप्रमाणे यावर्षी तसेच सहकार्य असेल अशी अपेक्षा सर्व बसव भक्तांनी व्यक्त केली. आपले मनोगत व्यक्त करताना मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेना जिल्हाप्रमुख मनिष काळजे म्हणाले, सोलापुरात जवळपास ४० मंडळ बसवेश्वर जयंती उत्सव साजरा करतात. त्यापैकी पंधरा ते वीस मंडळ ही मिरवणुकीमध्ये सामील होतात. त्यांची संख्या यावेळी वाढणार असून नवीन मंडळांनाही पोलिस प्रशासनाने परवानगी द्यावी. सदरची परवानगी त्या-त्या भागातील पोलीस स्टेशनच्या माध्यमातून मिळावी व मिरवणूकीत पारंपारिक वाद्य वाजवण्यास रात्री बारा वाजेपर्यंत परवानगी द्यावी अशी विनंती केली.

या बैठकीस मार्गदर्शन करताना पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे म्हणाल्या की सर्व मंडळांना पोलीस प्रशासनाचे सर्वतोपरी सहकारी असेल मिरवणुकीत सामील होणाऱ्या मंडळांनी प्रशासनाने घालून दिलेले नियमांचे तंतोतंत पालन करावे व मिरवणुकीत सामील होणाऱ्या मंडळांनी एक बेस व एक टॉप लावावा अशी सूचना केली. या बैठकीस मध्यवर्तीचे गौरव जक्कापुरे, शिवराज झुंजे, प्रेम बुगडे, प्रविण दर्गोपाटील उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### वर्धमान जैन वाचनालयात जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन

**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

बार्शी येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय, बार्शी येथे जागतिक पुस्तक दिना निमित्त तीन दिवसीय ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. दि. २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून सकाळी ११:३० वाजता बार्शीती साहित्यिक विक्रम सावळे यांच्या हस्ते उद्घघाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जैनाश्रमचे अध्यक्ष जयचंद सुराणा व प्रमुख पाहुणे म्हणून ट्रस्टी भारत कोटेचा, ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ हे होते. प्रथमतः डॉ.एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक वाचनालयाचे आनंद पुनमिया यांनी केले. मान्यवरांचा यावेळी वाचनालयातर्फे सत्कार करण्यात आला. उद्घघाटक विक्रम सावळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पुस्तक वाचनाने मनुष्य किती समृद्ध होतो.हे त्यांनी आपल्या मनोगनात व्यक्त केले. हे प्रदर्शन बार्शीतील वाचकप्रेमी व वाचक सभासद यांच्यासाठी तीन दिवस ठेवले होते. या प्रदर्शनाचा समारोप दि. २५ एप्रिल रोजी युवा उद्योजक अतुल सोनिग्रा यांच्या हस्ते समारोप करण्यात आला. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धिरज कुंकूलोळ, आनंद सुराणा, रूपेश कांकरिया, अशोक कांकरिया, प्रमोद भंडारी उपस्थित होते. आभार वाचनालयाचे संचालक धिरज कुंकूलोळ व आनंद सुराणा यांनी मानले.



### पिलीव येथील जवाहरलाल शेतकी विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**पिलीव, दि.२८ एप्रिल-**


माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जवाहरलाल शेतकी विद्यालयात शिक्षण घेतलेले दहावीमधील माजी विद्यार्थी तब्बल २९ वर्षांनी एकमेकांना भेटले. नुकताच त्यांचा स्नेहमेळावा जवाहरलाल शेतकी विदयालयात आयोजित करण्यात आला होता. आपण ज्या शाळेत शिकलो, वाढलो त्या शाळेची आठवण व स्नेह जोपासणयाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी बाळासाहेब जहागिरदार होते.यावेळी बाळासाहेब जहागिरदार, माजी मुख्य मुख्याध्यापक शिंदे,पठाण, पाटील, जमीर पठाण, दिलीपसिंग रजपूत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विकास रजपूत, संतोष गाढवे, अर्चना पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच मुख्याध्यापक शिंदे व पठाण यांनी माजी विदयार्थना मार्गदर्शन केले या कार्यमाचे नियोजन अतुल करमाळकर, शयामराव गलांडे, संतोष बगाडे, जयश्री भैस, सुहास पाटील, सिध्दनाथ पाटील, बाळकृष्ण नरळे, सतिश कदम यांनी केले. यावेळी विजय उरवणे, संताजी पाटील, गजानन ढवळे, सचिन रजपुत, सतीश काळभोर, आशा शिकारे, शाहीस्ता बागवान, रिजवाना बागवान, विजय पाटील, हनुमंत सुळ, रघुनाथ वाघमारे उपस्थित होते. प्रास्ताविक विजय जामदार यांनी केले तर महादेव सातपुते यांनी आभार मानले.



### स्वामी समर्थ शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सिद्धाराम अंबिगेर

**अक्कलकोट, दि.२८ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सिद्धाराम अंबिगेर आणि व्हाईस चेअरमनपदी महेश हंचाटे यांची सर्वांनुमते बिनविरोध निवड करण्यात आली. शिक्षक समितीचे नेते अनिल कादे यांच्या नेतृत्वाखाली आणि संस्थेचे प्रवर्तक दयानंद कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२५ - २६ ते २०३०-३१ या कालावधीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी एस. व्ही. कुंभार यांनी ही निवड जाहीर केले. संचालक मंडळाची निवड बिनविरोध करण्यात आलेली असून संचालक म्हणून श्रीशैल हडलगी, सिद्धाराम अंबिगेर, बसवराज गोरे, राजशेखर गोब्बूर, महेश हंचाटे,कल्याणी गंगोंडा, यल्लप्पा ईटेनवरू, श्रीकांत राठोड, लायप्पा सुडगाडे, संगय्या वस्त्रद, शोभा कलशेट्टी, कन्याकुमारी पडवळ आणि दयानंद चव्हाण यांची निवड करण्यात आली. या पतसंस्थेचे १६५ सभासद असून स्वभांडवलावर जवळपास ७५ लाख कर्जवाटप असून ९ टक्के व्याजदर हा इतर पतसंस्थेच्या तुलनेत सर्वात कमी आहे. यावेळी मावळते चेअरमन श्रीशैल हडलगी यांचा सत्कार संचालक मंडळाच्या वतीने संपन्न झाला. यावेळी तज्ज्ञ संचालक म्हणून श्रीमंत पुजारी,माधव लहाने यांची यावेळी निवड करण्यात आलेली आहे.



### पिलीव येथील भैरवनाथाची यात्रा उत्साहात साजरी

**पिलीव, दि. २८ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील भैरवनाथ देवाची यात्रा दरवर्षी प्रमाणे यंदाही साजरी करण्यात आली. यावेळी खरसुंडी येथून गुलाल आणण्यात आला. या यात्रेनिमित्त गझीढोल कार्यकमाचे तसेच पारंपरिक वादय सनईसूर याचे आयोजन महालक्ष्मीची बजो पार्टीच्या वतीने करणयात आले. नैवेद्य म्हणून पुरणपोळी व खिर करण्यात आली होती. यावेळी उपस्थिथांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यात्रा यशस्वी करण्यासाठी दादा करडे, सुशिल करडे, सचिन करडे, अरुण करडे, अभिजीत गोरवे, अजित करडे, ऋषीकेश गेजगे, संतोष करडे, यश करडे, ओंकार करडे, सुमीत करडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, माजी सरपंच अमोल मदने, ठेकेदार उमेश सरवदे, संतोष पडळकर, कल्याण जावळे, दादासाहेब वगरे, दशरथ काळे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी यात्रा कमिटीच्या वतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ अक्कलकोट कडकडीत बंद

### आठवडा बाजार बंद ठेवून काढला मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ एप्रिल-**

अक्कलकोट व्यापारी असोसिएशन यांच्यावतीने कश्मीर पहलगाम येथे पर्यटकांवार दहशतवादी हल्लूयाचा तीव्र जाहीर निषेध व्यक्त केला. सर्व व्यापारी बांधवांनी सोमवार आठवडा बाजार दिवस असूनही कडकडीत बंद ठेवण्यात आला.

शहरातून निषेध मोर्चा काडून नायब तहसिलदार विकास पवार यानां निवेदन देण्यात येऊन देशहितासाठी कडक पाऊले उचलण्याची मागणी केली. अक्कलकोटवासीयांसह सर्व जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी असल्याचं सांगून कठोर पाऊले उचलण्याची मागणी यावेळी करण्यात आली. याप्रसंगी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे, अशपाक बळोरगी, दिलीप सिध्दे, संजय देशमुख, सद्दाम शेरीकर, मनोज पवार, शिवशरण जोजन, राजशेखर हिप्परगी, मल्लीनाथ साखरे, एजाज मुतवली, प्रसन्न हत्ते, तम्मा शेळके, व्यापारी दत्ता कटारे, महेश लोकापुरे, गंवडी दिनेश पटेल, गजानन पाटील, महेश शावरी, निसार शेख, मेहबुब शेख, सोहेल फरास, नागराज कुंभार, घिवारे, लोकापुरे, मणुरे, कापसे, वेदपाठक उपस्थित होते.



शिवसेनेचे तालुका प्रमुख संजय देशमुख, अशपाक बळोरगी, एजाज मुतवली, मनोज पवार, महेश हिंडोळे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. नगरसेवक महेश हिंडोळे यांनी यावेळी देश सारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठिशी आहे. आता सर्जीकल स्ट्राइक वगैरे काही नको तर पाकव्याप्त कशिर ताब्यात घ्यावे, असे आवाहन केले.

पोनि राजेंद्र टाकणे यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बंद दरम्यान कुठल्याही अनुचित प्रकारच्या घटनेची नोंद झाली नसून निषेध बंद शांततेमध्ये पार पडला. पोलीसांनी बंद दरम्यान शहरात मोठ्या प्रमाणात खबरदारी घेऊन पेट्रोलिंग केले.

# पद्मश्री पं.रोणू मजुमदार यांचे पंढरपुरात शनिवारी बासरी वादन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ एप्रिल-**

अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रसारासाठी प्रचारासाठी सदैव कार्यरत असणाऱ्या नादब्रह्म कला फाऊंडेशन करकंब, आरती साऊंड सिस्टीम पंढरपूर आणि मनमाडकर परिवार यांच्यावतीने पं. शौनक अभिषेकी यांचे मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय किर्तीचे ख्यातनाम बासरीवादक पद्मश्री पं. रोणू मजुमदार यांचे बासरीवादन आणि रश्मी इचंगावकर यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले आहे.

मृदंगाचार्य पं.तात्यासाहेब मंगळवेढेकर आणि पं. शंकराप्पा मंगळवेढेकर यांचे स्मृतीप्रीत्यर्थ एकदिवसीय संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी सांगितले. वर्षातून पद्मश्री जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव आयोजित करीत असतानाच वर्षभरात नवोदित कलाकारांना नवीन व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी एक दिवसीय तीन कार्यक्रम जाहीर केल्या प्रमाणे पहिला कार्यक्रम हा येत्या शनिवारी (३ मे) येथील आरती प्रांगण भक्तीमार्ग येथे सायं ६:०० वाजता होणार आहे. त्यामध्ये सर्व कलाकारांना साथसंगत तबला व्ही. नरहरी, ज्ञानेश्वर दुधाणे, अभिजित बारटक्के, श्रीरंग जाकी करणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असणार असून पंढरपूर आणि पंचक्रोशीतील कलासाधक आणि कलारसिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजक ज्ञानेश्वर दुधाणे आणि भगवानराव मनमाडकर यांचे वतीने करण्यात आले आहे. अधिक माहिती साठी संपर्क ९७६७७७६८५८ साधावा.

# ब्राह्मण सेवा संघातर्फे सामुदायिक व्रतबंध

### अकलूज येथे शुक्रवारी आयोजन

> ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने यावर्षी पहिल्यांदाच सोनार सुतार व गुरव या समाजातील बटूंचाही उपनयन संस्कारासाठी विचार करण्यात आलेला आहे. या समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या बटूंचाही ट्रस्टच्या वतीने मोफत उपनयन संस्कार करण्यात येणार आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २८ एप्रिल-**

येथील ब्राह्मण सेवा संघ व गणपती मंदिर ट्रस्टच्यावतीने सामुदायिक व्रतबंध समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दि. २ मे रोजी शंकरनगर (अकलूज) येथील कांतीलाल सांस्कृतिक भवन येथे हा समारंभ होणार असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी दिली.

गेल्या अनेक वर्षापासून ट्रस्टच्यावतीने ब्राह्मण समाजातील बटुंचा सामुदायिक व्रतबंध समारंभ करण्यात येत आहे. पंढरपूर सांगोला, मंगळवेढा, माढा, करमाळा या सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याबरोबरच सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, फलटण हे तालुके व पुणे जिल्ह्यातील इंदापूर व बारामती तालुक्यातील ब्राह्मण समाजातील बटू या सामुदायिक व्रतबंध सोहळ्यात सहभागी होत असतात. सामुदायिक व्रतबंध समारंभात सहभागासाठी बटूस रू. ३१०० शुल्क आहे. यामध्ये सात व्यक्तींना जेवण, बटूस यज्ञपवित, दंड, मंडोळ्या, लंगोट, पंचे संघाकडून दिले जाणार आहे. सोहळ्यात सहभागासाठी कुलकर्णी न्यूज पेपर एजन्सी अकलूज मोबा. ९४२२०६८८५१, मंदार दंडवते, सुयोग सायकल्स अकलूज ९६६५३२७३१६, महेश टोमके, अंबिका फोटो स्टुडिओ नातेपुते ९४२३३२८३९७, प्रकाश कुलकर्णी श्री इन वन झेरॉक्स अकलूज ९६०४१४६०२५, जगदिश कुलकर्णी, चैतन्य हॉटेल वेळापूर ९९२१५००७७५, विनायक फडणीस माळशिरस ९८५०५९६८७७, प्रवीण कुलकर्णी श्रीपूर ९८२२७१६८१५, कमलेश डिंगरे निरा नरसिंहपुर ९९७०३४१००८ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन ब्राह्मण सेवा संघाचे कार्याध्यक्ष श्रीधर कुलकर्णी यांनी केले आहे. यावेळी उपाध्यक्ष हरी कुलकर्णी, सचिव निरंजन डांगे, सहसचिव प्रेमनाथ रामदासी, महिला विभाग प्रमुख सुप्रिया मुदगल, जयेश कुलकर्णी, अवधूत शेकदार, महेंद्र जोशी, प्रसाद कुलकर्णी, वैभव आंबेकर, मनोज देशपांडे, गणेश बनाळीकर, वैशाली कांडलकर, वैशाली कुलकर्णी, मेघा कुलकर्णी, श्रेया कुलकर्णी उपस्थित होते.

# कत्तलखान्यातून सात गोवंशासह ५१ हजाराचा माल हस्तगत

### कुर्डुवाडीत तीघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. २८ एप्रिल-**

कुर्डुवाडी शहरातील कुरेशी गल्लीत विनापरवाना बेकायदेशीरपणे गोवंश जातीच्या जर्सी गायीची कत्तल करुन त्यांचे मांस विक्री करत लटकावलेल्या अवस्थेत मिळून आल्याने तीघा जणांवर कुर्डुवाडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस भीमराव गोवर्धन देवकर यांनी फिर्याद दाखल केली आहे. इस्माइल अबुतालिब कुरेशी (वय २७), रौफ हनिफ कुरेशी (वय २५), अखिल शफिक कुरेशी (वय ४९) सर्व रा. कुरेशी गल्ली कुर्डुवाडी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मंगळवारी सकाळी ९.३० वा सुमारास मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सहाय्यक पोलिस निरिक्षक सचिन शिंदे, पोलिस हराळे, पटाईत, महिला पोलिस कस्तुरे, दर्या यांचे पथक सरकारी पंचासह कुर्डुवाडी शहरातील कुरेशी गल्लीत गेले असता गोवंश कत्तलखाने, विक्रीसाठी जनावरांचे मांस व कब्रस्तानजवळ कत्तलीसाठी लागणारी जनावरे बांधलेली दिसून आली. यावेळी समोरच एका दुकानामध्ये मोठे मांसाचे तुकडे, गोवंश जातीचे जनावरांचे पाय, मुंडी असे विक्री करण्यासाठी ठेवलेले दिसून आले. याबाबत दुकानदाराला विचारले असता त्याने सदर मांस गोवंश जातीचे असल्याचे सांगितले. त्यानंतर त्याच्या बाजूच्या दुसऱ्या दुकानातही गोवंश जातीचे पाय, मुंडी विक्रीसाठी असलेले दिसले. त्यानंतर काही अंतरावर एका घरासमोर गोवंश जातीचे मांस विक्री करण्यासाठी ठेवलेले दिसले. तसेच दुकाना शेजारील एका खांबाला व लोखंडी खुंट्याला एक जर्सी पांढऱ्या रंगाचे खोंड, एक एच एफ जातीचे काळ्या रंगाचे वासरु, गीर जातीचे चॉकलेटी रंगाचे खोंड व वासरु, एक इंडिया जातीचे काळ्या रंगाचे वासरु, खिलार जातीचे एक वासरु व खोंड असे एकूण ७ खोंडे वासरु निर्दयपणे त्यांच्या अन्नपाण्याची सोय न करता कत्तलीसाठी बांधलेली पोलिस पथकाला दिसून आली. त्याची शहनिशा करण्यासाठी पशु वैद्यकीय अधिकारी शिंदे यांना बोलावून घेऊन सदर मांस पैकी काही मांस शाम्पल करिता काढून घेतले आहे. २१ हजार रूपयांचे गोवंश जातीचे १०५ किलो वजनाचे मांस, पाय, मुंडी, गायीचे कातडे याबरोबर १० हजार २०० रुपये किमतीचे गोवंश जातीचे मांस, पाय, मुंडी तर ५ हजार किंमतीचे २५ किलो वजनाचे मांस व १५ हजार ५०० रु.किंमतीचे ७ वासरे व खोंड असा एकूण ५१ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल तीनही दुकानातून हस्तगत करण्यात आला आहे.




### डॉ. सारंग खडके यांचे वैद्यकीय क्षेत्रात यश

**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

येथील सुपुत्र डॉ. सारंग शरद खडके यांनी वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत, २०२४-२५ मध्ये झालेल्या NEET SS परीक्षेत देशपातळीवर १७९३ वी मेरिट रँक मिळवून आपल्या नावाची उजळणी केली आहे. त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. डॉ. सारंग यांचा शैक्षणिक प्रवास अत्यंत प्रेरणादायी राहिला आहे. त्यांनी NEET UG परीक्षेत महाराष्ट्रात १३८ वा राज्य क्रमांक पटकावत वैद्यकीय शिक्षणाच्या वाटचालीला सुरुवात केली. प्रतिष्ठित सेठ जी.एस. मेडिकल कॉलेज केईएम हॉस्पिटल, मुंबई येथून एमबीबीएस पदवी प्राप्त केली. यानंतर, NEET PG परीक्षेत देशभरातून IR ६२५८ मिळवत त्यांनी वॉकहार्ड हॉस्पिटल, मुंबई सेंट्रल येथून DNB, Medicine ही पदव्युत्तर पदवी संपादन केली.





### वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत स्वच्छता अभियान

**तथा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ एप्रिल-**

महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमीत्त पंढरपूर येथील वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजाचे काहीतरी देणं लागतो ही भावना मनात ठेऊन खर्या अर्थाने महात्मा बसवेश्वर महाराजांना अभिप्रेत असलेली जयंती साजरी करीत असताना अशा पध्दतीने समाजाभिमुख आणि अगळा वेगळा उपक्रम सर्व समाजबांधवांनी राबवीला पाहिजे या भावनेतून वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत स्वच्छता अभियान राबविण्याचा निर्णय समाजबांधवां कडुन घेण्यात आला. त्या नुसार समाजबांधव एकत्रित आले आणि स्वच्छता अभियानास सुरुवात झाली. काही तासांतच स्मशानभूमीचे रुपडे देखील पालटले. येत्या ३० एप्रिल रोजी महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी होणार आहे. जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून स्मशानभूमीत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.दरम्यान या स्मशानभूमी स्वच्छता अभियानास निलराज डोंबे, युवराज मुंचलंबे, श्रीनीवास बोरगांवकर, प्रशांत मेनकुदळे, आमोल मेनकुदळे,गंगाधर स्वामी,सागर स्वामी,अतुल मेनकुदळे,विशाल आर्वे आदींसह वीरशैव लिंगायत समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंकज भोसले यांचे १ मे रोजी शिवभूषण काव्यकथन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ एप्रिल-**

१ मे अर्थात महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून येथील शिवभक्त प्रतिष्ठान व शिवशंभो विचार मंचाच्या वतीने शिवभक्तांसाठी काव्यकथान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर रचना केलेल्या कविराज भूषण रचित छंदांचा पंकज भोसले व सहकारी प्रस्तुत शिवभूषण काव्यकथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. येथील दि. पंढरपूर अर्बन बँकेच्या कर्मयोगी सभागृहात गुरुवारी १ मे रोजी सायंकाळी सहा ते आठ या वेळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कार्यक्रमासाठी पंकज भोसले यांच्या सारखे चतरुस्त्र व्याख्याते लाभले असून सुलभा कोरडे, सुजय परब आणि ममता भोसले आदी देखील भोसले यांच्या बरोबर या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. श्रीक्षेत्र किल्ले रायगडावर हिंदू साम्राज्य दिनानिमित्त भोसले यांच्या या कार्यक्रमाची परंपरा आहे. दरम्यान (कै.) डॉक्टर निनाद बेडेकर यांच्याकडून पंकज भोसले यांनी कविराज भूषण यांच्या छंदाची प्रेरणा घेऊन शिवबावन्नीतील बावन्न छंद भोसले यांनी मुखोद्गत केले आहेत.



### स्कॉलरशीप परीक्षेत महाराष्ट्र विद्यालयातील १३६ विद्यार्थी पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

इयत्ता पाचवीचे ६५ व आठवीचे ७१ असे १३६ पात्र विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्यावतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार शितोळे बापू व सर्व संस्था सदस्य, मुख्याध्यापिका श्रीमती धावणे, उपमुख्याध्यापक सपताळे, पर्यवेक्षिका श्रीमती साठे, पर्यवेक्षक महामुनी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अकलूज येथे केळी पीक व्यवस्थापन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २८ एप्रिल-**

कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज, ग्रोवन, हायजेनिक अग्रो व महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने केळी पिक व्यवस्थापन कार्यशाळा कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज येथे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह शंकराव मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत २५० केळी उत्पादक शेतकरी पदाधिकारी यांच्या सहभागासह कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मदनसिंह मोहिते-पाटील यांनी उपस्थितितांना सर्वप्रथम विविध वक्तत्याचे तज्ञांचे मार्गदर्शन ग्रहण करण्याचे आवाहन केले व आपल्या मार्गदर्शनामध्ये कमी खर्चात दर्जेदार उत्पादन घेण्याचे बाबत सल्ला दिला. भविष्यात कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकरी बांधवांना सर्व पिकांच्या मार्गदर्शन, शिबिर, प्रदर्शन बाबत सर्वतोपरी सहकार्य करेल, याची ग्वाही दिली. कार्यक्रमांमध्ये कृषी भूषण सोमनाथ हुलगे यांनी उत्पादन वाढीसाठी जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढवण्याचे अहवान केले व केळी लागवड तंत्रज्ञान सोप्या भाषेत उपस्थित लोकांना अवगत करून दिले. केळी उत्पादक व केळी निर्यातदार किरण डोके यांनी केळी दर्जात्मक व निर्यातक्षम करण्याबाबत मार्गदर्शन केले केळी निर्यात वाव संधी बाबत माहिती दिली.




मॅनेजिंग डायरेक्टर हायजोनिक अग्रो लिमिटेड स्वप्निल सूर्यवंशी यांनी केळीचे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन व त्यांच्या दर्जात्मक उत्पादनाची माहिती दिली आणि भविष्यातील केळी बाबत ए आय तंत्रज्ञानाचा वापर बाबतची दिशा बाबत माहिती दिली. सेवारत्न मंडल कृषी अधिकारी अकलूज सतीश कचरे यांनी केळी पिका विषयी केंद्र व राज्य पुरस्कृत योजना मधील संधी व वाव व सहभागाबाबत उपस्थितांना माहिती दिली कृषी मित्र सुदर्शन सुतार ग्रोवन जिल्हा प्रतिनिधी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून वीस वर्षपूर्ती ग्रोवन वाटचाल व दिशा बाबत उपस्थितांना माहिती दिली. कार्यक्रमाचे नेटके संयोजन, आयोजन, नियोजन व अंमलबजावणी बाबत कृषी उत्पन्न बाजार समिती अधिकारी कर्मचारी तसेच संदेश कुलकर्णी, सागर देशमुख, राहुल शेळके यांनी परिश्रम घेतले. आभार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव राजेंद्र काकडे यांनी मानले.

## परशुराम जयंतीनिमित्त आज पंढरपुरात शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ एप्रिल-**

भगवान परशुराम जयंती निमित्त मंगळवार, दि. २९ एप्रिल रोजी पंढरपुरात मध्यवर्ती ब्राह्मण संघाच्या वतीने शोभायात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या शोभा यात्रेत मोठ्या संख्येने समाजबांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन मध्यवर्ती ब्राम्हण संघाच्या वतीने करण्यात आलेले आहे. दरम्यान शहरातील रुक्मिणी पटांगण येथे सायंकाळी सहा वाजता भगवान परशुराम यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात



येणार आहे. त्या नंतर शोभा यात्रेस सुरुवात होणार आहे. शोभा यात्रेत विविध आकर्षक फुलांनी सजविलेल्या ट्रॅक्टरवर भगवान परशुराम यांची आकर्षक मूर्ती विराजमान असणार आहे. टाळ, मृदुंग तसेच सनई, चौघड्यांच्या लवाजम्यासह बँण्ड पथकांचा देखील समावेश या शोभा यात्रेत असणार आहे.

ही शोभायात्रा शहरातील रुक्मिणी पटांगण, चौफाळा, नाथचौक, तांबडा मारुती, कालिकादेवी चौक, काळामारुती आणि चौफाळा व पुन्हा विठ्ठल मंदिर परिसरातील रुक्मिणी पटांगण येथे येणार आहे. या ठिकाणी या शोभा यात्रेची सांगता होणार आहे.

## महत्वाचे...



### उंडेगाव येथे मुक्त छंद वर्गाचे उद्‌घाटन

**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

रयत शिक्षण संस्थेच्या उंडेगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी दि.२६ एप्रिल ते ८ मे कालावधीत रयत गुरुकुल मुक्त छंद वर्गाचे आयोजन केले आहे. यामध्ये विविध प्रकारच्या फनी गेम्स, संगणक ज्ञान, मैदानी खेळ, योगासने, मनोरंजनातून गणित, इंग्लिश संभाषण, भाषिक खेळ, रंगभरण, चित्रकला, मेहंदी इत्यादी उपक्रम घेण्यात येणार आहेत. उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेले यांच्या हस्ते उद्घाटन झाले. शाळा समितीचे सदस्य तुकाराम पाटील अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव मिळतो म्हणून असे उपक्रम गरजेचे असल्याचे मत उपशिक्षणाधिकारी हवेले यांनी मांडले. मुख्याध्यापक विजयकुमार डूरे-पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी माजी मुख्याध्यापक दिलीप पाटील, प्रकाश गुंड, सरपंच रामलिंग बरबडे, गव्हाणे, सावंत, पानगाव केंद्रप्रमुख सुधीर कुलकर्णी, सूर्यकांत कुलकर्णी, गणेश पवार, गणेश जगताप, नंदकिशोर गायकवाड, भीमराव पवार, नानासाहेब झालटे, नागनाथ बरबडे, लक्ष्मण वाघ, बारीकराव देशमुख, चंदना रणदिवे आदीसह पालक उपस्थित होते. अनिल डोईफोडे यांनी सूत्रसंचालन केले. राणी गुंजेगावकर यांनी आभार मानले.




### मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात कर्करोग तपासणी शिबीर

**मंगळवेढा, दि. २८ एप्रिल-**

सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन-असंसर्गजन्य रोग कार्यक्रमांतर्गत जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यामार्फत ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे कर्करोग तपासणी शिबिर संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन एका महिला रुग्णाच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुलोचना जानकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भाऊसाहेब जानकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश रोंगे, डॉ. निखिल जोशी, डॉ. गौरीशंकर बुगडे डॉ. टकले, डॉ. शुभांगी शिंदे, डॉ. योगिता जाधव उपस्थित होते. शिबिरात स्त्रीरोग तज्ञ डॉ. सुलोचना जानकर, दंत शल्यचिकित्सक डॉ. ऋचा वैद्य यांनी सुमारे ३१६ रुग्णांची तपासणी केली. यामध्ये मुख कर्करोग रोगाचे ४, स्तन कर्करोगाचे ६, गर्भाशय पिशवी कर्करोगाचे ९ असे ३५ संशयित रुग्णांना पुढील मार्गदर्शन करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी आरोग्य पर्यवेक्षक बब्रुवान माने, अधिपरिचारिका सुवर्णा सरताळे, फुलंन आगलावे, जि.प. कर्मचारी संघटना तालुका अध्यक्ष सुनील जाधव, आरोग्य सेवक गणेश मोरे, परिचारिका सारिका कोळेकर, धायगुडे, खोले, मोरे, श्रीमती डोरले, माने, प्रवीण डांगे यांनी परिश्रम घेतले.



### लोकसेवा प्रशालेचे माजी विद्यार्थी ३५ वर्षांनी आले एकत्र

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

लोकसेवा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात सन १९९०-९१ मध्ये दहावी वर्गात शिकणारे माजी विद्यार्थी ३५ वर्षांनी एकत्र आले. माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यामध्ये बालपणीच्या आठवणीत माजी विद्यार्थी व शिक्षक रमले होते. प्रारंभी माजी प्राचार्य विश्वनाथ घेरडी, माजी विद्यार्थी प्राचार्य बसप्पा कुमठेकर व सर्व माजी गुरुवर्यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शाल, भेट वस्तू देवून सत्कार करण्यात आला. प्राचार्य कुमठेकर यांनी प्रास्ताविक केले. सुभाष सुतार यांनी माजी विद्यार्थ्यांचे परिचय करून दिले. यावेळी रामचंद्र म्हेत्रे, अविनाश जेऊरकर, अशोक बामणे, विरूपाक्ष घेरडी या गुरूवर्यांनी तर माजी विद्यार्थी सुभाष सुतार, बसप्पा घाटे, विनायक देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. तर स्मिता गंभीरे, जयश्री जाधव, सुरेश गोखले, विजया गंभीरे आदींनी गीत सादर केले. कार्यक्रमास माजी प्राचार्य विश्वनाथ घेरडी, नागण्णा मैंदर्गी, रामचंद्र म्हेत्रे, अशोक बामणे, ॲड. बसवराज रेवूरे, दत्तात्रय परिट, म्हमाणे, पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी, सत्यप्पा काळे, चंद्रकांत काळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्नेहमेळावा नियोजन समितीचे अध्यक्ष उद्योगपती राजकुमार कुंभार व सचिव विनायक देशपांडे, सहायक पोलीस निरीक्षक बखत्यार आत्तार, बसप्पा घाटे, सुभाष सुतार, नागनाथ धनाळे, खंडू म्हेत्रे, सतीश जकुणे, सोमशंकर म्हेत्रे, विजय कुमठेकर यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रुपच्या वतीने शाळेला भेट म्हणून शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. सूत्रसंचालन खंडू म्हेत्रे तर आभार प्रमिला लोभे यांनी मानले.

## १०१ वे मराठी साहित्य संमेलन पंढरपुरात घ्या, यशस्वी करू

### आ. पाटील व आ.आवताडेंचे प्रतिपादन; मसापच्या राज्य प्रतिनिधींचा मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ एप्रिल-**

पंढरपूर व वारकरी संप्रदाय यांचे साहित्याशी अतूट नाते आहे. त्यामुळे १०१ वे मराठी साहित्य संमेलन पंढरपूरात घ्यावे ते नक्की यशस्वी केले जाईल असा विश्वास आमदार अभिजीत पाटील व आमदार समाधान आवताडे यांनी साहित्य परिषदेच्या येथील शाखा मेळाव्यात दिला.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा शाखा मेळावा येथे घेण्यात आला. उद्घाटन आ.अभिजित पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तर आ. समाधान अवताडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मराठी साहित्य महामंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कार्यवाह सुनीता राजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक प्रा. डॉ. द. ता. भोसले, अंजली कुलकर्णी, मृणालिनी कानिटकर, ज्योत्स्ना चांदगुडे (पुणे), नंदकुमार सावंत, रविंद्र बेडकिहाळ (सातारा), प्रकाश होळकर, ॲड नितीन ठाकरे ( नाशिक), प्राचार्य तानसिंग जगताप ( जळगाव ), डॉ .शशीकला पवार ( धुळे- नंदूरबार) पद्माकर कुलकर्णी, ॲड. जे.जे. कुलकर्णी (सोलापूर) आदीसह मंदिर समितीचे सदस्य जळगावकर महाराज, मसापचे विभागीय कार्यवाह कल्याण शिंदे, शाखाध्यक्ष सिद्धार्थ ढवळे, कार्याध्यक्ष अशोक माळी आणि राज्यभरातून आलेले नाशिक, येवला, वारणानगर, इचलकरंजी, पुसेगाव, सातारा, नगर, पुणे आदी विविध शाखांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



> मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या सर्व संस्थांचा उत्साह वाढला आहे. मराठी भाषा ही काळजातली भाषा आहे. ग्रामीण भागातील असंख्य लेखक या मराठी भाषेला समृद्धीकडे नेत आहेत. त्यामुळे म.सा.प.चे विविध कार्यक्रम ग्रामीण भागात देण्याचा आमचा मानस आहे. त्यानुसार पंढरपूर मधील शाखा मेळावा सोलापूर जिल्हा प्रतिनिधी कल्याण शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी खूप चांगल्या पद्धतीने यशस्वी केला.
>
> - **प्रा.मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष, म.सा.प.पुणे.**

यावेळी आ. पाटील म्हणाले की, मराठी भाषा ही घरातच शिकायला मिळते. गावोगावी जत्रा, यात्रामधून तमाशा ते कुस्त्या, आणि स्थानिक परंपरा, ओव्या, गाणी या प्रकारच्या साहित्याचं अबाधित स्थान आहे. तरुण पिढीला मराठी साहित्याशी जोडून घ्यावे लागेल. त्यासाठी आगामी १०१ वे साहित्य संमेलन पंढरपूरमध्ये घ्यावे. आम्ही येथील दोन्ही आमदार मिळून ते यशस्वी करून दाखवू असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आ. अवताडे म्हणाले की, मराठी साहित्यामुळे अनेक प्रकारची क्रांती झालेली आहे. पंढरीच्या परंपरेतून आपल्याला समृद्ध साहित्य मिळाले आहे.

संत नामदेवांनी भारतभर साहित्य पोहोचविले आहे, संत चोखोबा, संत जनाबाई यांनी साहित्य निर्मिती केली, त्यामुळे पंढरपूर, वारकरी संप्रदाय यांचे साहित्याशी अतूट नाते आहे. विभागीय कार्यवाह श्री. शिंदे यांनी प्रास्ताविकातून मसापच्या ३३ जिल्ह्यात १०५ शाखा असून पंढरपूर शाखा अतिशय सक्रिय असल्याचे सांगितले. अंकुश गाजरे यांनी सूत्रसंचालन केले, प्रा.धनाजी चव्हाण यांनी स्वागत केले. मंदार केसकर यांनी आभार मानले.

## वाराणसीच्या धर्तीवर ‘पंढरपूर कॉरिडॉर’ ही लवकरच साकारणार

### जिल्हा प्रशासनाने ६०० बाधितांना दिल्या चर्चेसाठी नोटिसा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या उज्जैन व काशी विश्वेश्वरच्या धर्तीवर पंढरपूर कॉरिडॉरला येत्या ३ महिन्यांमध्ये कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती मध्यंतरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. त्या अनुषंगाने आता कॉरीडॉरच्या कामासाठी जिल्हा प्रशासनाकडून सुरूवात झाली असून, त्यासाठी बाधित व्यापाऱ्यांसह निवासी असलेल्या ५८० ते ६०० कुटुंबांना चर्चेसाठी नोटिसा पाठविल्या आहेत. येत्या गुरूवारी आणि शुक्रवारी यासाठी ६ बैठकांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. २८) माध्यमांशी बोलताना दिली.

मुख्यमंत्री फडणवीस हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी नुकतेच येवून गेले. यावेळी त्यांनी विभागीय आयुक्त, पालकमंत्री, सोलापूरचे जिल्हाधिकारी इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन पंढरपूर कॉरिडॉरचा तयार केलेला आराखडा पाहिला आणि त्यानंतर त्यांच्या आराखड्याला हिरवा कंदील दाखवलेला होता. आता प्रत्यक्षात या कामाला आरंभ झाला असून, या कामासाठी स्थानिक व्यापारी आणि इतर बाधितांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी १०० बाधित कुटुंबांचे ६ गट केले आहेत. यामध्ये त्यांच्याकडील जागेचे स्वरूप, मुल्यांकन, व्यापारी आहेत का ती जागा राहण्यासाठी वापरतात, कुळ वहिवाटीने ती जागा वगैरे संबंधितांना मिळाली आहे



का? आदी विविध प्रश्नांचा या बैठकांतून उलगडा होणार आहे. गुरूवार, दि. ८ मे रोजी ३ बैठका आणि शुक्रवार, दि. ९ मे रोजी ३ बैठका होणार आहेत. भूसंपादन प्रक्रिया लोकांना या बैठकांतून समजावून सांगण्यात येईल, कोणतीही लपवालपवी न करता पारदर्शक पध्दतीने आणि लोकांना विश्वासात घेवूनच याचे काम करण्यात येणार आहे. दरम्यान, या ६ बैठकातून झालेल्या चर्चेचा इत्यंभूत अहवाल वरिष्ठ पातळीवर जाणार आहे आणि त्यानंतर पंढरपूर कॉरिडॉरच्या प्रत्यक्षात येथील कामास सुरूवात होणार आहे.



## स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा

### अभिनेते सचिन पिळगावकर; भगवंत व्याख्यानमाला पुष्प पाहिले

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

कोण काय म्हणतं यापेक्षा स्वतःच्या मनावर आणि स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा हे करत असताना कौटुंबिक जबाबदारी आणि कुटुंबासाठी वेळ देणे हे फार गरजेचे आहे.

स्वतःवर विश्वास ठेवून जगा, यश नक्कीच मिळेल, असे प्रतिपादन मराठी व हिंदी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकर यांनी केले.ते बार्शीतील मातृभूमी प्रतिष्ठान व भगवंत मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भगवंत व्याख्यानमालेचे पाहिले पुष्प गुंफताना बोलत होते. चित्रपट क्षेत्रातील सहा दशकं या विषयावर पिळगावकर बोलत होते. त्यांनी मराठी व हिंदी चित्रपटातील यशस्वी कामगिरीचा प्रवास उलगडा. अध्यक्षस्थानी आय. आय. केअर फाउंडेशन मुंबईचे संस्थापक संचालक डॉ. संतोष भोसले होते. प्रमुख पाहुणे म्हणून चित्रपट दिग्दर्शक अनिल मणी, ॲड. अनिल पाटील, ॲड. वासुदेव ढगे, मातृभूमी प्रतिष्ठानचे मार्गदर्शक अविनाश सोलवट, डिजिटल मीडियाचे प्रमुख राजा माने, मातृभूमीचे अध्यक्ष व भगवंत मल्टीस्टेटचे अध्यक्ष संतोष ठोंबरे, सचिव प्रताप जगदाळे हे उपस्थित होते. सचिन पिळगावकर यांनी प्रथम बार्शीचे ग्रामदैवत भगवंत मंदिरात जाऊन भगवंताचे दर्शन घेतले. त्यानंतर मातृभूमी प्रतिष्ठानच्या अन्नपूर्णा योजनेच्या ठिकाणीही भेट दिली. सूत्रसंचालन संतोष नाईक आणि शीतल कुलकर्णी यांनी केले. आभार किरण गाढवे यांनी मानले. यशस्वीतेसाठी मल्टिस्टेटचे सीईओ मिलिंद कांबळे आणि त्यांची टीम परिश्रम घेत आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद ऑनलाइन व्हिडिओद्वारे शुभेच्छा दिल्या.

> ग्लोबल स्टार्टअप स्पर्धेत इलेक्ट्रिक जेट इंजिनची संकल्पना मांडणाऱ्या व २५ लाखांचे पारितोषिक मिळवणाऱ्या प्रतिष्ठानचे सदस्य अशोक इनामदार यांचे चिरंजीव अभिजित इनामदार यांचा ही सत्कार करण्यात आला.

## अन्नछत्र मंडळातर्फे स्वामींच्या नामगजरात रथोत्सव अन् महाप्रसाद

### लाखो भाविकांना लाभ; धार्मीक कार्यक्रम, पारायण व रक्तदानही संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ एप्रिल-**

येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात श्रींच्या १४७ व्या पुण्यतिथीनिमित्त संस्थापक अध्यक्ष जन्मेजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोल भोसले यांच्या नेतृत्वाखाली रथोत्सव, विधीवत पूजा, धार्मिक कार्यक्रम, पारायण, महाप्रसाद, रक्तदान, व जिम्नॅशियमचा १७ वा वर्धापन दिन, मान्यवरांच्या भेटी व सत्कार आदी कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी अन्नछत्र मंडळात लाखो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

मंडळाकडून सहा दिवसपासून श्री स्वामी समर्थ रथोत्सवाचे आयोजन करण्यात आले. त्याची सांगता अमोलराजे मित्र मंडळ व स्वामीभक्तांनी कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या हस्ते रथाचे पूजन करुन समाधी मठाकडे पालखी मार्गावरून रथ मार्गस्थ करून केली. महाप्रसादालयात स्वामींचे चरित्र पोथी पारायण संपन्न झाले. श्री व अन्नपूर्णा महाप्रसादाचे पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृह राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे व मनसेचे राज्य उपाध्यक्ष विनायक म्हशीलकर, डॉ. प्रसाद प्रधान (ठाणे), केदारनाथ रामपुरी (बेंगलोर), सुरज पाटोळे (कराड) यांच्यासह स्वामी भक्तांच्या हस्ते झाले. यावेळी अन्नछत्र मंडळातील नैवेद्य श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर, समाधी मठात श्रींना दाखविण्यात आला.



**महाप्रसादाची वेळ वाढवली**

> न्यासाने श्रींच्या पुण्यतिथीनिमित्त येणाऱ्या स्वामी भक्तांना अन्नछत्र मंडळाच्या वतीने दुपारी ५ वाजेपर्यंत महाप्रसाद देण्याची तर रात्रीचा महाप्रसाद देखील उशिरापर्यंत भाविकांच्या सेवेर्थ ठेवण्यात आल्याने न्यासाच्या या कार्याबद्दल भक्तातून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या मंत्र पठणाने महाआरती झाली. आमदार कल्याणशेट्टी, माजी राज्यमंत्री म्हेत्रे यांच्या हस्ते संकल्प सोडल्यानंतर भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. येथील रक्तपेढीतर्फे रक्तदान शिबीर झाले. मातोश्री श्रीमंत कांतामती भोसले जिम्नॅशियम सेंटरच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री हनुमान मूर्तीचे पूजन अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. स्वामी भक्तांनी अन्नछत्र मंडळाच्या परिसरातील असलेल्या श्री शमी-विघ्नेह गणेश मंदिर, ब्रह्मांडनायक उभी स्वामींची मूर्ती, नियोजित महाप्रसादगृह इमारत, सध्याचे अद्यावत तात्पुरते महाप्रसादालय, कपिला गाय, कारंजा, शिवस्मारक, कार्यरत यात्री निवास -१, यात्रीभुवन-२, अतिथी गृह, आऊटडोअर व इनडोअर जीम, प्रशस्त वाहनतळ, टेकडीवरील श्री समर्थ वाटिका, शिवचरित्र प्रदर्शन हॉल, अग्निशमन, रुग्णवाहिका, आश्रयदाते कक्ष हे सर्व न्यासाने भक्तांच्या सेवेर्थ सुरु केलेल्या विविध उपक्रमांचे स्वागत करुन न्यासाचे कौतुक केले. परगावच्या पालख्यांचे स्वागत न्यासाच्या वतीने करण्यात आले. महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, आंद्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश, केरळ, गुजरात, उत्तराखंड, दिल्ली व जम्मू काश्मीर पंडीत, कोलकाता, राजस्थान, उत्तरप्रदेश, वाराणसी यासह देश व विदेशातील लाखो स्वामी भक्तांनी अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचा लाभ घेतला. येथे महाप्रसादाबरोबरच थंडगार मठ्ठा देण्यात आला. एअर कुलर सिस्टीम व समोर ग्रीन नेटची सोय करण्यात आल्याने स्वामी भक्तातून समाधान व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी गजिंद्र महाराज चव्हाण, सी.के. जाधव, नकुल काळे, मारुतीराव जगताप, प्रभाकर पाटील-सोनुले, व मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले, मनोज निकम, न्यासाचे लेखापरीक्षक ओंकारेश्वर उटगे, अप्पा हंचाटे, यांच्या सह माजी नगरसेवक- रामचंद्र समाणे, किशोर सिद्धे, संजय गोंडाळ, रोहित खोबरे, रोहित मोरे, धनंजय गाढवे, नागेश कलशेट्टी, सौरभ मोरे, वैभव मोरे, अशोक (मामा) जाधव, गणेश पाटील, प्रदीप पाटील, बसवराज दोडमनी, शिवराज मंगरुळे, निखील सलगोंडा, शिवशरण इजगे, प्रा. शिवशरण अचलेर, प्रा. मनोज जगताप उपस्थित होते.

> दर्शनासाठी देशातील विविध राज्यात जाण्याचा योग आला. अन्य ठिकाणच्या मानाने येथील व्यवस्था खुपच चांगली होती. अन्नछत्र मंडळात महाप्रसादाची उत्कृष्ठ नियोजन व व्यवस्थापन पाहून समाधान झाले.
> -नितीन पोतदार, स्वामी भक्त, मुंबई.

## महिलेसह दोघांवर हल्ला; तिघांची निर्दोष मुक्तता

**सोलापूर, दि. २८ एप्रिल -**

पीडितेचा विनयभंग करून तिच्या पती व भावास मारहाण केल्याप्रकरणी हणमंत राजू सुरगाळी (वय २६), विठ्ठल लायप्पा कटकटे (वय २१), गुंडराज भीमराव कटकटे (वय २२, तिघे रा. म्हैसलगी, ता. अक्कलकोट) यांच्यावर भरलेल्या खटल्याची सुनावणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांच्यासमोर होऊन त्यांनी गुन्हा शाबीत न झाल्याने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यातील पीडिता व तिचा पती तडवळ (ता. अक्कलकोट) येथे राहण्यास होते. ६ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११ च्या सुमारास आरोपीनी तिच्या हाताला धरून दमदाटी केली होती. त्यानंतर २२ जानेवारी२०२२ रोजी पीडिता हि तडवळ येथे आठवडा बाजाराकरिता गेली असता, हणमंत सुरगाळी हा तिच्या मागे पाठलाग करीत होता. त्यानंतर पीडितेने तिच्या पतीस व भावास बाजारामध्ये बोलावून घेतले. ते घरी जाण्यासाठी निघाले असता तिन्ही आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवून लोखंडी पाईपने व लाथाबुक्क्याने मारहाण केली होती, अशा आशयाची फिर्याद पीडितेने अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात दिली होती. त्यावरून पोलिसांनी तपास करून आरोपींविरुद्ध दोषारोप पत्रक दाखल केले होते. सदर खटल्यात सरकारतर्फे ९ साक्षीदार तपासण्यात आले.या खटल्याच्या सुनावणीच्या वेळेस आरोपीचे वकीलांचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीशांनी तिन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यात सरकारतर्फे ॲड ए. जी. कुर्डुकर तर आरोपीतर्फे ॲड मिलिंद थोबडे, ॲड सतीश शेटे यांनी काम पाहिले.